|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : ७ सोमवार दि. ०८ फेब्रुवारी २०२१ ते रविवार दि. १४ फेब्रुवारी २०२१ पाने : ८ किंमत : ५/– रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## म्हैस मेली करणीमुळे मालक सुडाने पेटला चिमुकल्याला ठार मारून बदला त्याने घेतला



बीड/क्राईम रिपोर्टर

शाहू, फुले, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रत दाभोलकर शाममानव यांच्या सारख्या समाजसुधारकांनी अंधश्रद्धेच्या विरोधात आयुष्यभर लढा दिला आणि सरकारला जादूटोना विरोधी कायदा करण्यास भाग पाडले. पण आजही राज्याच्या ग्रामीण भागात अंधश्रद्धा जपल्या जातात. त्यामुळे गावागावात भोंदू बाबांनी दुकाने थाटली आहेत आणि देवाची तसेच भूत प्रेताची भीती दाखवून ते लोकांच्या मनात ठासून अंधश्रद्धा भरवित आहेत. अशावेळी गावातील एखादा माणूस किंवा जनावर कुठल्यातरी आजाराने मेले तरी त्याच्यावर आपल्या विरोधकाने कारणी केली असा लोक कांगावा करतात आणि गावातील भागात भोंदू मांत्रिक अशा गोष्टीना हवा देतात. त्यामुळे लोकांच्या मनातील अंधश्रद्धा आणि त्यातून निर्माण झालेली भीती कायमची घर करून राहते, इतकेच नाही तर त्यातून निर्माण झालेले वैर आणि सुडाची भावना एखाद्या निष्पाप माणसाच्या किंवा त्याच्या मुलाबाळांच्या जीवावर बेतते.

बीड जिल्ह्याच्या रत्नागिरी गावात अशीच एक भयंकर घटना घडली आहे. गावातील रोहिदास सकपाळ या इसमाची काही दिवसांपूर्वी म्हैस मेली होती. मात्र हि म्हैस आपल्याच भावकीतल्या एका इसमाने करणी केल्यामुळे मेली असे कुणीतरी रोहिदासला सांगितले. त्यामुळे तो आणि त्याची पत्नी इतकी चिडली कि त्यांनी त्या माणसावरचा राग त्याच्या सहा वर्षांच्या मुलावर काढला आणि त्याची गळा दाबून हत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी पती पत्नीला अटक केली आहे. त्यांना न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने त्यांना ९ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे.

बीड जिल्ह्याच्या नेकनूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत रत्नागिरी हे गाव आहे. मात्र या गावात अंधश्रद्धा जोपासणारे अनेक लोक आहेत. त्यामुळे एखाद्याला आजार झाल्यास डॉक्टरकडे जाण्याऐवजी लोक मांत्रिकाकडे जातात. जरण–मरण जादूटोना यावर लोकांचा प्रचंड विश्वास आहे काही दिवसांपूर्वी रोहिदास पाटील यांची म्हैस अचानक मेली. मात्र हि म्हैस आपल्या भावकीतल्याच माणसाने करणी केल्याने मेली असे रोहिदास आणि त्याच्या पत्नीला वाटत होते. त्यावरून दोन्ही कुटुंबात भांडणेही झाली होती. ...पान २ वर

## खंडणीसाठी 'ते' यमदूत ठरले नौदल अधिकाऱ्यास जाळून मारले

तलासरी/क्राईम रिपोर्टर



जेंव्हा कायदे कठोर नसतात, तेंव्हा कायदे कमजोर असतात. तेंव्हा अशा कमजोर कायद्याची गुन्हेगारांना जराही भीती वाटत नाही. त्यामुळे गुन्हेगार एवढे खतरनाक बनतात कि कायद्याचे रक्षक असलेल्या पोलिसांचीकिंवा देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या लष्करी जवानांची आणि अधिकाऱ्यांचीही त्यांना भीती वाटत नाही. अशाच एक घटनेत काही खतरनाक गुन्हेगारांनी चैन्नईतून एका नौदल अधिकाऱ्याचे अपहरण करून त्याच्याकडे १० लाखांची खंडणी मागितली होती. मात्र त्यांनी खंडणी देण्यास नकार देताच त्याला पिस्तुलाच्या धाकावर तलासरीच्या जंगलात आणून जिवंत जाळले. या घटनेमुळे पालघर जिल्ह्यात आणि नौदलात मोठी खळबळ माजली असून घोलवड पोलीस फरारी आरोपींचा शोध घेत आहेत.

सुरजकुमार मिथिलेश दुबे (२७) हे झारखंडचे रहिवाशी होते आणि २००१ साली ते नौदलात सिबिंग सिमन म्हणून रुजू झाले. दरम्यान ३१ जानेवारीला ते काही कामानिमित चेन्नई येथे आले होते. यावेळी एका टोळीने चेन्नई विमान तळावरून त्यांचे अपहरण केले आणि त्यांना तीन दिवस चैन्नईत कोंडून ठेवले. त्यानंतर त्यांना पिस्तुलाच्या धाकावर कार मधून पालघर जिल्ह्यातील तलासरी येथे असलेल्या वेवजी गावच्या पश्चिम घाटातील जंगलात नेऊन त्यांच्यावर पेट्रोल ओतून त्यांना जाळण्यात आले. मात्र त्याही स्थितीत ते जखमी अवस्थेत जिवंत होते. दुपारी गावकऱ्यांच्या नजरेस होरपळलेल्या अवस्थेत ते दिसताच त्यांनी पोलिसांना कळवले. तसे घोलवड पोलीस घटनास्थळी धावले व त्यांनी सुरवातीला दुबे यांना डहाणू आगर उप जिल्हा रुग्णालयात दाखल केले. नंतर मुंबईच्या रुग्णालयात हलवण्यात आले. तेथे काल उपचारादरम्यान त्यांचा मृत्य झाला. ...पान २ वर

## उसन्या पैंशावरून दोघांमध्ये वाद झाला मित्रानेच जिवलग मित्राचा खून केला

उल्हासनगर/क्राईम रिपोर्टर



मयत

पैशामुळे सर्व काही विकत घेता येत असले तरी पैसा हा अत्यंत घातकी असतो. पैशाच्या वादातून माणूस रक्ताची नाती तसेच माणुसकी आणि दोस्ती यारी सुद्धा विसरून जातो. उसन्या पैशावरून झालेल्या वादातून नातेवायीकानीच आपल्या नात्यातील लोकांचा जीव घेतल्याच्या घटना यापूर्वी घडलेल्या आहेत. तसेच पैशावरून जिवलग मित्रही एकमेकांच्या जीवावर उठल्याचे लोकांनी पाहिलेले आहे. त्यामुळे पैसा हा अत्यंत घातकी आहे आणि याच घातकी पैशाने उल्हासनगरात एका मित्राने आपल्या जिवलग मित्राचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी मित्राला अटक केली आहे.

आज काल मित्र सुध्दा बघुनच करावे लागतात. काही मित्र चांगले असतात तर काही घातक असतात. मात्र काही जीवाला जीव देणारे असतात तर काही जीव घेणारे सुध्दा असतात. असाच प्रकार उल्हासनगरमध्ये घडला आहे. दोन जीवलग मित्र सोबतच काम करत होते. मात्र केवळ चारशे रुपया मुळे हे दोन्ही मित्र एकमेकाचे वैरी झाले आणि त्यातुनच एका मित्राचा जीव गेला तर दुसरा जेल मध्ये गेला. उल्हासनगर कॅम्प ५ येथील जिंस कारखान्यात बहुतेक उत्तर भारतीय, बिहारी, झारखंड, बंगाल येथील तरुण कामे करतात हे तरुण जे सांगाल ते काम करतात. असेच दोन मित्र एक सोनु उर्फ बाबु रामदयाल गुप्ता ...पान २ वर

## इगो दुखावल्याने अझरूद्दीन चिडला दारुड्या अल्तमशचा मुडदाच पडला



जळगाव/क्राईम रिपोर्टर

स्वतःला खूपच शहाणा समजल्या जाणाऱ्या माणसाचा जर का दुसऱ्या माणसाकडून इगो दुखावला गेला कि त्याला ते सहन होत नाही आणि मग रागाच्या भरात त्याच्या हातून काहीही घडू शकते. जळगावच्या शाहू नगर भागातही असेच घडले. स्वतःला इतरांपेक्षा वेगळा आणि स्मार्ट समजणाऱ्या अझरूद्दीन उर्फ भूत फलित याचेही तसेच झाले एका दारूड्यांकडून त्याचा इगो दुखावला गेला. त्यामुळे तो इतका चिडला कि त्याने त्या दारुड्याला ठार मारले आणि पळून गेला. या प्रकरणी पोलिसांनी नंतर त्याला अटक केली.



मयत अल्तमश

मजुरी करणाऱ्या अल्तमश शेख यास दारु पिण्याचे व्यसन होते. मेहनती काम करुन घरी परतल्यावर त्याला दारुचे घोट लागत होते. दारुचे घोट घेतल्याशिवाय त्याची सायंकाळ सुखाची जात नव्हती. मोलमजुरी करणाऱ्या अल्तमशचे टोपणनाव सत्त्या होते. जळगावच्या शाहू नगर भागातील रहिवासी अल्तमश हा सत्त्या या टोपणनावाने परिसरातील लोकांना परिचीत होता. सत्त्याचे दारु पिण्याचे व्यसन परिसरातील लोकांना माहिती होते. सत्त्या रहात असलेल्या परिसरात अझरुद्दीन शेख हा तरुण रहात होता. अझरुद्दीन हा भुत फलीत या टोपणनावाने परिसरात परिचीत होता. भुत फलीत याला देखील दारु पिण्याचे व्यसन होते. उनाडक्या करणे हा भुत फलीत याचा उद्योग होता. डोक्यावरील मोठी जुल्फे त्याने सोनेरी व रुपेरी केली होती. त्याची सोनेरी जुल्फे आणि भुत फलीत हे टोपणनाव हीच त्याची ...पान ६ वर



आरोपी अझरुद्दीन

## बापाच्या हातून भलतेच झाले ५ रुपयांसाठी मुलीला ठार केले

गोंदिया/क्राईम रिपोर्टर

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील शेतकरी हा सध्या विविध समस्यांनी ग्रासलेला आहे. कधी दुष्काळ तर कधी अतिवृष्टी तर कधी नापिकी त्यामळे शेतीतून पोटापुरते सुद्धा काही मिळत नाही. उलट सावकारी कर्जाचा फार्स मानेभोवती दिवसेंदिवस आवळत जातो. त्यामुळे अगोदरच टेन्शनमध्ये असलेल्या या माणसाला घरातल्या कुठल्याही माणसाने पैशाचे टेन्शन दिले कि मग त्याला भयंकर संताप येतो आणि रागाच्या भरात तो रक्ताचे नातेही ओळखत नाही.

गोंदिया जिल्ह्यातील लाहोर गावात एका गरीब शेतकऱ्यांचे पैशावरून पत्नी सोबत भांडण झाले होते. अशातच शेतातून येताच ५ वर्षांच्या लहान मुलीने बापाकडे खाऊसाठी फक्त पाच रुपये मागितले. त्यावरून हा बाप इतका चिडला कि त्याने मागचा पुढचा जराही विचार न करता त्याने मुलीला घराच्या दारावर आपटून ठार मारले. या घटनेने संपूर्ण गाव हादरला असून पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. गोंदिया जिल्ह्यातील लाहोर गाव तसे फार मोठे नाही. याच गावात विवेक उईके हा शेतकरी आपल्या कुटुंबासह राहत होता. उईके हा शेतकी असून अतिवृष्टीमुळे यंदा शेतात ...पान २ वर

## दोस्तीची जाण मित्रांना नाही उरली दारूची पार्टी रक्तरंजित ठरली

कोल्हापूर/क्राईम रिपोर्टर



मयत रमेश

दारूड्यांची सांगत कुणीही करू नये. कारण दारूच्या नशेत त्यांच्या हातून काय घडेल याचा नेम नाही. दारूची नशा डोक्यात गेली कि मग एकत्र बसून दारू पिणारे जिवलग मित्रही एकमेकांसाठी काळ बनतात. शिरोलो येथील माळवाडीमध्ये असेच घडले. अमित नाईक या तरुणाला दारूचे व्यसन होते. त्यासाठी त्याने आपल्या मित्रांकडून कर्ज घेतले होते. मात्र कर्ज देणाऱ्यांने एक दिवशी त्याच्याकडे कर्जाची रक्कम परत करायला सांगितली. मात्र आपल्याकडे पैसे नाहीत, हवी तर दारू पाजतो असे अमितने सांगितले. त्यावर ते तयार झाले आणि चार मित्रांची दारू पार्टी रंगली. पण पार्टीत दारू कमी पडल्याने त्यांनी अमितला आणखी दारूची व्यवस्था करायला सांगितली. पण अमितने त्याला नकार देताच तीन मित्रांनी तिथेच त्याला मारून टाकले. या प्रकरणी पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे.

गुन्हेगारी मित्राशी मैत्री केली की ती अंगलट येत असते. त्यांना दारूचे गांजाचे व्यसन असल्याने त्या व्यसनापोटी ते कधी ही कोणत्या ही थराला जात असतात. दारूची पार्टी रंगात आली की, त्या पार्टीत कधी ही कोणत्या ही गोष्टीवरून वाद उकरून काढून एखाद्याची गेम केली जाते. मित्र कितीही जवळचा असला तरी त्याच्याशी आर्थिक व्यवहार हा जपूनच करावा लागतो. नाही तर तोच व्यवहार घेणाऱ्या आणि देणाऱ्याच्या ही अंगलट येवू शकतो. त्यातच ते मित्र जर नशा करणारे असले की विचारण्याची सोय नसते. त्यांना वेळेत पैसे मिळाले नाही तर ते पैसे घेणाऱ्याला दारूसाठी ते त्यांच्या मागे लागत ...पान २ वर



आरोपी योगेश



आरोपी समीर

## चंचल मेव्हणीच्या जाळ्यात फसला रंगेल मेव्हणा जीव गमावून बसला

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

मेव्हणी म्हटली कि भावोजीला ती नेहमीच हवीहवीशी वाटत असते. अशावेळी ती जर चंचल असेल, तर तिला पटवायला आणि नंतर तिच्याशी मजा मौज करायला फारसा वेळ लागत नाही. त्यामुळे अनेकांचे मेव्हणीशी संबंध असतात, पण अशा अनैतिक संबंधाना जेंव्हा वाचा फुटते. तेंव्हा मात्र भयंकर परिस्थिती निर्माण होते आणि त्यात एखाद्याचा जीवही जाऊ शकतो. खास करून विवाहित मेव्हणी बरोबरचे संबंध अधिक धोकादायक असतात. कारण अशा संबंधाची चाहूल जर का मेव्हणीच्या पतीला लागली, तर आपल्या पत्नीशी संबंध ठेवणाऱ्याचा तो जीवही घेऊ शकतो.

इचलकरंजी येथील शुभम कुधालकर याच्या बाबतीत सुधा असेच घडले त्याचा प्रेमविवाह झालेला असतानाही त्याचे विवाहित मेव्हणीशी अनैतिक संबंध जुळले होते. मात्र याची चाहूल तिच्या पतीला लागताच तो संतप्त झाला आणि त्याने मित्राच्या मदतीने आपल्या साडूचा काटा काढला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे. शुक्रवार दि.२९ जानेवारी २०२१ रोजी शुभम हा पार्वती औद्योगीक वसहातीत कामाला जातो ...पान २ वर

## कामाला लावण्याचा अजब फंडा नोकरी डॉट कॉमने घातला गंडा




जळगाव/क्राईम रिपोर्टर

सध्या नोकऱ्याच उपलब्ध नसल्याने बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे आणि त्याचाच फायदा काही भामटे घेत आहेत. नोकरीचे आमिष दाखवून बेरोजगार तरुणांची फसवणूक करीत आहेत. जळगाव जिल्ह्यातील म्हसावद येथील एका बेरोजगाराची नोकरी डॉट कोमच्या माध्यमातून ९३ हजारांना फसवणूक करण्यात आली होती. मात्र त्याने पोलिसांच्या मदतीने बेरोजगारांना गंडा घालणारे हे रॅकेट उध्वस्त केले आणि सायबर सेलने हे रॅकेट चालवणाऱ्या भामट्याला दिल्लीतून अटक केली.

सध्या बेरोजगारी हा एक प्रमुख विषय तरुणांपुढे उभा आहे. या बेरोजगार तरुणांचा प्रश्न हेरुन प्लेसमेंट सेंटर चालकांनी आपला रोजगाराचा प्रश्न मात्र सोडवला आहे. बेरोजगारांच्या जिवावर रोजगार असा हा धंदा अनेकांनी अंगिकारला आहे. त्यात खरेपणा किती व खोटेपणा किती हे मात्र फसवणूक झाल्यावर अथवा नोकरी लागल्यानंतरच लक्षात येते. या बेरोजगार तरुणांच्या जिवावर अनेकांनी फसवणूकीची दुकानदारी थाटलेली दिसुन येते. नौकरी डॉट कॉम या वेबसाईटच्या माध्यमातून गेले कित्येक दिवसापासून बेरोजगारांची फसवणूक सुरु होती. सदर वेबसाईट चालवणाऱ्या अर्थात फेक कॉल सेंटर चालणवाऱ्या ठगास जळगाव सायबर पोलिसांनी दिल्ली येथून ताब्यात घेत अटक केली आहे. नौकरी डॉटकॉम या वेबसाईटचे पितळ या निमीत्ताने उघड झाले आहे हे नक्की. नौकरी डॉट कॉम या ऑनलाईन वेबसाईटच्या माध्यमातून बेरोजगारांची फसवणूक करणाऱ्या परप्रांतीय भामटा सायबर पोलिसांच्या हाती लागला आहे. बेरोजगारांची ऑनलाईन आर्थिक फसवणूक करणाऱ्या ...पान ६ वर

## पाणी वाटपाचा वाद विकोपाला गेला प्रशांत पाटलाच्या हातून पाटकरी मेला

इस्लामपूर/क्राईम रिपोर्टर



मयत अशोक

शेतीला देण्याच्या पाण्यावरून गावकऱ्यांमध्ये वाद होणे हि काही नवी गोष्ट नाही. मात्र एखाद्या योजनेतून जेंव्हा पाणी वाटपाचे नियोजन केले जाते, तेंव्हा जो पाणी वाटप करणार पाटकरी असतो त्याची मोठी कसोटी असते. कारण पाणी वाटपाच्या वेळी काही गावकऱ्यांचे गैरसमज झालेले असतात. पत्करी आपल्याला कमी आणि दुसऱ्यांच्या शेताला जास्त पाणी देतो असे गैरसमज झालेले असतात. अशाच गैरसमजातून पाटकरी अशोक पाटील आणि शेतकरी बौरव पाटील यांच्यात वाद झाला आणि याच वादातून बाबुरावच्या मुलाने निष्पाप पाटकरी अशोक पाटील याचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी प्रशांत पाटील याला अटक केली आहे.



आरोपी प्रशांत

रागाच्या भरात कुणी कोणते पाऊल उचलेल हे सांगता येत नाही. अशा प्रकारच्या घटनेतूनच सांगली जिल्हयातील इस्लामपूर जवळील साखराळे येथे सोमवार दि.१ फेब्रुवारी २०२१ रोजी सकाळी ११ वाजणेच्या सुमारास इस्लामपूर नवेखेड मार्गावरील नवरा–नवरी नावाच्या शेताच्या परिसरात खूनाची घटना घडली. शेतात जाणाऱ्या वाटेवर पाणी सोडलेच्या कारणातून पाटकरी अशोक आनंदा पाटील याच्या डोक्यात लोखंडी रॉड घालून त्याचा खून करण्यात आला.

वाळवा तालुक्याती साखराळे येथील आनंदा पाटील हे पाटकरी म्हणून काम करीत होते. सन २०१७ साली नव्याने सोसायटी मार्फत या भागातील शेतकऱ्यासाठी नदीवरून पाण्याची स्किम आणण्यात आली होती. त्यामुळे या भागातील बहुतेक शेतकऱ्याच्या शेत जमीनीला, ऊसाला पाणी देण्याचे काम ...पान ६ वर

08 TO 14 FEB 2021 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 06/02/2021 10:20 PM Page 1



## पान १ वरून....

### म्हैस मेली करणीमुळे मालक ...

मात्र भावकीतलाच वाद असल्याने मिटवण्यात आला. पण रोहिदासच्या मनात मात्र राग होता त्याने आपल्या शत्रूला धडा शिकवण्यासाठी एक भयंकर कट रचला आणि बुधवारी त्याच्या सहा वर्षांच्या मुलाचे जिल्हा परिषदेच्या शाळेजवळून अपहरण केले. त्यानंतर त्याला घरात नेऊन रोहिदास व त्याच्या पत्नीने त्या मुलाची गळा दाबून हत्या केली. दरम्यान शाळेत गेलेला शुभम परतला नाही. म्हणून शोधाशोध सुरु झाली आणि गुरुवारी शुभमचा मृतदेह शाळेच्या परिसरातच आढळला. या घटनेमुळे गावात मोठी खळबळ माजली. या घटनेची माहिती नेकनूर पोलीस ठाण्याला कळवताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. दरम्यान मुलाच्या पालकांनी या प्रकरणी रोहिदास आणि त्याची पत्नी देवैबाई हिच्यावर संशय व्यक्त केला होता. त्यामुळे त्या दोघांना ताब्यात घेण्यात आले. सुरवातीला ते उडवाउडवीची उत्तरे देत होते. मात्र पोलिसांनी आपला खाक्या दाखवताच त्यांनी गुन्हा कबुल केला. त्यानंतर या पती पत्नीवर शुभमच्या हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर त्यांना न्यायालयात उभे केले असता न्यायालयाने त्यांना ९ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. एका शुल्लक कारणावरून सहा वर्षांच्या निष्पाप मुलाचा जीव गेल्याबद्दल गावात हालहाल व्यक्त करण्यात येत आहे.

### खंडणीसाठी 'ते' यमदूत ठरले...

या प्रकरणी त्यांनी मृत्यू पूर्व दिलेल्या जबानी वरून घोलवड पोलिसांनी कलम ३०७,३६४,३९२, व ३४ अन्वये गुन्हा दाखल केला असून फरारी आरोपींचा कसून तपास सुरु आहे.

### उसन्या पैशावरून दोघांमध्ये वाद ...

(१९) व दुसरा फईम उर्फ भोपु नसिम शेख (२०) हे दोन मित्र जिंस पॅकिंग च्या कारखान्यात काम करत होते. सोबतच काम करत असल्याने यांचा एकमेकावर चांगला जीव होता. एके दिवशी हे दोघे मार्केट मध्ये गेले. आणि त्या मार्केट मध्ये एका शुजच्या दुकानात चांगले शुज असल्याने फईम उर्फ भोपु नसिम शेख याला ते शुज आवडले. परंतु ते शुज घ्यायला फईम शेख कडे पैसे नव्हते. तर त्याने शुज घ्यायला सोनू उर्फ बाबु रामदयाल गुप्ता याचे कडुन ४०० रुपये उसने घेतले आणि फईमने नवीन शुज खरेदी केले. दरम्यान फईम शेख याला सोनुने दिलेले ४०० रुपये लवकर परत केले नाही म्हणुन सोनु याने फईम याला ४०० रुपये केव्हा देणार अशी विचारणा केली. मात्र पैशावरुन दोघात वाद झाला हा वाद ऐवढा विकोप्याला गेला की ते दोघे ही हातघाईवर आले. त्यातच रागाच्या भरात सोनु गुप्ता याने मैत्री बाजुला ठेवुन फईम शेख याला जबर मारहाण केली. तर त्या मारहाणीत फईम ला सोनु गुप्ता याने लाईटच्या पोलवर ढकलुन दिले. त्यामुळे पोल चा फटका फईमच्या डोक्याला जबर बसला आणि फईम हा जीवाला कायम चा मुकला. आपल्या भावाची हत्या सोनु गुप्ता याने केल्याची खबर फईम शेख चा भाऊ चांद बाबु नसिम शेख याला समजली तेव्हा त्याने कॅम्प ५ येथील शनि मंदिराकडे धाव घेतली व आपल्या भावाला मध्यवर्ती रुग्णालतात नेले. मात्र फईम चा मृत्यु झाल्याचे डॉक्टरानी सांगितले. तेव्हा चांद बाबुच्या पाया खालची वाळुच सरकली. पोलिसाना या खुनाची माहिती मिळताच त्यानी सुध्दा मध्यवर्ती रुग्णालयात धाव घेतली आणि फईम च्या मृतदेहाचा पंचनामा करुन मृतदेह शवविच्छेदना करिता पाठवला तर फईम चा भाऊ चांदबाबु शेख यांच्या तक्रारीवरुन हिल लाईन पोलिसानी सोनु उर्फ बाबु रामदयाल गुप्ता यांच्या विरुध्द ३०२ कलमा प्रमाणे गुन्हा दाखल करुन लगेच आरोपी सोनु गुप्ता याला फईम शेखच्या खुनाच्या गुंह्यात अटक केली आह. तर या गुंह्याचा तपास पोलिस निरीक्षक (गुन्हे) एम.के.खंदारे हे करत आहेत.

### बापाच्या हातून भलतेच झाले...

काहीच पिकले नव्हते. त्यामुळे अगोदरच तो पारेषण झालेला होता. घर खर्च चालवायला पैसा नसल्याने पत्नी बरोबर रोजच त्याचे भांडण होत असे गुरुवारी असेच पती-पत्नीमध्ये भांडण झाले होते. त्याचा राग विवेकच्या मनात होता. त्यातच घरी येताच पोरींनी खाऊसाठी ५ रुपये मागितले आणि हट्ट धरला. त्यामुळे चिडलेल्या विवेकने मुलीला उचलून जोराने दरवाजावर आपटले. यात दाराच्या लाकडी फळीचा घाव तिच्या मेंदूला बसला आणि तिचा मृत्यू झाला. या घटनेनंतर मुलीच्या आईने पती विरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवतच पोलिसांनी विवेकला अटक केली.

### दोस्तीची जान मित्रांना नाही ...

असतात. घेतलेल्या पैशासाठी ते तगादा लावून त्याला ते विनाकारण पैसे खर्च करायला लावतात. दारूच्या पार्टीत साध्या किरकोळ कारणावरून वाद झाला तरी त्याचे पर्यावसन हे एखाद्या गंभीर घटनेत होत असते. त्यातच बऱ्याच वेळेला दारूची पार्टी रंगात आली की, मुद्दामहून देण्या घेण्याचा विषय काढून एकादयाची गेम ही केली जाते. दारूची नशा ही त्यावेळी नको ते करायला लावत असते. दारूच्या पार्टीत आर्थिक देवी घेवीच्या व्यवहारातून वाद उकरून काढून अमित रमेश नाईक उर्फ राठोड याचा निर्घृण खून केल्याची घटना कोल्हापूर जवळील शिरोली येथील पंचगंगा नदीच्या जवळ असणाऱ्या शेतात बुधवार दि. ३ फेब्रुवारी २०२१ रोजी दुपारच्या सुमारास घडली.

अमित नाईक हा शिरोली येथील माळवाडी येथे आपल्या आई वडिलासह राहयाला आहे.त्याचे कुंटूंब हे मुळचे कर्नाटकातील विजापूर भागातील परंतू रोजगाराच्या निमित्याने त्याचे आई वडिल हे बऱ्याच वर्षापूर्वी येथे कामाच्या निमित्याने आले. ते बंजारा (लमाणा) समाजातील असल्याने येथे ते मिळेल ते काम करून मोलमजूरी करीत असतात. अमित हा देखील एमआयडीसी मध्ये एका कारखान्यात कामाला जात होता. परंतू तो काम कमी आणि व्यसनी मित्रासोबत जास्त राहून दारूचे व्यसन करीत होता.त्याचे मित्र हे गुन्हेगारी क्षेत्रातील असल्याने त्याचा संबंध गुन्हेगारीशी येत होता. खरे तर अमित हा साधा सरळ स्वभावाचा होता.तो कधी कोणाच्या अध्यात मध्यात राहत नव्हता.समीर नदाफ आणि योगेश पाखरे हे त्याचे मित्र गांधीनगर येथील होते. ते दोघे ही शिरोली एमआयडीसी मध्येच मिळेल ते काम करण्यासाठी येत होते. त्यातूनच त्यांची मैत्री ही अमित नाईक ऊर्फ राठोड याच्याशी झाली होती. समीर नदाफ आणि योगेश पाखरे हे दोघे ही गुन्हेगारी प्रवृत्तीचे होते. त्याचा संबंध हा गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकाशी येत होता.त्यामुळे ते दादागिरी करीत समोरच्याला गप्प बसवत होते. त्यातच त्यांना दारूचे आणि गांजाचे व्यसन असल्याने चौविस तास ते नशेतच असायचे.

अमित हा देखील त्याच्याबरोबर नेहमी वावरत असल्याने तो ही त्याच्याबरोबर दारू पित होता, गांजा ओढत होता. त्यातच त्याने गेल्या काही महिन्या पूर्वी समीर नदाफ याचे कडून घेतले होते.या रक्कमेला त्यांनी व्याज ही भरमसाठ लावेलेले होते. व्याजाने घेतलेली रक्कम ही काही मोठी नव्हती. पण त्या रक्कमेला त्यांनी अवाच्या सव्वा व्याज लावल्याने ती रक्कम मोठी झाली होती. समीर नदाफ याने अमितकडे सारखा पैशाचा तगादा लावलेला होता. मात्र ती रक्कम काही अमित याला लवकर परत देता येत नव्हते. त्याचा जरी देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला असला तरी अमित हा नित्य नियमाने रोज त्याच्या बरोबरीने फिरत होता. त्यामुळे समीर नदाफ याला दिलेली रक्कम ही बुडणार नाही याची गॅरेंटी होती. परंतू व्यवहार हा व्यवहाराच्या ठिकाणी न राहता तो दारू आणि गांजाच्या पार्टीत बदलत होता. समीर आणि त्याचे मित्र अमित याला सारखे दारूसाठी आणि गांजा पिण्यासाठी पैसे खर्च करायला लावत होते. तरीही तो आपण मित्रासाठी पैसे खर्च करीत आहोत ही भावना त्याची असल्याने तो खर्च केलेल्या पैशाचा तो विचार करीत नव्हता. परंतू अमित हा समीर नदाफ आणि योगेश पाखरे याच्याबरोबर फिरत असल्याने तो ही व्यसनात बुडालेला होता. ते तिघे चौघे मित्र चोरून लपून छपून गांजा ओढीत होते.त्याचबरोबर दारू ही पित होते. तिघे चौघे जण दारूची पार्टी करीत असताना दारू कमी पडली तर ते परत आपल्या मित्राकडे आणखीन दारूची मागणी करीत असतात. त्यातून त्याचा वाद ही होत असतो.त्यातच किरकोळ कारणावरून झालेला वाद हा कधी उग्र स्वरूप धारण करेल हे काही सांगता येत नाही. व्यसनाधीनता ही माणासाला लागलेला शापच आहे असे वाटत असताना नशेच्या अधीन झालेल्या व्यक्ती अशा किरकोळ कारणातून कोणत्या थराला जावू शकतात याचा अंदाज बांधता येत नाही. म्हणूनच अशा लोकांच्यापासून चार हात लांब राहिलेले बरे परंतू एखाद्याला संगत गुण ही सोबत गुण अंगवळणी पडल्याने तो ही त्याच्याबरोबर व्यसनाच्या आहरी जात असतो.तशीच गत अमित याची झालेली होती. एक तर तो त्या व्यसनाधीन आणि गुन्हेगारी मित्राशी जोडला गेल्याने त्याला ही तिच सवय लागलेली होती. त्यामुळे त्याचे आपल्या कुंटुंबाकडे दुर्लक्ष झाले होते. व्यसनी मित्राच्या नादाला लागून तो ही बिघडलेला होता. त्यातच त्याने त्याच्याकडून हात उसणे व्याजाने पैसे घेतल्याने तो जास्तच त्याच्यात अडकत चालला होता. ते म्हणतील तसे करणे त्याला भाग पडत होते. तो काम कमी पण व्यसन जास्त प्रमाणात करीत असल्याने त्याच्याकडे ही पैसे कुठून येणार होते हा ही एक प्रश्न होता. त्याचे आई वडिल बिचारे या वयातही मोलमजूरी करून आपल्या संसाराचा गाडा हाकत होते. ते तरी त्याला किती आवर घालणार होते. तो काही आता लहान राहिलेला नव्हता. त्यांनी त्याला बऱ्याच वेळेला समजावून सांगूनही तो त्याचे काहीच ऐकत नव्हता. त्यामुळे त्याच्या आई वडिलांनी त्याच्यापुढे हात ठेकलेले होते. वाईट संगतीच्या मित्र परिवाराच्या नादाला लागून त्याने स्वत:च्या हातानेच आपल्या पायावर धोंडा मारून घेतला होता. बुधवार दि.३ फेब्रुवारी रोजी दुपारच्या सुमारास समीर याने अमीतला फोन करून बोलावून घेतले आणि पैशाची विचारणा केली, त्यावर माझ्याकडे आता पैसे नाहीत असे अमीतने त्याला सांगितले. त्यावेळी समीरबरोबर योगेश पाखरे हा ही होता. त्यावेळी त्यातिघात काही तरी बोलणे झाले. त्यानंतर त्यांनी त्याला दारूची व्यवस्था करण्यास सांगितले अमीत त्याला तयार झाला. त्याने दारूची व्यवस्था केल्यानंतर ते तिघे आणि आणखीन एक जण असे चौघे मिळून दोन मोटार सायकलीवरून हायवे वरून पंचगंगा नदीशेजारील असणाऱ्या दर्गाजवळ आले. हायवे वर नेहमी गर्दी असल्याने त्यांनी दारू पिण्यासाठी त्या दर्गाच्या मागील बाजूस असणाऱ्या शेतात जाण्याचे ठरविले. शेतात लांब अंतरावर जावून ते चौघे ही दारू पित बसले होते. त्याचबरोबर समीर आणि योगेशने गांजा ही आणलेला होता. दारू बरोबर गांजाही ओढत असताना त्यांना नशा बऱ्यापैकी झालेली होती. चौघेही नशेत तरळत बडबडत होते. त्याचवेळी अमीतने आणलेली दारू संपली असल्याने समीर याने अमीत याला दारू कमी पडली आहे, आम्हाला आणि दारू पाहिजे तु गांधीनगरच्या कोपऱ्यावरून गाडी घेऊन जावून क्वाटरच्या दोन बाटल्या आण.असे सांगितले त्यावेळी अमीत याने माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगितले असता त्या तिघांचे टाळके सटकले. एक तर व्याजाने घेतलेले पैसे ही देत नाही, दारूला ही पैसे दत नाहीस म्हणून त्यांनी भांडण काढायला सुरूवात केली. उलट अमीत त्याना म्हणाला, मी ऊदया पैसे देतो मला तुम्ही आता क्वारटर दया.त्यावेळी समीर याने त्याच्या कानाखाली लगावली. बघता बघता पार्टीचा रंगाचा बेरंग झाला होता. दोघेजण अमीतच्या अंगावर जात होते.सगळेजण गांजा ओढले असल्याने कुणाला कुणाचा ताळमेळ नव्हता. त्यातच एकाने आपल्या कडील चाकू काढून अमीतच्या पोटात जोरात खुपसले.त्यासरशी अमीतच्या पोटातून मोठया प्रमाणात रक्तस्राव होऊ लागल्याने तो तळमळतच खाली पडला.त्याची नाजूक अवस्था बनली असल्याने त्याच्यातीलच दोघांनी नशेत अमीत याला एका मोटार सायकलीवर मध्ये बसविले आणि त्याला गांधीनगर येथील एका खाजगी दवाखान्यात उपचारासाठी डॉक्टरच्या कडे नेले. त्या डॉक्टरांनी त्याला तपासून त्याचा उपचाराआधीच मृत्यू झाल्याचे त्यांना सांगितले. त्यानंतर ते दोघे ही घाबरले.त्यावेळी डॉक्टरांनी त्या दोघांच्याकडे त्याच्या मृत्यूची माहिती घेतली होती. त्यांनी डॉक्टरांना घडलेली सगळी हकींगत सांगितल्याने त्या डॉक्टरांनी या घटनेची तत्वरीत माहिती शिरोली एमआयडीसी पोलीसांना दिली. पोलीस ही तातडीने या घटनेची माहिती मिळताच त्या डॉक्टरांनी सांगितलेल्या ठिकाणी आले.त्यांनी या घटनेची माहिती त्या दोघांच्याकडून घेऊन मयत अमीत याचा मृतदेह शवविच्छेदनासाठी कोल्हापूर येथील सीपीआर रुग्णालयात पाठवून दिला. तसेच घटनेठिकाणी जावून घटनास्थळाचा पंचनामा करून या घटनेची माहिती मयत अमीत नाईक याच्या घरच्या लोकांना दिली.

घटनास्थळी करवीरचे उप.विभागीय पोलीस अधिकारी प्रशांत अमृतकर यांनी भेट देवून घटनेची माहिती घेतली आणि तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना दिल्या. अमीत नाईक यांच्या वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून शिरोली पोलीसांनी अमीत रमेश नाईक ऊर्फ राठोड (वय २१) रा.माळवाडी शिरोली याच्या खून प्रकरणी समीर नदाफ (वय २५) आणि योगेश साखरे (वय ३०) रा.दोघेही गांधीनगर याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्यांना कोल्हापूर येथील कोर्टात उभे केले असता. मा.कोर्टाने त्यांना तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी गुन्हयात वापरलेली मोटार सायकल आणि चाकू जप्त केले होते. या घटनेचा पुढील तपास स.पो.नी किरण भोसले याच्या मार्गदर्शनाखाली शिरोली एमआडीसीचे पोलीस करीत आहेत. नशेच्या आधीन झालेले तरूण कोणत्या ही थराला जातात त्याना खूनासारखी घटना ही क्षुल्लक वाटत असते. गांजा आणि दारूचा अमंल झाल्यावर कोण कुणाचा राहत नसतो त्यातून संयम सुटला की ते त्याच्या हातून खूनासारखी घटना घडते. हेच या घटनेवरून दिसून येते.

### चंचल मेव्हणीच्या जाळ्यात फसला...

असे सांगून रात्री ८ वाजणेच्या सुमारास घरातून निघून गेला. तो शहापूर येथे पोहोचला असता त्याला त्याच्या साडूचा फोन आला बहुदा त्याने दारू पिण्यासाठी त्याला बोलावून घेतले असे समजून शुभम हा त्याने बोलवलेल्या विनायक हायस्कूलच्या पाठीमागील मैदानात गेला आणि तेथेच त्याचा घात झाला. रात्री नऊ सव्वा नऊच्या दरम्यान त्या मैदानातून एकजण आपल्या मोटार सायकलीने जात असताना अंधारात त्याला एक इसम रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. त्याने आपल्या गाडीचा हेडलाईट आधिक प्रखर करून पाहिले तर बाजूलाच धारदार कोयत्या सारखे शस्त्र पडलेले आणि एक तरूण रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसला. तर बाजूला एक मोटार सायकल ही पडलेली दिसली. हे बघून तो घाबरला आणि त्याने रस्त्यावर येऊन थोडा वेळ विचार करून या घटनेची माहिती शहापूर पोलीसांना दिली. बघता बघता ही घटना शहापूर इचलकरंजी परिसरातील अनेकांच्या मोबाईलवर ही झळकू लागली होती. पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यानी घटनेचा पंचनामा करून मृतदेहाची ओळख पटवून तपासाला सुरूवात केली आणि या घटनेचा उलघडा काही तासात करून संशयीत आरोपीना ताब्यात घेतले.

मंगळवार पेठेत राहणाऱ्या शुभम कुडाळकर याची घरची परिस्थिती तशी बेताचीच होती. तो आपल्या आई आणि भावासह राहत होता. त्याच्या तीन्ही बहिणीची लग्ने झाल्याने त्या त्याच्या सासरी गेल्या होत्या. गेल्या काही वर्षापूर्वी शुभमच्या वडिलांचे निधन झाल्यावर त्याच्या आईने त्याना मोठया कष्टाने वाढविले होते. त्यातून त्या ही एका हॉटेलमध्ये स्वयंपाक करायला जात होत्या. त्यातूनच त्याचा उदरनिर्वाह होत होता. तिने कसेबसे आपल्या मुलीचे लग्न केलेले होते. शुभमने ही दोन महिन्यापूर्वी आपल्या पंसतीने प्रेमविवाह केलेला होता. त्याने जरी प्रेमविवाह केलेला असला तरी सर्व संमतीने झालेला होता. इचलकरंजी जवळील चंदूर येथील कुंभार कुटूंबातील एका मुलीशी त्याचे प्रेमसंबध जुळ्याने व तिच्याशी त्याचे लग्न झाल्याने शुभम हा खूश होता. त्याच्या पत्नीच्या बहिणीची सासरवाडी ही इचलकरंजी येथील कुडचे मळ्यात होती.त्याच्याकडे शुभमचे लग्नाअगोदर पासून येणे जाणे होते. तिच्या बहिणीचा नवरा सुरज कुंभार हा शुभमला पूर्वीपासून ओळखत होता. शुभम हा चंचल आणि दिल फेक स्वभावाचा आहे हे त्याला माहित होते. तो त्याच्या पत्नीशी लाडी गोडीने आणि चेष्टा मस्करीने बोलत होता. त्यावेळी सुरजला शुभमबाबत वेगळीच शंका येऊ लागली होती. तो त्या दोघांच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून होता. सुरजची पत्नी ही शुभमकडे आपल्या लहान बहिणीचा नवरा आहे या नात्याने आणि तो आता आपल्याला भावोजी लागत असल्याने ती या नजरेनच त्याला पाहत होती. त्यातच त्या दोघांनी एकमेकांच्या नजरेचा इशारा ओळखलेला होता.शुभमच्या लग्नानंतर तर त्या दोघांच्या इश्काच्या खेळाला बहर आलेला होता. ती ही काही तरी काम काढून आपल्या बहिणीकडे सारखी येवू लागली होती.तर शुभम ही सूरजकडे काही तरी कामाचे निमित्य काढून जात होता. ती भेट फक्त वरवरची होती. त्याला त्याच्या मेहुणीला भेटायचे असल्याने अलिकडे तर सुरज नसताना ही तो कुडचे मळ्यातील त्यांच्या घरी जावून तासन तास गप्पा मारत बसत होता. त्यातच सुरजला दारू पिण्याचे व्यसन असल्याने एकदा त्याने साडू झालेल्या शुभमला त्यासाठी बसू या का? म्हणून विचारले होते. रावळे पाहुणे एकत्र आल्याने शुभमने काही आढेवेढे न घेता त्याच्याबरोबर ड्रिंक घेतली. त्यावेळेपासून ते दोघे साडू हे पार्टीच्या बहाण्याने भेटेल त्यावेळी दारूची पार्टी करत होते. कधी बारला तर कधी कुणाच्या तरी घरी अशी त्यांची पार्टी रंगायची. नवीन लग्न झाले असले तरी शुभम त्यात मुरलेला आहे हे सुरजने ओळखलेले होते.ते दोघे रावळे पाहूणे असल्याने त्या दोघांत पैसे देण्या घेण्याचा व्यवहार ही झालेला होता. सुरजने त्याला काही रक्कम हात उसणे दिलेली होती. त्याचे त्याला काही वाटत नव्हते.

शुभम हा पार्वती औदयोगीक वसाहतीतील एका कंपनीत कामाला जात होता. त्याला चांगला पगार ही होता. पण असेच तो आणि सुरज आणि त्याचे दोन मित्र दारूची आणि जेवणाच्या पार्टीला गेले असताना त्या पार्टीचे बील त्यांनी शुभमवर बसवले होते. ते पैसे तो सुरजला देणे लागत होता. शुभमच्या दृष्टीने हा व्यवहार गौण होता. लग्ना अगोदरपासून शुभम हा सुरजच्या घरी जात असल्याने त्याच्या पत्नीबरोबर त्याचे चांगलेच संबंध जुळालेले होते. त्यातूनच सुरजच्या पत्नीने आपल्या लहान बहिणीचे लग्न शुभमबरोबर लावून दिले होते. तो आपल्या घरी येऊन आपल्या पत्नीशी तासन तास लाडी गोडी लावीत बोलत असतो. तिच्याशी चेष्टामस्करी करीत असतो ही गोष्ट सुरजला खूपत होती. अलिकडे तर शुभमचे त्याच्या घरी येणे ही त्याला खटकत होते. आपल्या पत्नीबरोबर त्याचे संबंध आहेत याची त्याला खात्री पटलेली होती. कारण त्याची पत्नी ही शुभमबरोबर मोबाईलवरून त्याच्याशी बोलत होती. तर कधी व्हाटअपवरून चॅटिग करीत होते.त्या दोघांनी मोबाईलवरून केलेले चॅटिग सुरजने आपल्या पत्नीच्या माघारी चेक केले होते. त्यातून त्याची खात्री पटली की आपली पत्नी शुभमला चिकटली आहे. तिचे त्याच्याबरोबर संबंध आहेत. त्यातच शुभमच्या लग्नानंतर ती बऱ्याच वेळेला त्यांच्याकडे जात होती. पण बहिणीला भेटायला जाते असे सांगून ती शुभमला भेटायला जात होती असा अर्थ सुरजने काढलेला होता.

एकदा त्या दोघांनी भरपूर ड्रिंक केलेली होती. दोघेही दारूच्या नशेत तरळत होते.त्यावेळी त्याची त्याना कशाची शुध्द नव्हती. त्यावेळी दारूच्या नशेत सुरजने शुभमला तुझे माझ्या पत्नी बरोबर संबंध आहेत. असे विचारल्यावर शुभमने ही दारूच्या नशेत हा आहेत. तू काय करणार आहेस. माझे आणि तिचे संबंध माझ्या लग्नाअगोदर पासून आहेत. हे ऐकल्यावर सुरजचे डोकेच सटकले होते. त्याला काय करावे काय नको असे झाले होते. परंतू त्याने त्यावेळी संयम पाळत हा विषय टाळला होता. त्यानंतर त्याने या गोष्टीचा जाब आपल्या पत्नीला विचारला असता तिने याबाबत आपल्या कानावर हात ठेवला होता. त्यातूनच अलिकडे सुरजचे आणि त्याच्या पत्नीचे दररोज या विषयावरून भांडणे होऊ लागली होती. त्याला काय करावे आणि काय नको असे झालेले होते. आपल्या पत्नीने तिच्या लहान बहिणीचे लग्न त्याच्याशी का लावून दिले आहे? याचे कोडे त्याला आता सुटलेले होते.त्या दोंघाचे शारीरिक संबंध आला असल्याचा पुरावाही त्याला मिळालेला होता. अलिकडे तर सुरज हा कामावर न जाता तो जास्तच दारू पित होता.त्यातच त्याची ओळख ही जवाहरनगरमधील संकेत म्हेत्रे याच्याशी झालेली होती. संकेत हा शहरातील रावण टोळीशी संबंधीत असल्याने त्याच्यावर शहरातील तीन्ही पोलीस ठाण्यात वेगवेगळ्या प्रकारचे गुन्हे दाखल आहेत याची कल्पना सुरज याला होती. सुरज हा जवाहरनगर येथे एका कंपनीत कामाला जात होता.त्यातून त्या दोघांची सारखी भेट होत होती. सुरजने त्याला एकदा दारूच्या नशेत आपल्या मनातील सांगून आपल्या पत्नीचे आपल्या साडू बरोबर ते संबंध आहेत, याचा मला त्रास होतोय असे सांगितले यावर संकेत याने त्याला यातून मार्ग काढू तू काळजी करू नकोस असे सांगितले होते. त्याचवेळी संकेतने सुरजला सांगितले की मी पैसे घेऊन कुणाची ही गेम करू शकतो त्यानंतर सुरजने त्याची ही गोष्ट मनात ठेवून आपल्या पत्नीशी संबंध ठेवणाऱ्या शुभमला कायमचेच धडा शिकवूया असा विचार केला. तो परत एकनदा सेंकत याला त्या कामासाठी भेटला आणि त्याला शुभम कुडाळकर या साडूची गेम करण्याची सुपारी दिली. ती सुपारी काही लाखात नव्हती. तर काही हजारात होती.

घटनेच्या दिवशी म्हणजे शुक्रवार दि.२९ जानेवारी २०२१ रोजी सुरजने दुपारी शुभम याला दारू पाजली होती. त्याच्याकडून काही गोष्टींचा अंदाज घेतला होता. तो आज रात्री कामावर जाणार होता याची त्याला माहिती झालेली होती. त्यानंतर त्याने मित्र संकेत म्हेत्रे आणि कोरोची येथील संतोष बाडीगीर याला बोलावून घेतले त्यांनी संध्याकाळच्या वेळी जवाहनगर भागातील एका बारवर दारू ठोसली आणि आज शुभमची गेम करायची असा त्यांनी प्लॅन केला.त्यानंतर त्यांनी परत एकदा डेक्कन रस्त्यावरील एका बारमध्ये बसून दारू ठोसली. संकेत म्हेत्रे याला सुपारी मिळाल्याने तो तयारीनचे आला होता. त्याने आपल्या गाडीच्या डिकीत कोयत्या सारखे हत्यार ठेवलेले होते. रात्री आठ सव्वा आठच्या दरम्यान शुभम हा आपल्या मोटार सायकलने शहापूर मार्गे पार्वतीकडे कामावर चालला होता.खरे तर त्याला सुरजनेच त्या मार्गाने येण्यास सांगितले होते. शुभम हा तो रहात असलेल्या ठिकाणापासून महासत्ता चौकातून पार्वतीला जावू शकला असता.पण तो कामावर जाण्याअगोदर सुरजने त्याला फोनकरून शहापूर चौकात मी थांबलो आहे तिकडून ये असे सांगितले म्हणून तो घरातून डबा घेऊन गाडीवरून पार्वतीकडे चालला होता. शहापूर चौकात आल्यावर त्याला परत सुरजचा फोन आला. त्यावेळी त्याने मला तुझ्याकडून पैसे पाहिजे आहेत. त्या अगोदर आपण दारू पिवूया आणि नंतर तू कामावर जा, असे सांगून त्याला विनायक हायस्कुलजवळील पाण्याच्या टाकीमागील मोकळ्या पंटागणात बोलावून घेतले. त्या पंटागणात चार दोन अर्धवट बांधलेली मोडकी घरे आहेत व अंधार ही आहे डेक्कन कडून शहापूरकडे येणारे लोक या शॉर्टकट मार्गाचा अवलंब करीत असतात. त्या पंटागणात अंधारात सुरज त्याचे मित्र संकेत म्हेत्रे आणि सतोष बाडीगीर हे होते. शुभम तेथे आल्यावर सुरजचे काही तरी बोलणे झाले.आणि तो त्याच्या अगांवर धावून जावू लागला. त्यावेळी त्या तिघांनी त्याला लाथा बुक्कांनी मारहाण करीत खाली पाडले त्यावेळी कुणाला काही कळण्याच्या आतच संकेत याने आपल्या गाडीच्या डिकीतील कोयता काढून शुभमच्या डोक्यावर, मानेवर आणि चेहऱ्यावर सपासप असे वार केले. त्यासरशी तो रक्ताच्या थारोळ्यात निपचीप पडला. त्याचा मृत्यू झाल्याचे लक्षात आल्यावर ते तिघेही घटनास्थळावरून आपपल्या गाडीवरून पळून गेले. काही वेळातच त्या मार्गाने एक इसम आपल्या मोटार सायकलीवरून येत होता त्याला आपल्या गाडीच्या हेड लाईटच्या प्रकशात एक तरूण रक्ताच्या थारोळ्यात पडला असल्याचे दिसले बाजुलाच एक रक्ताने माखलेला कोयता आणि मोटार सायकल ही होती.हे बघून तो इसम घाबरला. त्याने रस्त्याच्या पलीकडे जावून या घटनेची माहिती काही जणांना सांगितली. तसे घटना स्थळी लोकांची गर्दी वाढली.त्यानंतर त्या इसमाने या घटनेची माहिती शहापुर पोलीस ठाण्याला दिल्यावर शहापूर पोलीस ठाण्याचे पो.निरी.प्रकाश निकम हे आपल्या सहकार्यास घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळाची पाहणी करून या घटनेची माहिती आपल्या वरिष्ठांना दिली.या घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधिक्षक जयश्री गायकवाड, पोलीस उपाधिक्षक बी.बी.महामुनी यांनी घटनास्थळी भेट देवून घटनेची माहिती घेऊन तपासाच्या योग्य त्या सुचना पोलीसांना केल्या. इचलकरंची शहरात या महिन्यातील ही खूनाची तिसरी घटना असल्याने पोलीस सर्तक झाले होते. घटनास्थळी आढळेलेल्या मोटार सायकलीच्या क्रमाकांवरून पोलीसांनी मयत तरूणाची ओळख शुभम कुडाळकर रा.मंगळवार पेठ अशी पटवेलेली होती. या घटनेची माहिती लागलीच पोलीसांनी मयताच्या घरच्या लोकांना दिली.ते ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी आयजीएम रुग्णालयात पाठवून दिला. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत शुभम याच्या भावाकडून घेतली होती.त्यावरून पोलीसांनी ही घटना विवाहबाहय अनैतिक संबंधातून घडल्याचा अंदाज आलेला होता. संशयीत आरोपीच्या शोधासाठी पोलीसांची दोन पथके वेगवेगळया भागात रवाना करण्यात आली. संशयीत आरोपीचे मोबाईल लोकेशन निपाणी भागातील तंवदी घाटातील एका खेड्यात दाखवत होते. पोलीस तेथे पोहोचे पर्यत आरोपी तेथून पळुन गेले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी आरोपीचे मोबाईल लोकेशन हे इचलकरंची शहराजवळील रेंदाळ येथील दाखवत होते. तेथे ते तिघे एका घरात पर्यत लपून बसलेले होते. त्या ठिकाणाहून आरोपीचा शोध घेऊन त्याना तेथून ताब्यात घेतले आणि त्यांना शहापूर पोलीस ठाण्याला आणले. तेथे त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता ते पोलीसांना उडवाउडवीचे उत्तरे देत होते. पोलीसांनी त्याना आपला पोलीसी खाक्या दाखवताच त्यांनी आपला गुन्हा कबुल करून तो का? आणि कशासाठी केला याची कबुली दिली. त्याच्या कबुलीनंतर पोलीसांनी शुभम कुडाळकर याच्या भावाच्या फिर्यादीवरून शुभम दीपक कुडाळकर (वय२६) याच्या खून प्रकरणी त्याचा साडू सुरज शामराव कुंभार (वय २७ रा.कुडचे मळा) संकेत उमेश म्हेत्रे (वय २३ रा.जवाहरनगर) आणि संतोष महानेंतेश बाडीगीर (वय २२.रा. कोरोची) याच्या विरोधात शहापूर पोलीस ठाण्यात गु.रजि.क्र. २३/२०२१ भा. दं. वी. कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याना रविवार दि.३१ जानेवारी रोजी मा.कोर्टासमोर उभे केले असता. त्याना मा.कोर्टाने ६ फेब्रूवारी पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याच्याकडून गुन्हयात वापरलेला कोयता आणि मोटार सायकली जप्त केल्या होत्या. या घटनेचा तपास शहापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरी.प्रकाश निकम पोलीस उप.निरी. राजेंद्र यादव सहाय्यक फौजदार. सुरज कोरवी, पो.हे.काँ.महेश कोरे, पोलीस नाईक ज्ञानेश्वर बांगर, पोलीस नाईक सुनिल पाटील, असिफ शिराजभाई, योगेश अवघडे, निलेश तांबे, पो.काँ.शशिकांत ढोणे, अर्जून फातले, संजय लाटकर, अमित भोरे, ताहिर शेख आणि जावेद आंबेकरी यांनी केला. या घटनेचा पुढील शहापूर पोलीस करीत आहेत. मेहुणीलाच आधी घरवाली मानून तिच्याशी संबंध ठेवले की ते कधी ना कधी उघड होतात आणि त्यातून अशी अघटित घटना घडते हेच या घटनेवरून दिसून येते.

08 TO 14 FEB 2021 - Page 3 (CRIME SANDHYA):Layout 1 06/02/2021 10:21 PM Page 1



## थोडक्यात वृत्तांत

### भिवंडीत ९३ लाखांची घरफोडी

भिवंडी : भिवंडी पोलीस उपायुक्त परिमंडळ क्षेत्रात मागील काही दिवसात चोरी हाणामारी च्या घटनां मध्ये कमालीची वाढ झाली आहे. नुकताच शहरातील कामतघर आशीर्वाद नगर भागात कामान महिला घराबाहेर गेली असता रात्री अकरा वाजताच्या सुमारास अज्ञात चोरट्याने घराचा कडीकोयंडा तोडून घरात शिरून कपाटाच्या लॉकर मध्ये ठेवलेले सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा ९३ लाख रुपयांचा ऐवज चोरी केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी फिर्यादी लिलाबाई लक्ष्मण वेमुल यांनी दिलेल्या तक्रारी वरून शहर पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### पत्नीस घेण्यास गेलेल्या पतीस मारहाण

भिवंडी : ऑर्केष्ट्रा बार मध्ये काम करणाऱ्या पत्नीस घेण्यासाठी गेलेल्या पतीस तू आमचा धंदा खराब करतोस असे बोलत बार व्यवस्थापका सह दोन अनोळखी व्यक्तींनी मारहाण केल्याची घटना नारपोली पोलीस ठाणे हद्दीतील आशीर्वाद बार येथे घडली आहे. नारपोली अजमेर नगर येथे राहणारा रमजान चांद पटेल हा युवक रात्री ११ वाजता आशीर्वाद या ऑर्केष्ट्रा बार या ठिकाणी आपल्या पत्नीस घरी घेऊन जाण्यासाठी गेला असता बार व्यवस्थापक रमेश जयवंत कैलाश पांडू याने तू आमचा धंदा मारतोस का? असे बोलून फिर्यादीची कॉलर पकडून शिवीगाळ केली तर त्या ठिकाणी आलेल्या दोन अनोळखी इसमांनी ठोशा बुक्याने व लाकडी दांडक्याने डोक्यास मारहाण केली. या बाबत जखमी रमजान चांद पटेल याने नारपोली पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून पोलिसांनी तिघां विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

### जिल्ह्यातील स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर पुरवठा करण्याची योजना

पालघर : अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या स्वयंसहाय्यता बचत गटांना मिनी ट्रॅक्टर व त्याची उपसाधने, कल्टिव्हेटर किंवा रोटॅव्हेटर व ट्रेलर खरेदी करणेसाठी उ्हढ (Direct Benefit Transfer) तत्वावर ९०% अनुदान (कमाल रक्कम रु.३.१५ लाख च्या मर्यदित) देण्याची योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविली जात आहे. सदर योजनेचा लाभ घेणेकरीता पालघर जिल्ह्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील बचत गटांनी आपले प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पालघर यांचे कार्यालयात सादर करावेत. या संबंधी अधिक माहितीकरीता आफरीन अपार्टमेंट, बी-विंग, पहिला मजला, रुम नं.१०७ येथिल कार्यालयाशी तसेच दुरध्वनी क्रमांक. ०२५२५-२५४२७७ वर संपर्क साधून जास्तीत जास्त बचत गटांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पालघर यांचेकडून करण्यात येत आहे.

### सामुहिक विवाह सोहळ्यातील जोडप्यास अर्थसहाय्य मिळणार

पालघर : महाराष्ट्रात अनुसूचित जाती (नवबौध्दासह), विमुक्त जाती, भटक्या जमाती (धनगर व वंजारीसह) विशेष मागास प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या मागासवर्गीय कुटूंबातील सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये सहभागी होऊन विवाह करणाऱ्या जोडप्यांना रु.२० हजार इतके अर्थसहाय्य तसेच सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेस प्रत्येक जोडप्यामागे विवाहासाठी रु. ४ हजार देण्याची योजना महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबविली जात आहे. या योजनेसंबंधी अधिक माहितीकरीता सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, पालघर आफरीन अपार्टमेंट, बी-वींग, पहिला मजला, रुम नं.१०६, १०७ रेल्वे फाटकाजवळ नवली, पालघर (पू.) येथिल कार्यालयाशी किंवा दूरध्वनी क्रमांक ०२५२५-२५४२७७ वर संपर्क साधावा.

### दिव्यांग व्यक्तींनी शिधापत्रिकेसाठी अर्ज करावे

पालघर : राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम, २०१३ नुसार अन्नधान्याचा लाभ मिळण्यासाठी ज्या दिव्यांग व्यक्तींना स्वतंत्र शिधापत्रिका हवी आहे, अशा दिव्यांग व्यक्तींनी नवीन शिधापत्रिकेसाठी संबंधित शिधावाटप कार्यालयाकडे अर्ज करावा. दिव्यांगाकडून स्वतंत्र शिधापत्रिकेसाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर शासनाने निश्चित केलेल्या निकषांतर्गत पात्र दिव्यांग व्यक्तींना नवीन अनुज्ञेय शिधापत्रिका व त्यानुषंगाने शिधापत्रिकेवर अनुज्ञेय असणारे लाभ तात्काळ देण्यात येणार आहेत. अधिक माहितीसाठी तहसिल कार्यालयाशी संपर्क साधावा.

### १ मार्च रोजी जिल्हा स्तरीय लोकशाही दिन

पालघर : कोव्हिड १९ च्या परिस्थितीमध्ये लोकशाही दिनाचे आयोजन परिस्थितीनुरूप करण्यात येणार आहे. जिल्हा स्तरीय लोकशाही दिन १ मार्च रोजी दुपारी १ वाजता जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांच्या अध्यक्षतेखाली गुगल मीट (Google Meet) द्वारे आयोजित करण्यात येणार आहे.

### ग्रामपंचायत निवडूक लढविणाऱ्या उमदावरांनी खर्चाचा तपशील मुदतीपूर्वी सादर करावा

लातूर : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवार यांनी निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यासाठी वेळ (Time) आणि रित (Manner) त्यानुसार उमेदवाराने नामनिर्देश भरल्यापूसन ते निकाल लागे पर्यंत केलेल्या खर्चांचा दैनंदिन तपशील प्रत्येक उमेदवाराने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कडे दुसऱ्या दिवशी दुपारी २.०० वाजे पर्यंत सादर करणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे उमेदवाराने निवडणूकीचा निकाल लागल्या नंतर खर्चाचा तपशील ३० दिवसाच्या आत तालुका स्तरावरील संबंधित प्राधिकृत खर्च पथकास सादर करणे आवश्यक आहे. उमेदवारने वेळ व रितया प्रामणे खर्चाचा तपशील सादर केला नसेल किंवा उमेदवारांचा एकूण खर्च मार्यादेपेक्षा जास्त असेल किंवा वेळ व रितयांचे पालन झालेले नसेल तर ग्रामपंचायत अधिनियमन कलम १४-ब नुसार संबंधित उमेदवार पाच वर्षाच्या कालावधीसाठी निर्रह करण्यात येईल, असे उप जिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) गणेश महाडिक यांनी एका पत्रकान्वये कळविले आहे.

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

# गंगाखेड येथील व्यापाऱ्याला लुटणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांची उत्कृष्ट कामगिरी

परभणी/रवि वाघमारे

गंगाखेड येथील एका व्यापाऱ्याला बंदूकीचा धाक दाखवून एक लाख ९५ हजार ५०० रुपयांना लुटणाऱ्या सराईत टोळीचा परभणी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने पर्दाफाश करीत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. याप्रकरणी तिघांना अटक केली असून अटक केलेल्या आरोपी कडून एक लाख ३ हजार रुपय, एक चाकी व बंदूक जप्त करण्यात पोलिसांना यश आले आहे.

याबाबत पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अशी की गंगाखेड येथील किराणा दुकानाचे व्यापारी कुणाल अनिल यानपल्लेवार हे २ फेब्रुवारी रोजी रात्री दुकान बंद करून दिवसभरातील व्यापारातून जमलेले एक लाख ९५ हजार ची रोकड एका बॅगमध्ये घेवून जात होते. दरम्यान ते देवळे जिनिंग परिसरात आले आसता अज्ञात चोरट्यांनी त्यांना अडवून मारहाण करीत बंदूकी सारख्या शस्त्राचा धाक दाखवून त्यांच्या जवळील बॅग हिसकावून दुचाकीवरून पोवरा केला. याप्रकरणी किराणा दुकानदार कुणाल अनिल यानपल्लेवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गंगाखेड पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांन विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणाचा शोध घेण्यासाठी जिल्हा पोलीस अधीक्षक जयंत मीन यांनी गंगाखेड पोलिसांसह स्थानिक गुन्हे शाखेचे दोन वेगवेगळे पथक स्थापन केले होते. यापथकात स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी अधिकारी व्यंकटेश आलेवार, साईनाथ पुयाड, हनुमान जेक्केवाढ, बाळासाहेब तुपसुंदरे, दिलावरखान पठाण, किशोर चव्हाण, अझहर शेख, हरिश्चंद्र खुपसे, मोबीन शेख, संतोष सानप, छगन सोनवणे, संजय घुगे, पिराजी निळे यांचा समावेश करण्यात आला. तपासा दरम्यान या लुट प्रकरणातील संशयीत आरोपी हे गंगाखेड येथील असून लूटमार करून ते उस्मानाबाद जिल्ह्यातील तुळजापूर येथे गेले आसल्याची गुप्त माहीती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक व्यंकटेश आलेवार यांना मिळाली. मिळालेल्या माहीतीवरून तात्काळ त्यांनी पोलिस पथकाला तुळजापूरच्या दिशेने रवान केले. दरम्यान या प्रकरणातील चार संशयीत आरोपी हे उस्मानाबाद जिल्ह्यातील बेंबळी पोलिस ठाणे हाद्दीतील उजणी - तुळजापूर रस्त्यावरील एका धाब्यावर जेवणास बसले असता तेथे त्यांनी धाबे मालकाशी जेवणाच्या ऑर्डर वरून भांडण करून हावेत गोळीबार केला आसल्याची माहीती पोलिसांना मिळाली. तसेच त्यातील एकाला बेंबळी पोलिसांन ताब्यात घेतले आसल्याचीही माहीती समोर आली. गोळीबार प्रकरणी उस्मानाबाद जिल्ह्यातील बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असल्याने उर्वरित आरोपींचा शोध घेत असताना परभणी येथील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला हे आरोपी पुणे येथे पळून गेल्याची माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुणे येथे जाऊन सापळा लावत आरोपी अर्जुन नागनाथ बनवणे, किशोर विठ्ठल भोसले, साहिल सुंदरराव उर्फ राकेश जाधव (राहणार खडकपुरा गंगाखेड) यांना ताब्यात घेतले. त्यानंतर त्यांची चौकशी केली असता त्यांच्या जवळ गोळीबार केलेली बंदुक आढळली तसेच गंगाखेडच्या व्यापाऱ्याला लुटलेल्या रकमेतील एक लाख ३ हजार ४०० रुपये सहा एक दुचाकी जप्त करण्यात आली. या आरोपीकडून आणखीन काही गंभीर गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांकडून वर्तविण्यात येत आहे.

पुढील तपास गंगाखेड पोलिस करीत आहेत. ही कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिस पथकाने तसेच सायबर शाखेचे सपोनि गुलाब बच्चेवार, बालाजी रेड्डी, गणेश कौटकर यांनी केली.

# कचरा वर्गीकरण करून घंटागाडीला द्यावा-मनपा

लातूर/प्रतिनिधी

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने घंटागाड्यांच्या माध्यमातून दररोज कचऱ्याचे संकलन केले जाते.शहरातील नागरिक व व्यावसायिक आस्थापनांनी कचऱ्याचे ओला-सुका आणि घातक असे वर्गीकरण करूनच तो घंटागाडीला द्यावा,असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. लातूर शहराला स्वच्छ, सुंदर, हरित, प्रदूषणमुक्त व सुदृढ ठेवण्यासाठी महापालिका योग्य त्या उपाययोजना करत आहे.यासाठीच शहरातील मुख्य रस्ते,अंतर्गत रस्ते आणि सर्व वसाहतीमध्ये दैनंदिन स्वच्छता केली जाते. प्रत्येक वसाहतीमधील रहिवाशांकडून घंटागाड्यांच्या माध्यमातून कचऱ्याचे संकलन केले जाते. जमा केलेल्या कचऱ्यावर महापालिकेकडून प्रक्रिया केली जाते. अनेक प्रभागात घरातील कचरा घरातच कुजविण्याच्या उपक्रमही पालिकेने राबवलेला आहे. त्याला चांगला प्रतिसादही मिळाला असून डेपोवर जाणाऱ्या कचऱ्यात घट झाली आहे. घंटागाडीला कचरा देत असताना नागरिकांनी ओला, सुका व घातक असे तीन प्रकारात त्याचे वर्गीकरण करून तो द्यावा, असे आवाहन पालिकेने यापूर्वीही केलेले आहे.कचरा वर्गीकरण करून दिला तर पुढील प्रक्रियेसाठी सोपे जाते.याशिवाय ओला व सुका आणि घातक कचरा वेगवेगळ्या ठिकाणी प्रक्रियेसाठी पाठवता येतो. त्यामुळे शहरातील नागरिकांनी कचऱ्याचे तीन प्रकारात वर्गीकरण करूनच तो घंटागाड्याना द्यावा,असे आवाहन महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. जे नागरिक कचरा घंटागाड्यांना न देता खुल्या प्लॉटमध्ये, रस्त्यावर टाकतील, त्यांच्यावर पालिकेच्या वतीने दंडात्मक कारवाई केली जाणार आहे.अशी कारवाई सुरू करण्यात आली आहे.त्यामुळे नागरिकांनी पालिकेला सहकार्य करावे आणि दंडात्मक कारवाई टाळावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# उपशिक्षणाधिकारी आणि तत्सम पदे पदोन्नतीने भरण्याची मागणी

लातूर/प्रतिनिधी

महाराष्ट्र शिक्षण सेवा गट ब मधील उपशिक्षणाधिकारी व तत्सम पदे अभावितपणे पदोन्नतीने भरण्यासंदर्भात त्वरित आदेश निर्गमित करावेत,या मागणीचे निवेदन जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर यांना देण्यात आले.राज्य शासनाने ९ ऑगस्ट २०१९ रोजी राज्यातील उपशिक्षणाधिकारी व तत्सम रिक्त पदे जिल्हा तांत्रिक सेवा गट क मध्ये येणाऱ्या जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षकांमधून सेवाजेष्ठतेने अभावितपणे पदोन्नतीने त्वरित भरण्याचा निर्णय घेतला होता. यासंदर्भात शालेय शिक्षण विभागाने ११० माध्यमिक जिप शिक्षकांचा प्रस्ताव सामान्य शिक्षण विभागाकडे पाठवून प्रस्तावाला मान्यता घेतली होती. नंतर तो वित्त विभागाकडे मान्यतेसाठी पाठवून देण्यात आला. शेवटच्या टप्प्यात उमेदवारांकडून महसूल विभागाची निवड आणि बंधपत्र घेऊन पदोन्नतीचे आदेश देणे बाकी आहे.परंतु ही प्रक्रिया रखडली आहे. राज्यात उपशिक्षणाधिकारी व त्यासारखी शेकडो पदे रिक्त आहेत.त्या यादीतील सेवाजेष्ठ माध्यमिक शिक्षक निवृत्त होत आहेत.त्यामुळे हा आदेश त्वरित निर्गमित होणे आवश्यक आहे. जिल्हा पातळीवर भरली जाणारी मुख्याध्यापकांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. शालेय प्रशासन व गुणवत्तेवरच याचा मोठा परिणाम होत आहे.त्यामुळे अभावितपणे पदोन्नतीचे आदेश काढून जिल्हा पातळीवर राजपत्रित मुख्याध्यापकांची पदे तात्काळ भरावीत,अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष के.एस.घाटीवाले, कार्याध्यक्ष जी.के.पैंजणे, सरचिटणीस एम.पी.गुंडरे, कोषाध्यक्ष एम.डी.मोरे, बेजगमवार आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत. जिल्हा परिषद शिक्षक बदली धोरण २०२१-२२ साठी शिक्षक या व्याख्येत जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षकांचा समावेश करण्याचे निवेदनही दरेकर यांना देण्यात आले आहे.बदली धोरणासंदर्भात विविध शिक्षक संघटनांची नाराजी आहे. शिक्षक या व्याख्येत माध्यमिक शिक्षकांचा समावेश करण्यात आलेला नाही. बदली धोरणासाठी हा समावेश आवश्यक आहे. राज्यात मराठवाडा आणि विदर्भातच ३७९ जिल्हा परिषद माध्यमिक शाळा आहेत.इतर विभागात एकही माध्यमिक शाळा नाही. त्यामुळे माध्यमिक शिक्षक दुर्लक्षित आहेत. माध्यमिक शिक्षकांचा शिक्षक या व्याख्येत समावेश करण्यासाठी ग्रामविकास मंत्रालयास शिफारस करावी, अशी मागणीही भाजपाचे तालुका चिटणीस गुलाब कच्छवे यांच्यावतीने एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# गणेशपुरी येथे गरम पाण्याची कुंड उघडण्याचे आदेश देऊनही बंदच!




भिवंडी/अभिजित हिरे

भिवंडी तालुक्यातील श्री क्षेत्र गणेशपुरी नित्यानंद बाबा ची पवित्र कूंड ही कोरोनाच्या प्रादुर्भाव मूळे आठ महीने बंद होती. मात्र येथील भीमेश्वर सदगुरु नित्यानंद संस्थान चे चेअरमन रामचंद्र शेनॉय यांनी सदर कुंड उघडण्या चे लेखीआदेश देऊनही येथील व्यवस्थापीका यांच्या मनमानीमुळे अद्याप बंद असल्याने गणेशपुरी ग्रामस्थ व भक्तगणां मध्ये संताप व्यक्त केला जात आहे. गेल्या काही महिने कोरोना या महामारी मुळे येथील सुपरिचित अशा स्वामी नित्यानंद महाराज समाधी मंदिर परिसातील गरम पाण्याचे कुंडे हे बंद करण्यात आले तबल आठ महिन्या नतंर महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री उद्धवजी ठाकरे साहेब यांनी दीपावली पाडव्यानतंर सर्व व्यवहार सूरू करण्याचा आदेश दिला. परंतु श्री क्षेत्र गणेशपुरी मधील नेहमी प्रमाणे श्री नित्यानंद बाबाची पवित्र कूंड ही बंदच आहेत. तसेच पूर्ण मंदिर परिसरात बॅरिकेटर लावून देऊळ बंदिस्त केले आहे.

श्री भीमेश्वर सद्गुरु नित्यानंद संस्थाचे चेअरमन रामचंद्र शेनॉय, स्थानिक विश्वास्त मुरलीधर हेगडे यांनी स्वतः लेखी निवेदन देऊन देखील येथील व्यवस्थापीका अपर्णा पाटील यांच्या मनमानी मुळे कुंडे आद्यप उघडली जात नसल्याने येथील ग्रामस्थ व भाविकांच्या भावना दुखावल्या जात असल्याने परिसरात प्रचंड संताप व्यक्त केला जात असून सदर व्यवस्थापिका अपर्णा पाटील यांच्या वर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# भिवंडीत दिवसा पेंटर काम तर रात्री बाईक चोरी करणाऱ्यास अटक सहा बाईक जप्त

भिवंडी/प्रतिनिधी



भिवंडी शहर व परिसरात दिवसभर घराघरांमध्ये पेंटरचे काम करणारा कारागिरीच रात्री बाईक लंपास करणारा चोरटा निघाल्याची घटना भिवंडीत समोर आली आहे. विशेष म्हणजे दिवसा बाईक असलेल्या ठिकाणांची रेकी करून रात्री बाईक चोरी करीत असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून पोलिसांनी या पेंटर बाबू असलेल्या दुचाकी चोरट्यास अटक केली आहे. अब्दुला मोहंमद तकी शेख (२२) असे या बाईक चोरट्याचे नाव आहे. भिवंडी शहरात दिवसांगणिक ४ ते ५ दुचाकी चोरीच्या घटना घडतच असून अशीच एक दुचाकी भिवंडीतील देवजीनगर मधील एका इमारतीत राहणारे अहमद शेख यांची दुचाकी इमारतीच्या पार्किगमधून २७ जानेवारी रोजी रात्रीच्या सुमारास चोरीस गेली होती. त्यांनी याप्रकरणी भोईवाडा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपाससुरु केला असता खबऱ्याकडून वरिष्ठ पोलीस निरीक्षक एस. ए. इंदलकर यांना एक युवक कमी किंमतीत दुचाकी विकत असल्याची खबर मिळाली असता त्याआधारे पोलीस उपनिरीक्षक तानाजी वाघ,सहायक पोलीस निरीक्षक टी.बी. वाघ, पोना गोरले, पोशी. सूर्यवंशी, कुंभार, कवडे, गायकवाड यापोलीस पथकाने बनावट ग्राहक पाठवून कमी किंमतीतचोरीची दुचाकी विकताना चोरट्या अब्दुलला ताब्यात घेत त्याच्या कडे कसून चौकशी करीत चोरट्या पेंटर बाबू अब्दुला कडून पोलिसांनी विविध पोलीस ठाण्याच्या हद्दीतुन चोरीस गेलेल्या २ लाख ३५ हजार रुपये किमतीच्या सहा बाईक हस्तगत करण्यात यश मिळविले आहे. विशेष म्हणजे दुचाकी लंपास करून चोरटा त्या मोकळे मैदान असलेल्या ठिकाणी पार्किग करून ठेवत त्या चोरीच्या बाईक कमी किमतीत विक्री करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

# पळशी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी वर्षा भंडारे तर उपसरपंचपदी दशरथ जाधव

लातूर : रेणापूर तालुक्यातील पळशी ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी वर्षा गुणवंत भंडारे तर उपसरपंचपदी दशरथ गोविंदराव जाधव पाटील यांची वर्णी लागलेली आहे. त्यांची ही निवड अध्याशी अधिकारी सचिन नरसिंगराव नरहारे, ग्रामसेवक रविंद पारेकर, तलाठी महेश साळुंके, नरसिंग जाधव यांच्या उपस्थितीत करण्यात आली. पळशी गावचे सर्वेसर्वा देविदासरावभाऊ जाधव यांच्या नेतृत्वाखालील आदर्श ग्रामविकास पॅनलच्या विजयामुळे गावच्या विकासाला आता चौफेर गती मिळणार आहे. आदर्श ग्रामविकास पॅनलच्या माध्यमातून उद्योजक उध्दवराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली निवडून आलेल्या उमेदवारापैकी वर्षा गुणवंत भंडारे यांची पळशीच्या सरपंचपदी तर उपसरपंचपदी दशरथ गोविंदराव जाधव यांची वर्णी लागलेली आहे. त्यांच्या या निवडीमुळे पळशीच्या विकासाला आता चौफेर गती मिळणार आहे. नुतन ग्रामपंचायत सदस्यांच्या निवडीमध्ये मिरा परमेश्वर जाधव, अंजलीताई चंद्रकांतराव जाधव, गंगाधर रानबा शिंदे, वंदना नानासाहेब पुरी, दिपा नामदेव उपाडे आदीचा समोवश आहे. त्यांच्या या निवडीबद्दल उद्योजक उध्दवराव जाधव, खंडू पवार, दिगंबर जाधव, दगडूसाहेब जाधव, बब्रुवान शिंदे, हणमंत जाधव, चंद्रकांत जाधव, मनोज जाधव, परमेश्वर जाधव, दत्ता भोसले, गुणवंत भंडारे, केशव गिरी, सिध्देश्वर जाधव, केशव पांचाळ, बाळासाहेब जाधव, विठ्ठल भारती, श्रीनिवास जाधव, मोतीराम जाधव, पांडूरंग जाधव, हाणमंत जाधव, राजाभाऊ जाधव, पवन जाधव, धनेश्वर शिंदे, काका शिंदे आदींनी अभिनंदन केले.

# भिवंडीतील देहविक्री वस्तीला सावकारी पाश; बांगलादेशी महिलांचा सुळसुळाट

भिवंडी/प्रतिनिधी

भिवंडी शहरातील हनुमान टेकडी या देहव्यापार करणाऱ्या महिलांच्या वस्तीत बांगलादेशी महिलांचे प्रमाण वाढत असल्याने ही वस्ती सावकारी पाशात अडकल्याने याकडे पोलीस यंत्रणेने लक्ष द्यावे अशी करूण कहाणी येथील महिलांनी सांगितली. हनुमान टेकडी येथील वस्तीत तब्बल तीनशेहून अधिक महिला देह व्यापार करून आपल्या पोटाची खळगी भरत असताना येथील महिला व्याजी पैसे देणाऱ्या सावकाराच्या पाशात सापडल्या असून या महिलांनी लॉक डाऊन काळात आपला व्यवसाय बंद ठेवून शासनाला मदत केली असताना या दरम्यानच्या काळात खोली भाडे, गावी कुटुंबियांना पैसे देण्यासाठी स्थानिक सावकारां कडून अव्वाच्या सव्वा व्याज देऊन ही या सावकारां कडून पैसे वसुली साठी तगादा लावला जात असल्याने येथील महिलां कडून दररोज १०० ते ५०० रुपये वसूल केले जात असून पैसे न देणाऱ्या महिलांना मारहाण ही होत आहे पण सावकारांच्या भीतीने त्या कोणाकडे ब्र शब्द ही तक्रार करू शकत नसल्याची खंत काही महिलांनी बोलून दाखविली. तर या देह व्यापार करणाऱ्या वस्तीत महाराष्ट्रा सह कर्नाटक, तेलंगणा, आंध्रप्रदेश, बिहार, नेपाळ येथील महिलांचे वास्तव्य असतानाच मागील काही वर्षात येथे बांगलादेश येथील महिला अनाधिकृत मार्गाने आणून देह व्यापारात लोटल्या गेल्या आहेत. बांगलादेशातील व्यक्तींचा शोध घेऊन त्यावर सर्वत्र कारवाई केली जात असताना या भागात तशी कारवाई कधी न झाल्याचे बोलले जात नसून त्यामाध्यमातून काही देश विघातक कृत्य करणारे या परिसरात शिरकाव करीत असल्याचे बोलले जात आहे. या बाबत स्थानिक शहर पोलीस कोणतीच कारवाई करताना दिसत नसल्याने देहविक्री



करणाऱ्या महिला या सावकारी पाशातून कधी मुक्तता होईल या विवंचनेत आहेत.

08 TO 14 FEB 2021 - Page 4 (CRIME SANDHYA):Layout 1 06/02/2021 10:21 PM Page 1



कोणत्याही पक्षाचा लोकप्रतिनिधी म्हटलं की त्याला जनतेच्या समस्यांची जाणीव असावी लागते. कारण त्या समस्या सोडवण्यासाठी लोकांनी त्याला निवडून दिलेले असते. पण आजकाल सत्ता मिळाली की जनतेतून निवडून गेलेल्या माणसाला जनतेच्या समस्यांचा विसर पडतो आणि अशा माणसाला निवडून दिल्याबद्दल मग पाच वर्ष पश्चाताप करण्याची पाळी लोकांवर येते. कोरोनाच्या संकट काळात कुठल्या पक्षाच्या किती लोकप्रतिनिधींनी लोकांना मदत केली हा खरोखरच संशोधनाचा विषय आहे. कोरोनचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जो लॉकडाऊन करण्यात आला त्यात लोकांनी खूप काही भोगले आहे. पण आता कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झालंय. लस आलीय अनलॉक प्रक्रियेअंतर्गत उद्योग धंदे सुरू होत आहेत. लोकांचे जनजीवन हळूहळू पूर्वपदावर येत आहे. लोक या संकटातून स्वतःला सावरण्याचा प्रयत्न करीत आहेत. आपली आर्थिक गाडी हळूहळू रुळावर आणण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशावेळी सरकारने लोकांना सहकार्य करायला हवे. पण सरकारच लोकांसमोर अडथळे निर्माण करीत आहेत. चुकीचे निर्णय घेऊन लोकांच्या अडचणीत भर घालीत आहे. मुंबईची लोकल ट्रेन ही केवळ मुंबईकरांची नव्हे, तर मुंबईच्या बाहेरून मुंबईत कामाधंद्याला येणाऱ्या लोकांची जीवन वाहिनी आहे. मात्र लॉकडाऊनचा काळात कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी लोकल ट्रेन तब्बल पाच महिने बंद ठेवली. त्यानंतर अनलॉक प्रक्रियेअंतर्गत उद्योगधंदे सुरू व्हायला लागल्यानंतर अत्यावश्यक सेवेतील लोकांसाठी लोकल ट्रेन सुरु करण्यात आली आणि फेब्रुवारी २०२१पासून सर्वांसाठी लोकल ट्रेन सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला. पण त्याच्या ज्या वेळा ठरवण्यात आल्या त्या भीक नको पण कुत्रे आवर असं म्हणायला लावणाऱ्या आहेत. अगोदरच मार्च ते जानेवारी अशा तब्बल ११ महिन्याच्या कालावधीत सर्वसामान्यांना लोकल ट्रेन बंद करण्यात आली आणि आता

# येड्याचा बाजार प्रवासी बेजार!

वर्षभराने सर्वसामान्यांना लोकल ट्रेनच्या प्रवासाची जी मुभा देण्यात आलीय ते टाईम टेबलच चुकीचं आहे. पहिल्या लोकल ट्रेन पासून म्हणजे साधारण पावणेचार ते सकाळी सात त्यानंतर दुपारी बारा ते चार आणि रात्री नऊ नंतर शेवटच्या ट्रेन पर्यंत सर्व सामान्यांना प्रवासाची मुभा आहे. त्यामुळे जे काम धंद्याला जाणारे लोक आहेत त्यांना या वेळात लोकलचा काहीच उपयोग नाही. कारण सकाळी सात ते दहा ही लोकांच्या कामाची वेळ असते. या वेळेतच मुंबईच्या उपनगरातील किंवा मुंबईच्या बाहेरचा प्रवासी कामावर जाण्यासाठी लोकलने प्रवास करीत असतो, पण नेमक्या याच वेळात सरकारने त्याला लोकल प्रवासाची मुभा नकरली आहे. मग लोकल सर्वांसाठी सुरू करून फायदा काय. बरे संध्याकाळी तोच प्रकार सकाळी ७ ते १० या वेळेत ड्युटीवर जाणारा माणूस साधारणत ५ ते ७ या वेळात कामावरून सुटतो. पण त्या वेळेत त्याला घरी परतण्यासाठी लोकल ट्रेनच्या प्रवासाची मुभा नाही. म्हणजे ५ किंवा ६ वाजता कामावरून सुटलेल्या माणसाने रात्री ९ वाजेपर्यंत रेल्वे प्लॅटफॉर्मवर बसून लोकल ट्रेनची वाट बघायची! रेल्वेचे हे टाइम टेबल म्हणजे सर्वसामान्य प्रवासी आणि खास करून नोकरदार माणसाची पिळवणूक आहे. सरकारमध्ये जे कुणी बसले आहेत त्यांनी अक्कल गहाण ठेवली आहे का? सरकार म्हणून काम करताना अशा प्रकारे लोकांची छळवणूक करून तुम्हाला काय मिळणार आहे. कारण अगोदरच लॉकडाऊनच्या आगीत माणूस इतका होरपळून निघालाय की त्याला सावरायला आणखी काही वर्ष लागतील. सरकारमध्ये बसलेल्यांना काय त्यांनी झोल झपाटे करून पुढच्या सात पिढ्यांना पुरेल इतका पैसा कमावून ठेवलंय त्यांना लॉकडाऊन १० वर्ष चालला असता किंवा लोकल ट्रेन कायमची बंद ठेवली असती तरी फरक पडला नसता. कारण त्यांच्याकडे आलिशान गाड्या आहेत. पण जो सामान्य माणूस आहे, तो मात्र लोकल ट्रेन, एसटी बसेस, रिक्षा, टॅक्सी या सारख्या वाहनांवर अवलंबून असतो. लॉकडाऊनच्या काळात प्रवासाची ही सगळी साधनं बंद असल्याने खाजगी कार्यालयात, कंपनीत, काम करणारे लोक तसेच ज्यांचे हातावर पोट आहे असे हमाल, घरगडी, रिक्षा, टॅक्सीवाले, फेरीवाले यांचे अतोनात हाल झाले होते. निदान आता सर्व सुरू झालेले आहे. अशावेळी तरी त्यांना कामाधंद्याला जाण्यासाठी वेळेवर प्रवासाची साधने उपलब्ध करून द्या. पण तिथेही लोकांची गैरसोय करणार असाल तर लोक आता शांत बसणार नाहीत. कारण लोकांची सहनशीलता संपलीय. कोरोनाच्या संकट काळात लोकांनी त्यांची जबाबदारी ओळखून सरकारला सहकार्य केले, एसटीच्या प्रवासात कामाला जाताना तीन आणि घरी येताना तीन असे सहा तास लागायचे. लोकांनी तेही सहन केले, पण आता कोरोनाच प्रादुर्भाव ओसरला आहे. शिवाय कोरोना प्रतिबंधक लस उपलब्ध आहे. असे असताना लोकांची अडवणूक का करताय? सर्वसामान्यांना लोकल ट्रेनच्या प्रवासाची मुभा देताना अटी आणि शर्थीचे अडथळे का आणीत आहात? लोकल ट्रेनच्या प्रवासाबद्दल सरकारने जी जी धोरणे आखली ती सगळी चुकीची आणि लोकांसाठी त्रासदायक होती. सरकारने सुरवातीला आत्यावश्यक सेवेतील लोकांसाठी ट्रेन सुरु केली. या अत्यावश्यक सेवेत वैद्यकीय सेवाही येत असल्याने या सेवेतील डॉक्टर आणि इतर मेडिकल स्टाफसाठी लोकल प्रवासाची मुभा होती. पण ही वैद्यकीय सेवा ज्या आजारी लोकांसाठी आहे त्यांना मात्र लोकल प्रवासाची मुभा नव्हती हा कुठला न्याय? सरकारच्या या चुकीच्या धोरणामुळे मुंबईच्या सरकारी रुग्णालयात उपचार सुरू असलेले पण मुंबईच्या बाहेर राहणारे लोकं उपचारविना तेथेच तफडून मेले. कारण त्यांना लोकल ट्रेनच्या प्रवासाची मुभा नसल्याने ते मुंबईला जाऊन उपचार करून घेऊ शकत नव्हते. बरे असे रुग्ण ज्या ठिकाणी राहतात तिथल्या खाजगी रुग्णालयात महागडे उपचार करून घेण्याऐवढे लोकांकडे पैसे नव्हते आणि लोकांची ही गैरसोय केवळ सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे झाली होती आणि आताही सरकार तेच करतेय. लोकलचा प्रवास सर्वसामान्यांना सुरू करताना अटी आणि शर्थी कशासाठी? या संपूर्ण महाराष्ट्रात उध्दव ठाकरे सोडले, तर कोरोनाला कुणीही घाबरलेले नाही. प्रत्येक जण आपापल्या परीने स्वतःच्या जीवाची काळजी घेत कामा धंद्याच्या निमित्ताने घराबाहेर पडतोय. ज्यांना कोरोना होऊन गेला असे उद्धव ठाकरेंचे मंत्रीही आपापल्या मतदार संघात जनतेच्या कामाच्या निमित्ताने फिरत आहेत. मग उध्दव ठाकरेंनाच कोरोनाची इतकी भीती का वाटते आहे? आणि त्यांना वाटतं असलेल्या भीतीचे सर्वसामान्य लोकांना परिणाम भोगावे लागत आहेत. कारण सर्वसामान्यांना लोकल ट्रेनचा प्रवास खुला करावा. या लाखो लोकांच्या मागणीला उध्दव ठाकरें यांचा सुरवाती पासूनच विरोध आहे. म्हणूनच आताही लोकांच्या दबावामुळे लोकल ट्रेन सर्वांसाठी खुली करताना त्यांनी भयंकर अटी घातल्या आहेत. आणि रेल्वे खाते जरी केंद्र सरकारच्या अखत्यारीत असले तरी लोकल ट्रेन कशा प्रकारे सुरू करावी हे ठरवण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य सरकारवर होती. त्यानुसार राज्य सरकारने भयंकर अटी घालून लोकल ट्रेन सर्वांसाठी खुली केली, पण तिच्या वेळा पूर्णपणे चुकीच्या आणि गैरसोयीच्या आहेत. त्यामुळे येडयांचा बाजार आणि प्रवासी बेजार असे म्हणण्याची पाळी प्रवाशांवर आलीय.

# कर्मदरिद्री विरोधक







भाजपचे जातीयवादी राजकारण या देशासाठी हानिकारक आहे. त्याच बरोबर या देशातील दलीत मुस्लिम आणि ओबीसी यांच्या अस्तित्वालाच भाजपच्या कट्टर हिंदुत्वामुळे धोका निर्माण झाला आहे. अशा स्थितीत जातीयवादाला रोखण्यासाठी या देशातील सर्व विरोधी पक्षांनी एकत्र यावे असे या देशातील जनतेला वाटत आहे. पण विरोधक मात्र जनतेचा हा आवाज ऐकायला तयार नाहीत. त्यांना आपापल्या पक्षाच्या अस्तित्वाची काळजी वाटतेय. पण त्यांचे हेच धोरणं जर कायम राहिले, तर या देशात भाजपला कुणीही रोखू शकणार नाही आणि त्यांची या देशाला हिंदु राष्ट्र बनवण्याची योजना सफल होईल आणि तसे जर झाले तर या देशातील दलीत मुस्लिमांचे आणि ओबीसीचे काय होईल याची कल्पनाही कुणी करू शकणार नाही. सध्या या देशात विरोधकांकडे काही मोजकीच राज्ये आहेत, त्यात पश्चिम बंगाल हे प्रमुख राज्य आहे. पश्चिम बंगालचा आजवरचा इतिहास पाहता इथे येथे जाती धर्माचे राजकारण कधीही यशस्वी झाले नाही. कारण इथले डावे राज्यकर्ते बुद्धीवादी होते. जाती धर्माच्या राजकारणापेक्षा त्यांना राज्याचा विकास आणि एकात्मता महत्वाची वाटायची. त्यामुळे ज्योती बसू असो की बुद्ध देव भट्टाचार्य असो या नेत्यांनी बंगाल मधील शांततेला कधीही धक्का लागणार नाही याची सतत काळजी घेतली. मात्र कम्युनिस्ट पक्षाची सत्ता जाऊन ममता बॅनर्जी यांची सत्ता येताच पश्चिम बंगाल मधील चित्रच बदलले. ममता या कॉंग्रेस मधील फुटीर असल्याने त्यांनी जरी स्वतःचा तृणमूल कॉंग्रेस पक्ष काढून बंगालची सत्ता हाती घेतली. तरी एकाच वेळी त्यांना कॉंग्रेस कम्युनिस्ट आणि आता भाजप अशा तीन तीन पक्षांचा मुकाबला करावा लागत असल्याने बंगाल मधील वातावरण बिघडले आणि आता तर भाजपने बंगाल मध्ये अशी काही मुसंडी मारली आहे की ममताने किती जरी प्रयत्न केले तरी बंगाल त्यांच्या हाती राहू शकत नाही. कारण भाजपने पद्धतशीरपणे तृणमूल कॉंग्रेस फोडायला सुरुवात केली आहे. या फुटिमुळेच मागील लोकसभा निवडणुकीत भाजपला मोठे यश मिळाले आणि आता तर भाजपा बंगालच्या गाव गावात पोहचून वातावरण तयार करीत आहेत. दलितांच्या घरी जाऊन त्यांच्या पंक्तीला बसत आहेत. पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपने सुरू केलेली ही नौटंकी ममतासाठी धोक्याचा इशारा आहे आणि याचीच जाणीव झाल्यामुळे ममताने डावे आणि कॉंग्रेसकडे मदतीचा हात पुढे केला आहे, पण दोघांनीही नकार दिलाय. त्यामुळे जर आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप, ममता आणि कॉंग्रेस डावी आघाडी यांच्यात तिरंगी लढत झाली, तर भाजपने ममतांच्या विरोधात जी हिंदुत्ववादी व्होट बँक तयार केली आहे तिच्या जोरावर भाजपला मोठे यश मिळेल आणि ममतासह भाजपच्या सगळ्या विरोधकांना आपल्या कर्मदरिद्री धोरणावर डोकं आपटून घ्यावं लागेल. कारण आजवर जो बंगाली माणूस आपल्या जाती धर्माची ओळख विसरून केवळ बंगाली अस्मितेसाठी एक बंगाली बनून जगत होता तो आता हिंदुत्ववादी बनत चालला आहे आणि हाच माणूस आता भाजपचा मतदार बनला आहे. त्यामुळे जर विरोधक एकत्र आले नाहीत, तर त्यांचा पराभव अटळ आहे. या देशाच्या राजकारणात आज सगळ्यात वाईट अवस्था जर कोणाची असेल तर मुस्लिम समाजाची! कारण कट्टर हिंदुत्ववादी मुस्लिम समाजाला टार्गेट करीत आहेत. मोब लींचींगचे सर्वात जास्त शिकार मुस्लिम लोक बनत आहेत. आणि हे सर्व ठाऊक असताना ओवेसी सारखे लोक मुस्लिम समाजाला आपल्या दावणीला बांधून त्यांचे वेगळे अस्तित्व राखण्याचा प्रयत्न करीत आहेत. बिहारमध्ये अशाच प्रयत्नात ओवेसींच्या पक्षाला ५ जागा मिळाल्या तर इतर ठिकाणी एमआयएमने राजद कॉंग्रेस आघाडीच्या उमेदवारांची मते कापण्याचे काम केले. त्याचा फायदा भाजपला झाला आणि भाजपला बिहारमध्ये कधी नव्हते इतके प्रचंड यश मिळाले. तोच प्रकार पश्चिम बंगालमध्ये होणार आहे. कारण पश्चिम बंगाल विधानसभेची निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच ओवेसी कामाला लागला आहे आणि त्याला आता बंगाल मधील आणखी एका ताकत वर मुस्लिम नेत्यांची साथ मिळाली आहे. त्यामुळे जर ओवेसीने प्रत्येक मतदार संघातील मुस्लिम मते आपल्याकडे वळवली तर त्याचा सर्वाधिक फायदा अर्थातच भाजपला होणार आहे. अर्थात या सगळ्या खटाटोप करण्यामुळे ओवेसीची बंगालमध्ये सत्ता येणार नाही आणि मुस्लिम समाजाला न्यायही मिळणार नाही. उलट जर बंगालमध्ये भाजपची सत्ता आली, तर तिथल्या मुस्लिम समाजाला जगणे मुश्किल होईल. ओवेसींच्या भूमिकेचा विचार करता ओवेसीचां एमआयएम हा पक्ष भाजपची बी टीम आहे असे जे म्हटले जाते ते काही खोटे नाही. ओवेसी बंगालमध्ये मुस्लिमांची स्वतंत्र मोट बांधून अप्रत्यक्षपणे भाजपला मदतच करीत आहे. त्यामुळे मुस्लिम समाजाने या सगळ्याचा विचार करणे गरजेचे आहे. ओवेसींच्या मागे जाऊन भाजपला अप्रत्यक्ष मदत करायची की भाजपला रोखण्यासाठी डावे कॉंग्रेस आणि तृणमूल यांना एकत्र आणण्यासाठी या पक्षांवर दबाव टाकायचा हे ठरवण्याची वेळ आली आहे. कारण पूर्वोत्तर राज्यांपैकी आसाम खालोखाल पश्चिम बंगालमध्ये मुस्लिमांची संख्या लक्षणीय आहे. बंगला देश मुक्ती संग्रामात पूर्व पाकिस्तानातील मोठ्या संख्येने मुस्लिम भारताच्या आश्रयाला आले होते आणि पुढे ते आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये कायमचे स्थायिक झालेत आणि याच मुस्लिमांच्या जोरावर ओवेसी भाजपला छुपी मदत करतोय. कारण बंगाल मधील प्रत्येक मतदार संघात कॉंग्रेस डावे किंवा तृणमूल कॉंग्रेसला जाणारी मुस्लिमांची मते जर ओवेसीच्या एमआयएमच्या पारड्यात पडली तर विरोधकांच्या मतांमध्ये फूट पाडून भाजपचा मार्ग सोपा होईल. म्हणूनच मुस्लिम समाजाने या खलनायकाची चाल ओळखून त्याला दूर ठेवावे अन्यथा पश्चिम बंगालमधील मुस्लिम बांधवांना अनेक कठीण समस्यांना तोंड द्यावे लागेल. त्याच बरोबर डावे पक्ष आणि कॉंग्रेस यांनी आप आपल्या शूद्र राजकारणाचा विचार करू नये. कारण कॉंग्रेस आणि डावे यांची आघाडी निदान सध्याच्या परिस्थितीत तरी सत्तेपर्यंत पोचू शकत नाही. या उलट त्यांनी भाजपच्या विरोधात लढण्यासाठी तृणमूल कॉंग्रेसला बरोबर घेतले आणि आघाडी केली, तर मुस्लिम समाजाचा सुद्धा या आघाडीवर विश्वास बसेल आणि भाजपला सत्तेसाठी मदत करण्याचे ओवेसींचे मनसुबे सफल होणार नाहीत. विरोधी पक्षांमध्ये जेबकाही मतभेद होते किंवा आहेत त्या मतभेदांमुळे जर ते एकत्र येणार नसतील आणि वेगवेगळे लढणार असतील तर पश्चिम बंगाल मधील जनता त्यांना कदापि माफ करणार नाही.

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# बिघडतंय मानसिक स्वास्थ, रस्त्यावर होतोय उद्रेक.....

**दिशायन**

**(रस्त्यावर वाहन चालवताना होणाऱ्या शुल्लक वादाच्या घटना दररोज घडत असतात. त्याला इंग्रजीत रोड रेज असे म्हणतात. या वादाच्या घटना हिसंक वळण घेत असून मारामारी होते तर अनेकदा अनेकांना जीव गमवावा लागत आहे. महाराष्ट्रात २१ टक्के लोकांना रस्त्यावरील भांडणात जीव गमवावा लागला आहे. रस्त्यावरील वाद म्हणजे माणसांचे मानसिक स्वास्थ बिघडल्याचे मानक आहे. का होतात ही भांडणे आणि त्याची तीव्रता कशी आहे याचा घेतलेला हा वेध)**

मुंबईतील रस्त्यांवर वाहतुकीदरम्यान होणाऱ्या क्षुल्लक वादाचे पर्यवसान गंभीर हाणामारीत होण्याचे प्रमाण वाढतेच आहे. टाळेबंदीमुळे वाहतुकीवर नियंत्रण आल्यामुळे अशा घटनांना आळा बसला होता. मात्र आता संपूर्ण स्थिती पूर्ववत झाल्यामुळे पुन्हा अशा घटना वाढू लागल्या आहेत. नुकतेच भिवंडी येथे अरुंद रस्त्यावरुन दोन्ही बाजूने गाड्या आल्यामुळे वाहतूककोंडी निर्माण झाली. त्यात आमने सामने आलेल्या गाड्यांमधील मालकांमध्ये वाद झाले. पुढे ते वाद हाणामारीवर गेले अन् रागाच्याभरात एकाने आपल्याकडे आसलेल्या पिस्तुलाने गोळीबार करून दुसऱ्याचा जीव घेतला. यानंतर अशीच आणखी एक घटना ठाण्यात घडली. यातही एका वाहनचालकाने रागाच्याभरात स्वत:जवळ असलेल्या पिस्तुलीने हवेत गोळीबार केला. यात कोणाची जीवीतहानी किंवा कोणी जखमी झाले नाही. वाहन चालवताना वाहतूक कोंडी, अरुंद रस्ते तसेच चालकांच्या घाईमुळे किंवा ओव्हरटेकमुळे खूपदा गाड्यांची टक्कर होते किंवा गाड्या समोरा समोर येतात. मात्र अशावेळी पटकन राग येऊन समोरच्याला शिव्या घालणे, रागाच्याभरात भांडण करणे, रागावर नियंत्रण न ठेवता हाणामारी करणे, राग असह्य झाल्यावर जीवघेणा हल्ला करणे या गोष्टी घडणे म्हणजे माणसातील मानसिक अस्वास्थाचे लक्षण आहे. राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागामार्फत यंदा प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार क्षुल्लक कारणांवरुन रस्त्यावर होणाऱ्या भांडणांमध्ये अर्थात रोड रेजमध्ये ८० टक्के वेळा भांडणे होतात. तर अशा भांडणांमधून मृत पावणाऱ्यांची संख्या महाराष्ट्रात २१ टक्क्यांवर गेली आहे. तर गंभीर जखमी होण्याचे प्रमाण ५१ टक्क्यांवर गेले आहे. यात वाहतूक पोलिसांना ही मारहाण करण्याच्या घटनाही ३१ टक्क्यांनी वाढल्या आहेत. यावरुन समाजाचे मानसिक स्वास्थ बिघडत असल्याची चिंता मानसोपचार तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. मुंबईतसह इतर शहरांमधील रस्त्यांवर असलेल्या वाहतूकोंडीमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले आहेत. आता त्यात क्षुल्लक कारणामुळे होणारी वादावादी, गंभीर स्वरूपाची मारमारी आदींची भर पडलेली आहे. वाहनांचे भोंगे (हॉर्न) वाजवले, गाडी पुढे नेली, जरासा धक्का लागला, गाडी उभी करण्यास जागा मिळाली नाही अशा क्षुल्लक कारणांमुळे नागरिक लगेच आक्रमक होऊ लागले आहेत. या क्षुल्लक कारणांमुळे होणारे वाद अगदी गंभीर स्वरुपाच्या मारहाणीपर्यंत जातात. अगदी वाहतूक पोलिसांनी हटकले म्हणून त्यांच्यावरही हल्ले होण्याचे प्रमाण ही वाढू लागले आहे. सर्वसामान्य नागरिक क्षुल्लक गोष्टींबद्दल हिंसक होत असल्याबद्दल मानसोपचारतज्ञांनी चिंता व्यक्त केली आहे. मानसोपचार तज्ज्ञ डॉ. राजेंद्र बर्वे सांगतात की, रस्त्यावरील मारामारी अर्थात रोड रेज होणे हे सामाजिक स्वास्थ समजण्याचे मानक (इंडिकेटर) आहे. सामाजिक स्वास्थ असंतुलित होत असल्याचे चिन्ह आहे. जेव्हा वाद होतात तेव्हा आक्रमक होणाऱ्या माणसाच्या मनात आधीच साचलेल्या रागाचा स्फोट होत असतो असे ते म्हणाले. बदलत्या जीवनशैलीमुळे कामाचा ताण वाढलेला आहे. अपुरे रस्ते, वाहतूक कोंडी असल्याने या ताणात भर पडते. क्षुल्लकशा घटनेमुळेही उद्रेक होतो आणि त्याचे पर्यवसान मारामारीत होते. नंतर पश्चातापही होत असतो. त्यामुळे वाहन चालकांनी वाहचतुकीचे नियम पाळण्याबरोबर मानसिक संतुलन राखणे गरजेचे आहे, असे बर्वे यांनी सांगितले. वाहतूक पोलिसांनी अडविल्यावरही वाहनचालकांचा संयम सुटतो आणि ते आक्रमक बनतात. दोन वर्षांपूर्वी हेल्मेट न घालणाऱ्या तरुणाला जाब



विचारला म्हणून एका वाहतूक पोलिसाची हत्या करण्यात आली होती. वाहतूक पोलीस उपायुक्त अमितेश कुमार यांनी सांगितले की, अनेकदा वाहतूक पोलिसांशी वाद घातला जातो, त्यांना मारले जाते. नुकत्याच घडलेल्या एता प्रकरणात पोलिसांवर मारहाण झाली होती. आम्ही पोलिसांनाही संयम बाळगण्याच्या सुचना दिल्या आहेत. जर एखाद्या वाहनचालकाने नियमांचे उल्लंघन केले तरच कारवाई करावी आणि ते करताना वाहनचालकांशी नम्रपणे बोला, त्यांना राग येईल असे वर्तन करू नका, अशा सुचना दिल्याचे त्यांनी सांगितले. वाहनचालकांनी देखील संयम बाळगायला हवा, असे ते म्हणाले. चालक एक यंत्र चालवत आहेत, त्याची जबाबदारी त्यांनी घेतली पाहिजे. वाहनावरचा ताबा सुटल्यास कोणलाही दुखापत होऊ शकते हे लक्षात ठेवले पाहिजे. असेही कुमार यांनी सांगितले. एका अभ्यासानुसार, वाहनचालक संतप्त असेल तर त्यांच्याकडून अगदी शुल्लक घटनेवरुनही भयंकर प्रतिक्रिया असू शकते. विशेषत: आधीच काम किंवा घरासंबंधित ताण असल्यामुळे वाहन चालक चिडून प्रतिक्रिया देतात असे या अभ्यास म्हटले आहे. यात वाहनचालकांच्या मनस्थितीचा अभ्यास करण्यात आलेला आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि बदलत्या जीवशैलीमुळे माणसांची मानसिक स्थिती बिघडत चालली आहे. अशामुळेच रोडरेजच्या घटना वाढत आहेत. यासाठी मानसिक स्वास्थ राखण्यासाठी आपण काही उपया केले पाहिजे.

**मानसिक स्वास्थ राखण्यासाठीचे उपाय**

१. रोज प्राणायाम करणे. त्यासह योगासने करणे.
२. ओमकारचे उच्चारण करणे.
३. रोज १० मिनिटे शांत बसून फक्त श्वासावर लक्ष केंद्रीत करणे.
४. स्वत:हून वाहतुकीचे नियम न मोडणे.
५. गाडी चालवताना अधिकाधिक लक्ष चालवण्याकडे देणे, इतर कामाविषयी विचार कमीत कमी करणे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

## थोडक्यात वृत्तांत

### शिष्यवृत्ती परीक्षेच्या पूर्वतयारीसाठी एक महिन्याच्या ऑनलाईन शिबिराचे आयोजन

लातूर : जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था मुरूड च्या वतीने जिह्यातील इ. ५ वी व ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांसाठी कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीचा विचार करून एक महिना ऑनलाईन मार्गदर्शन करण्यात येणार आहे. दि. ८ फेब्रुवारी ते ८ मार्च २०२१ या कालावधीत सायंकाळी ६.०० ते ८.०० या वेळात प्रत्येकी एक तास विद्यार्थ्यांना शिकवले जाणार आहे. ५ वी साठी सायंकाळी ६.०० ते ७.०० तर ८ वी साठी सायंकाळी ७.०० ते ८.०० हा वेळ राहील. हे मार्गदर्शन ऊखएढ डर्ींीं या यूट्यूब वर प्रसारित करण्यात येणार आहे. या शिबिरासाठी जिल्ह्यातील प्रथितयश शिक्षक शिवशंकर राऊत, गणेश कलशेट्टी, प्रमोद हुडगे, उमाकांत कोंपले, गणपत जाधव, विनायक साखरे, रामकिशन सुरवसे, अजित शिरूरे, शिवराज स्वामी, जगदेवी खानापुरे, वैशाली गोकुळे, बाबासाहेब इंगळे, उत्तम शिंदे, मंजुषा कोकणे, गणेश जाधव, प्रमोद कटके, अशोक गायकवाड, मुरलीधर शिंदे, विजयकुमार माळाळे व विद्यासागर काळे मार्गदर्शन करणार आहेत. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ. भागीरथी गिरी, ज्येष्ठ अधिव्याख्याता यांच्या मार्गदर्शनाखाली रमेश माने, मारुती कदम, सतीश सातपुते, सतीश भापकर, सुनील राजुरे व नागेश लोहारे सर्व विषय सहाय्यक परिश्रम घेत आहेत. जिल्ह्यातील शिष्यवृत्ती परीक्षेला बसलेल्या सर्व विद्यार्थी आणि शिक्षक यांनी याचा लाभ घ्यावा तसेच गटशिक्षणाधिकारी, विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख, बीआरसी साधन व्यक्ती यांनी जास्तीत जास्त विद्यार्थी उपस्थित राहतील यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन प्राचार्य अनिल मुरकुटे यांनी केले आहे.

### अल्पवयीन मुलीचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला तीन वर्षांची सक्तमजुरी

लातूर : शहरातील गांधी चौक पोलिस ठाण्याच्या हद्दीत एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याची घटना २०१८ मध्ये घडली होती. या प्रकरणी लातूर जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीला तीन वर्षांची सक्तमजुरी व पाचशे रुपये दंडाची शिक्षा विशेष सत्र न्यायाधीश बी.सी. कांबळे यांनी ठोठावली आहे. लातूर शहरातील एका अल्पवयीन मुलगी २८ सप्टेंबर २०१८ रोजी शाळेतून सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घरी आली होती. दरम्यान अजय लक्ष्मण ससाने यांनी अल्पवयीन मुलीचा विनयभंग केला. या प्रकरणी गांधी चौक पोलिस ठाण्यात बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंद करण्यात आला होता. या गुन्ह्याचा सहाय्यक पोलिस निरीक्षक चव्हाण यांनी तपास करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायालयात सरकारी पक्षाच्या वतीने एकूण पाच साक्षीदारांचा जबाब नोंदविण्यात आला. त्यामध्ये पीडित मुलगी, प्रत्यक्षदर्शी, साक्षीदार विद्यार्थी व गुन्हा सिद्ध करण्यासाठी मुख्याध्यापक आणि तपास अधिकारी यांचे पुरावे ग्राह्य धरण्यात आले. या पुराव्याच्या आधारे लातूर येथील जिल्हा व सत्र न्यायालयाचे विशेष सत्र न्यायाधीश बी.सी. कांबळे यांनी आरोपी दोषी ठरवत तीन वर्षाची सक्तमजुरी व पाचशे रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. या खटल्यात सरकारी पक्षाच्या वतीने सहायक सरकारी वकील पी.व्ही. देशपांडे, विशेष सरकारी वकील मंगेश महिंद्रकर यांनी काम पाहिले. त्यांना ॲड. वैशाली विरकर ॲड. अंकिता धुत,ॲड. विद्या विर, ट्रायल मॉनिटरिंग सेलचे पोलिस उपनिरीक्षक आवेज काजी पोलीस नाईक एस. के. जाने यांनी सहकार्य केले.

### औसा – तुळजापूर महामार्गावर अपघातात

औसा : औसा ते तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावर दोन वाहनांची समोरासमोर धडक लागून झालेल्या अपघातात टेम्पो चालक गंभीर जखमी झाल्याची घटना शुक्रवार दि. २९ जानेवारी रोजी दुपारी ४ :०० च्या सुमारास घडली आहे. ट्रक क्र. एमपी १५- एचए - ०५३६ आणि टेम्पो क्र. एमएच ४३ एडी ३६११ दोन वाहनांची जोराची समोरासमोर टक्कर झाल्याने टेम्पो चालक आरेफ आदमखाँ पठाण (२५) रा. औसा हा गंभीर रित्या जखमी झाला असून त्यास उपचारासाठी लातूर येथील दवाखान्यात दाखल करण्यात आले आहे. हा अपघात घडल्यानंतर ट्रक चालक फरार झाला असल्याचे कळते. बोरफळ नजीक पेट्रोल पंपाजवळ ही घटना घडली असून पोलिस उपनिरीक्षक नितीन गायकवाड अधिक तपास करीत आहेत.

### जलशुध्दीकरण केंद्र आणि सौर उर्जा पंपाचे आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते उद्घाटन

लातूर : केंद्र शासनाच्या पाणी पुरवठा विभागामार्फत पाच हजार लिटर क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र (आरओ) योजनेचा आणि सौर उर्जेवर आधारीत पंपनळ पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ रेणापूर तालुक्यातील मौजे भंडारवाडी येथे भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आला. ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेला पिण्याचे शुध्द पाणी मिळावे यासाठी पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी नवीन योजनेची अंमलबजावणी केली असून केंद्र शासनाच्या पाणी पुरवठा विभागामार्फत रेणापूर तालुक्यातील मौजे भंडारवाडी येथे पाच हजार लिटर क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र (आरओ) उभारले असून या केंद्रामुळे भंडारवाडी, चुकारवाडी आणि पाथरवाडी येथील नागरीकांना मोठा लाभ मिळणार आहे. राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग आणि भूजल सर्वेक्षण विकास यंत्रणेमार्फत मौजे भंडारवाडी येथे सौरउर्जेवर आधारीत दुहेरी पंपनळ पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत केली असून या योजनेमुळे चोवीस तास नळाद्वारे नागरीकांना पाणी उपलब्ध होणार आहे. या जलशुध्दीकरण केंद्राचा आणि सौरउर्जेवरील नळपंपाचा शुभारंभ विधानपरिषदेचे सदस्य तथा भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रेणापूर पसचे सभापती रमेश सोनवणे, उपसभापती अनंत चव्हाण, जि.प सदस्य सुरेंद्र गोडभरले, रेणापूरचे उपनगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, गटविकास अधिकारी मोहन अभंगे, रेणापूर येथील पाणीपुरवठा विभागाच्या शाखा अभियंता सौ. एस. ए. बोराडे, प्रशासक अशोक उबाळे, माजी सरपंच मधुबाला कांबळे, माजी उपसरपंच तथा सदस्या जयश्री दहिफळे, गवळणबाई कांबळे, दिपाली दहिफळे, ग्रामसेवक महादेव गिरी आदी होते. या कार्यक्रमास भाजपाचे किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष साहेबराव मूळे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष भागवत सोट, सतिष अंबेकर, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे यांच्यासह गावातील नागरीक मोठ्य संख्यने उपस्थित होते.

### राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडाकेबाज कामगिरी

# लातूरात २८ लाख ८६ हजार रुपयांची अवैध मळी जप्त




**लातूर/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील गोंद्री शिवरातून अवैध मळी वाहतुक करणाऱ्या दोन आयशर टेंम्पोना लातूर राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यानी पकडून २०० लीटर क्षमतेचे ६५ बॅरल (१३०००ली. मळी) व टेंम्पो असे एकूण २८ लाख ८६ हजार ६०० रुपयांचा अवैध मुद्येमाल जप्त करत धडाकेबाज कामगिरी केली आहे. याप्रकरणी दोघा तस्करांना ताब्यात घेतले आहे.

याबाबत राज्य उतपादन शुल्क विभागाकडून मिळालेली माहीती अशी की, ४ फेब्रुवारी २०२१ रोजी रात्री २-३० वाजताच्या सुमारास मौ. गोद्री, ता. औसा जि. लातूर येथून अवैध मळी वाहतूक होणार आसल्याची गप्त माहीती राज्य उत्पादन शुल्क लातूर विभागाचे अधिक्षक गणेश बारगजे यांना मिळाली होती. मिळालेल्या माहीती वरून राज्य आयुक्त कांतीलाल उमाप, संचालक श्रीमती उषा वर्मा, जिल्हाधिकारी बी. पी. पृथ्वीराज आणि विभागीय उप-आयुक्त श्री. पवार यांच्या मार्गदर्शनाखाली व लातूरचे अधीक्षक गणेश बारगजे यांनी मौ. गोद्री, पॉवर हाऊस जवळ (ता. औसा, जि. लातूर ) रात्री २: ३० वाजण्याच्या सुमारास सापळ लावून अवैध बेकायदेशीर मळी वाहतुक करणाऱ्या दोन टेंम्पो वाहन क्र.-एमएच १३-सीयू ५८०३ आणि एमएच-१३-सीयू-१६१८ क्रमांकांचे टेम्पो अवैध वाहतूक करीत असतांना पकडले. या दोन टेंम्पोची झाडझडती घेतली असता या टेंम्पोत २०० लीटर क्षमतेचे ६५ बॅरल (१३००० ली. मळी) आढळून आले. दोन टेंम्पो व अवैध मळी असे एकूण २८ लाख ८६ हजार ६०० रुपयांचा अवैध मुद्येमाल राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केला. याप्रकरणात आरोपी मशाक दस्तगीर नदाफ आणि अल्ताफ नदाफ हय़ा इसमांना अटक केली असून त्यांच्याविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ चे कलम ६५ (ड) नूसार गुन्हे नोंद घाले आहेत. तसेच यामागे असलेल्या सुत्रधाराचा शोध राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत घेण्यात येत आहे. या कारवाईत लातूर विभागाचे निरीक्षक आर. एम. बांगर, दुय्यम निरीक्षक आर. जी. राठोड, स. दुय्यम निरीक्षक गणेश गोले, जवान अनिरुध्द देशपांडे, निलेश गुणाले, हणमंत मुंडे व ए. एम. फडणीस यांनी सहभाग नोंदविला आहे. जिल्हयातील नागरीकांनी त्यांच्या परिसरात अवैध व बनावट मद्याची विक्री होत असल्यास त्याबाबतची माहिती या विभागाला द्यावी. माहिती देणा-याचे नाव गुप्त ठेवण्यात येवून अश अवैध दारु विक्रेत्यांवर ठोस कारवाई केली जाईल असे आवाहन अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क चे गणेश बारगजे यांनी केले आहे.

## सोलापूर शहरातील सुधाकर बहिरवाडे दोन वर्षाकरिता तडीपार

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



सोलापूर शहरातील भवानी पेठ शाहीर वस्ती येथील सुधाकर महादेव बहिरवाडे (वय ३९) यास सोलापूर शहर, उर्वरित सोलापूर जिल्हा व पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुका व उस्मानाबाद जिल्हा येथून दोन वर्षाकरिता तडीपार करण्याचा आदेश सोलापूर शहर पोलिसांनी काढला आहे. सोलापूर शहर पोलिसांच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, सोलापूर शहरामध्ये आपला उद्देश साध्य करण्याच्या हेतूने साथीदारांसह नागरिकांना शिवीगाळ व मारहाण करून दहशत निर्माण करणे, शासकीय नोकरांच्या कामात अडथळा निर्माण करणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, जनावरांची वाहतूक करणाऱ्या वाहन चालकांकडून पैशाची मागणी करणे, गोवंश रक्षणांचे काम करीत असताना आपल्या कृतीमधून आणि बोलण्यातून जातीय तणाव निर्माण करणे तसेच प्रसंगी कायदा हातात घेणे, समाजामध्ये जातीय तेढ निर्माण होईल याची जाणीव असतानासुध्दा त्याची पर्वा न केल्याचा आरोप करीत सोलापूर शहर पोलिसांनी सुधाकर बहिरवाडे यास दोन वर्षाकरिता तडीपार करण्याचा आदेश दिला आहे. याबाबतचा आदेश गुरुवारी रात्री पावणे दहाच्या सुमारास सोलापूर शहर पोलीस उपायुक्त परिमंडळ कार्यालयातील पोलीस उपनिरीक्षक एन. एस. कानडे यांच्या सहीने देण्यात आला आहे.

## जिल्हा नियोजन समिती पुर्व आढावा बैठकीत माझी वंसुधरा दिनदर्शिका २०२१चे वाटप

**लातूर/प्रतिनिधी**

पृथ्वी, वायू, जल, अग्नीव आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारीत माझी वंसुधरा अभियान हे अभियान राज्यभर राबविण्यांस सुरवात झाली आहे. जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी., यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या जिल्हानियोजन समितीच्यापुर्व आढावा बैठकीत माझी वसुंधरा अभियानातंर्गत जिल्हा नगर पालिका प्रशासन विभाग व जिल्हयातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने संयुक्तीकपणे माझी वंसुधरा अभियानाची जनजागृती व प्रसिध्दीहोणेसाठी नवर्षानिमित्त तयार केलेल्या quot;नागरी माझी वंसुधरा दिनदर्शिका २०२१ चे जिल्हयातील सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांना व जिल्हास्तरीय अधिकारी यांना जिल्हाधिकारी यांचे हस्ते वितरण करण्यांत आले. याप्रसंगी पोलीस अधिक्षक निखील पिंगळे, मुख्य कार्यकारी अधिकारी, अभिनव गोयल जिल्हातील विविध विभागाचे प्रमुख उपस्थित होते. यावेळी जिल्हा प्रशासन अधिकारी सतिश शिवणे यांनी माझी वंसुधरा अभियानाबाबत सविस्तर मार्गदर्शन करून पृथ्वी, वायू, जल, अग्नीव आकाश या निसर्गाशी संबंधित पंचतत्वांवर आधारीत quot;माझी वंसुधरा अभियान quot; या अभियानात ग्रामीण क्षेत्रामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मोठया उत्स्फुर्तपणे या अभियानात भाग घेवून ग्रामीण भागामध्ये विविध उपक्रम राबवित आहेत असे सांगुन या अभियानात नागरीक्षेत्रामध्येही सर्व नगर परिषदा, नगर पंचायतीमध्ये उत्स्फुर्तपणे सहभाग घेतला असुन या मध्ये विविध कार्यक्रम व उपक्रम राबवित असुन या अभियानात सर्व जिल्हा प्रमुखांनी सहभागी व्हावे असे आवाहन केले. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अभिनव गोयल यांनी जिल्हा परिषदेचे वतीने बचत गटाने तयार केलेले वस्तुचे विविध स्टॉलचे उद्घाटन पालकमंत्री अमित देशमुख यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनी होणार असुन या प्रत्येक स्टॉलला सर्व अधिकाऱ्यांनी व्यक्तीश: भेट देवून गृहोपयोगी वस्तु खरेदी कराव्यात व अभियानात सहभागी व्हावे असे त्यांनी आवाहन केले.

# भिवंडीतील सरवली एमआयडीसीमध्ये भीषण आग

## दहा तास आग धुमसत राहिली आग

**भिवंडी/अभिजित हिरे**



भिवंडी तालुक्यातील सरवली एमआयडीसी मधील कपिल रेयॉन प्रा लिमिटेड या अत्याधुनिक यंत्रमागावर कपडा तयार करणाऱ्या कंपनीला बुधवारी रात्री २ वाजताच्या सुमारास भीषण आग लागण्याची घटना घडली आहे. तळ अधिक दोन मजले असलेल्या कंपनीच्या वरच्या मजल्यांवर सायझिंग, वारपीन मशीन सह अत्याधुनिक यंत्रमाग असून दुसऱ्या मजल्यावर मोठ्या प्रमाणावर तयार कपडा व कच्चामाल मोठ्या प्रमाणावर साठविलेले असलेल्या ठिकाणी ही आग लागल्याने पाहता पाहता आगीने रोद्ररूप धारण करीत संपूर्ण कंपनीची इमारत आगीच्या भक्ष्य स्थानी पडली .आगीची माहिती कळताच भिवंडी अग्निशामक दलाची एक गाडी घटनास्थळी पोहचली परंतु आगीचे स्वरूप पाहता ठाणे, कल्याण, उल्हासनगर येथील अग्निशामक दलास पाचारण करण्यात आले. एकूण ५ अग्निशामक दलाच्या गाड्यांसह तीन खाजगी टँकरद्वारा आगीवर नियंत्रण मिळविण्याचे प्रयत्न केले, परंतु पाण्याची कमतरता भासत असल्याने तब्बल दहा तास ही आग धुमसत राहिली व त्यानंतर आगीवर नियंत्रण मिळविण्यात अग्निशामक दलास यश मिळाले असून संपूर्ण आग विझविण्यासाठी पुढील दहा ते बारा तास लागू शकतात अशी माहिती अग्निशामक दलाच्या कर्तव्यावर हजर कर्मचारी यांनी दिली आहे. या आगीच्या दुर्घटनेत सुदैवाने कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी ३ वारपिंग, १ सायझिंग मशीनसह ७७ अत्याधुनिक यंत्रमाग व कच्चामाल व तयार कापड असा कोट्यवधी रुपयांचा मुद्देमाल जळून खाक झाला आहे.प्रथमदर्शनी आग ही दुसऱ्या मजल्यावरील वारपिंग असलेल्या ठिकाणी शॉर्टसर्किट झाल्याने लागल्याचे समजते. दरम्यान एवढ्या मोठ्या एमआयडीसी क्षेत्रात स्वतंत्र अग्निशामक यंत्रणा नसून पाणी साठवणूक क्षमता ही नसल्याने अग्निशामक दलाच्या गाड्यांनी पाणी मारण्यास सुरूवात केल्यावर अवघ्या दहा मिनिटांमध्ये पाणी संपत असल्याने पाणी भरण्यासाठी अग्निशामक दलाच्या गाड्यांना सुमारे चार किलोमीटर अंतरावर जाऊन पाणी भरून यावे लागत असल्याने आग पुन्हा भडकत होती. त्यामुळे ही आग तब्बल दहा तास धुमसत राहिली. त्या नंतर आगी वर नियंत्रण मिळविण्यात आले आहे परंतु कुलिंग चे काम अजून पुढे किमान दहा तास सुरू राहिल अशी माहिती भिवंडी अग्निशामक दलाचे जवान विजय जाधव यांनी दिली आहे.

## पानटपरी चालकाकडून लाच घेताना पोलीस शिपाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात!

**लातूर/करकरे अंबादास**

पान टपरीत अवैध गुटखा विक्री करताना कारवाही न करण्यासाठी लाच मागणाऱ्या पोलिस शिपाई रियाज फारुखमियाँ देशमुख (वय ३४ वर्षे,) यास २ हजाराची लाच स्विकारताना लातूर लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यानी रंगेहाथ पकडल्याची घटना अहमपदपुर पोलिस ठाणे हाद्दीत घडली आहे. यातील तक्रारदार यांचे भाग्यनगर अहमदपुर येथे हामणे किराणा स्टोअर्स नावाचे किराणा दुकान असुन त्यामध्ये किरकोळ किराणा मालाची विक्री करतो. देशमुख हे चार दिवसापुर्वी तक्रारदार यांचे किराणा दुकानी येवुन तु किराणा दुकानामध्ये अवैधरित्या गुटखा विक्री करत आहेस. पण किराणा दुकानामध्ये अवैध गुटखा विक्रीचा धंदा चालु ठेवण्यासाठी व तक्रारदार यांचेवर कार्यवाही न करणेसाठी प्रत्येक महिण्याला ५ हजार रुपये दयावे लागतील, पैसे दिले नाहीतर कार्यवाही करीन असे सांगुन तु काय कर माझा एक वैभव नावाचा माणुस आहे, तु त्याला भेट असे सांगितले याबाबतची तक्रार दिनांक २७ जानेवारी २०२१ रोजी प्राप्त झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर यांच्याकडून दिनांक २८ जानेवारी २०२१ रोजी पंचासमक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी दरम्यान खाजगी इसम वैभव माधव बेल्लुरे यांनी पोलीस देशमुख यांच्या सांगण्यावरुन तक्रारदार यांचे किराणा दुकानामध्ये अवैधरित्या गुटख्याची विक्री चालु ठेवण्यासाठी पोलीस शिपाई रियाज देशमुख यांना ३ हजार रुपये दे असे म्हणून लाचेची मागणी करुन देण्यास सांगितले. तसेच आरोपी लोकसेवक रियाज फारुखमियाँ देशमुख, पोलीस शिपाई यांनी तक्रारदार यांचे किराणा दुकानामध्ये अवैधरित्या गुटख्याचा धंदा चालु ठेवण्यासाठी व कार्यवाही न करणेसाठी मोबाईलवर टाईप करुन ५ हजार रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती २ हजार रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम खाजगी इसम असलम यांचेकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे असलम मौलीसाब तांबोळी वय ३० वर्षे व्यवसाय पान मटेरिअल, रा. दगापुरा गल्ली, अहमदपुर यांनी पोलीस शिपाई रियाज देशमुख यांचे करीता दिनांक २९ जानेवारी २०२१ रोजी २ हजार रुपये लाचेची रक्कम १५.५७ वाजता पंचासमक्ष दस्तगीर गल्ली अहमदपुर येथील त्यांचे पान मटेरिअलच्या दुकानामध्ये स्वतः स्विकारली आहे. म्हणून त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे. याप्रकरणी अहमदपुर पोलिस ठाण्यात तिघा विरोधात कलम ७, ७अ, १२ ला.प्र.का. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हाचा तपास पोलीस निरीक्षक बाबासाहेब काकडे, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर हे करीत आहेत. सदरची सापळा कार्यवाही श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, श्रीमती अर्चना पाटील, अप्पर पोलीस अधिक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधिक्षक माणीक बेद्रे, पोलीस निरीक्षक बी. एच. काकडे, कुमार दराडे, सपोउपनि संजय पस्तापुरे, रमाकांत चाटे, लक्ष्मीकांत देशमुख, चंद्रकांत डांगे, मोहन सुरवसे, शिवकांता शेळके, संतोष गिरी, शिवशंकर कच्छवे, आशिष क्षीरसागर, अमोल शिंदे, संदीप जाधव, दिपक कलवले, रुपाली भोसले, राजु महाजन यांनी पार पाडली आहे.

**महाराष्ट्र शासन**
**जलसंपदा विभाग**
**कार्यकारी अभियंता**
**पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग**
**सुर्यानगर ता. डहाणू, जि. पालघर यांचे कार्यालय**
ईमेल eepiped@gmail.com

**ई-निविदा सूचना क्र. १ सन २०२०-२०२१**

कार्यकारी अभियंता पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग सुर्यानगर ता. डहाणू, जि. पालघर (सुर्या प्रकल्प वसाहत मनोर ता.जि. पालघर) जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदारांकडून खालील कामांकरिता नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग सुर्यानगर, ता. डहाणू, जि. पालघर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामांचे नाव : खोलसापाडा - १ ल.पा. योजना ता. वसई, जि. पालघर वन्यजिव संवर्धन प्रस्ताव तयार करण्याचे काम.

जिल्हा : पालघर

निविदेची अंदाजित किंमत रुपये : ९,३१,५००/-

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक : ०८/०२/२०२१ ते दिनांक : २२/०२/२०२१

ई-निविदा उघडणे : दिनांक : २३/०२/२०२१

खालील ठिकाणी ई-निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) संकेतस्थळ :http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.)

२) कार्यकारी अभियंता पालघर पाटबंधारे प्रकल्प विभाग सुर्यानगर, ता.डहाणू, जि.पालघर कार्यालयातील सुचना फलक.

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**पालघर पाटबंधारे प्रकल्प बांधकाम विभाग,**
**सुर्यानगर, ता.डहाणू, जि. पालघर**

जा.क्र. : पापाप्रबांवि/सुर्या/लेशा-२/१८०/सन २०२१
दिनांक : ०१/०२/२०२१

जिमाका/पालघर/जाहि ४८/७१/२०२१ दिनांक : ०३/०२/२०२१

08 TO 14 FEB 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 06/02/2021 10:23 PM Page 1



# खून करुन दोन वर्ष लपून राहिलेल्या आरोपीस भिवंडीत अटक

**भिवंडी/प्रतिनिधी**

यवतमाळ मध्ये हत्या करुन फरार होऊन कल्याण येथे सर्विस सेंटर वर काम करीत स्वतःचे अस्तित्व लपवुन राहिलेल्या आरोपीस भिवंडी गुन्हे शाखेने अटक केली आहे. विरेंद्र कोल्हे ,वय ३१ रा.पाटीपुरा, यवतमाळ असे आरोपीचे नाव असून विशेष म्हणजे त्या वर एकुण चार हत्येचे गुन्हे नोंद आहेत. या बाबत माहीती अशी की भिवंडी गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अशोक होनमाने यांच्या पथकास यवतमाळ येथील एक हत्येच्या गुन्ह्यातील आरोपी स्वतःचे अस्तित्व लपवुन कल्याण येथे वास्तव्य करीत असल्याची माहीती गुप्त बातमीदारा मार्फत मिळाल्यावर सहाय्यक पोलीस निरीक्षक महेंद्र जाधव, पोउपनिरी शरद बरकडे, सपोउप निरी रामसिंग चव्हाण, कर्मचारी अरुण पाटील, सुधाकर चौधरी, साविर शेख, वसंत गवारे, भावेश घरत या पथकाने कल्याण येथील चक्की नाका परीसर लोकग्राम येथील एका सर्विस सेंटर वर दुचाकी धुवत असताना त्या वर्णनाचा व्यक्ती आढळून आला असता त्यास ताब्यात घेत भिवंडी गुन्हे शाखेत आणुन करुन चौकशी केली असता विरेंद्र कोल्हे याने आपल्या साथीदारा सोबत २०१९ मध्ये यवतमाळ येथे एक हत्या केल्याचे कबुल केले व तपासात या गुन्हेगाराने २०१४, २०१५, २०१८ मध्ये हत्या केली असल्याचे कबुल केले असुन २०१८ मध्ये न्यायालयातून जामिनावर मिळविल्या पासुन तो फरार झाला होता.

# इंधनदरवाढी विरोधात वाड्यात शिवसेनेचे आंदोलन

**वाडा/प्रतिनिधी**

शिवसेनापक्षप्रमुख व महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री आदरणीय उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने आज शुक्रवारी (दि.५) शिवसेना वाडा तालुका व शहराच्या वतीने केंद्र सरकारने केलेल्या अवास्तव व अन्यायकारक इंधन दरवाढी विरोधात वाडा तहसिलदार कार्यालय येथे केंद्र सरकारच्या विरोधात निदर्शने करुन तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. सदर आंदोलनात शिवसेना पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, अंगीकृत संघटना पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आंदोलनास पालघर उपजिल्हाप्रमुख सुनील पाटील, वाडा तालुकाप्रमुख उमेश पटारे, भिवंडी ग्रामीण विधानसभा संपर्कप्रमुख धनंजय पष्टे सर, वाडा पंचायत समितीचे सभापती योगेश गवा, तालुका समन्वयक प्रकाश केणे, तालुका सचिव निलेश पाटील, वाडा शहरप्रमुख प्रमोद घोलप,पंचायत समीतीचे गटनेते अमोल पाटील, महीला आघाडी उपजिल्हा संघटक संगीता ठाकरे, महिला आघाडी तालुका संघटक रेश्मा पाटील, विधानसभा संघटक मनाली फोडसे, जिल्हा परीषद सदस्य राजेश मुकणे, पंचायत



समिती सदस्य अस्मिता अशोक लहांग, राजेश सातवी, उपनगराध्यक्ष वर्षा गोळे, उपतालुका संघटक अंजली चौधरी, माजी तालुका प्रमुख प्रकाश पाटील, युवा सेनेचे उपजिल्हा युवा अधिकारी सचिन पाटील उपतालुकाप्रमुख तुषार यादव, भरत हजारे, भावेश पष्टे, संतोष हरड, वि.उपतालुकाप्रमुख जनार्दन भेरे, उपशहरप्रमुख चद्रकांत मलबारी,चद्रकांत केणे, कुंदन डेंगाणे, वाडा शहर युवा अधिकारी रोहीत सोनावणे, माजी तालुका सचिव अमित रोडगे, चर्मोद्योग कामगार सेनेचे भरत गायकवाड, विभागप्रमुख दीपक मोकाशी, विशाल गावळे, दिनेश ठाकरे, नितीन पाटील, मनीष पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

पान १ वरून....

## कामाला लावण्याचा अजब ...

भामट्यास वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांसह पो.नि.बळीराम हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली दिल्ली येथून पोलिस उप निरिक्षक अंगद नेमाने व त्यांच्या सहकाऱ्यांनी दिल्ली येथून ताब्यात घेतले आहे. सध्या तो पोलिस कोठडीत आहे.

जळगाव तालुक्यातील म्हसावद येथील बेरोजगार युवक सचिन संजय मराठे हा नोकरीच्या शोधात होता. नौकरी डॉट कॉम या वेबसाईटवर त्याने नोकरी मिळवण्यासाठी रजिस्ट्रेशन केले होते. रजिस्ट्रेशन केल्यानंतर २२ ऑगस्ट २०१८ ते २२ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत त्यास विविध मोबाईल क्रमांकावरुन कॉल आले. कॉल करणा-यांनी त्यांची नावे रविसिंग, करन भातपुर, संग्राम भालेराव, करन लुत्रा, अनुभुती तनेजा, अनिल सिंग व श्रेया अशी सांगीतली होती. सचिन मराठे यास एचडीएफसी बँकेत नोकरी मिळवून देण्याचे आमीष वेळोवेळी दाखवण्यात आले होते. त्यासाठी नव्याने रजिस्ट्रेशन, ऑनलाईन मुलाखत, लॅपटॉप किट, प्रोसेसिंग फी अशा विविध कारणांसाठी सचिन मराठे याच्याकडून पंजाब नॅशनल बॅक व सिंध बॅकेत ९३ हजार जमा करण्यास सांगण्यात आले. नोकरी मिळण्याच्या आशेने सचिन मराठे याने ती रक्कम बँक खात्यात जमा केली. रक्कम खात्यात जमा केल्यानंतर सचिन मराठे यास एचडीएफसी बँकेचे बनावट नियुक्ती पत्र पाठवण्यात आले. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर सचिन मराठे याने सायबर पोलिस स्टेशनला धाव घेत रितसर तक्रार दाखल केली. त्याच्या तक्रारीनुसार सायबर पोलिस स्टेशनला भाग ५ गु.र.न. १/१९ भा.द.वि. ४२०, ४६८, ४७१ तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियम ६६ (डी) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

पोलिस अधिक्षक डॉ. प्रविण मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. बळीराम हिरे व त्यांचे सहकारी पोलिस उप निरिक्षक अंगद नेमाने यांनी या तपासाला गती दिली. तपासादरम्यान फिर्यादी सचिन मराठे यास आलेले ई मेल, मोबाईल क्रमांक, बँक खाते यांचा बारकाईने अभ्यास करण्यात आला. या तपासात विक्रम यादव उर्फ अनिल कुमार, (रा.उत्तम नगर दिल्ली) व राहुल मदनलाल चौरसिया, (रा.वार्ड क्रं.९ आझाद नगर, चंदौली, जि.चंदौली, उत्तर प्रदेश, ह.मु.हाऊस नं. २६ दुसरा मजला मोहन गार्डनची मागील बाजू, नवादा, उत्तम नगर, दिल्ली) यांची नावे निष्पन्न झाली. तपासकामी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उप निरिक्षक अंगद नेमाणे व त्यांचे सहकारी सहायक फौजदार बाळकृष्ण पाटील, पो.हे.कॉ. प्रविण वाघ, पोलिस नाईक दिलीप चिंचोले, पो. कॉ. श्रीकांत चव्हाण, पो. कॉ. दिपक सोनवणे व पो. कॉ. गौरव पाटील आदींचे पथक दिल्ली येथे गेले. आरोपींच्या शोधार्थ हे पथक दिल्ली येथे दोन दिवस मुक्कामी राहिले. तपासकामी पो.हे.कॉ. नरेंद्र वारुळे यांची तांत्रीक मदत वेळोवेळी सुरुच होती. दोन दिवस दिल्लीत ठाण मांडून बसलेल्या तपास पथकाला अखेर यश आले. अनिल कुमार पिता सुरेश कुमार उर्फ विक्रम यादव यास दिल्ली येथील रणहोला परिसरातुन ताब्यात घेण्यात आले. त्याला २३ जानेवारी रोजी अटक करण्यात आली. अटकेतील अनिलकुमार यादव हा दिल्ली येथे फेक कॉल सेंटर चालवत असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्याच्या ताब्यातून एक मोबाईल तसेच विक्रम यादव याच्या नावे असलेल्या बनावट कागदपत्रांच्या आधारे एचडीएफसी, आरबीएल व इंडसइंड अशा बँकामधे उघडण्यात आलेल्या खात्यांचे एटीएम कार्ड व आधारकार्ड मिळून आले. फसवणूक झालेला बेरोजगार फिर्यादी सचिन मराठे याने अनिलकुमार उर्फ विक्रम यादव याच्या पंजाब अँण्ड सिंध बँक खात्यात ९३ हजार रुपये जमा केले होते. तपासादरम्यान ते खाते तात्काळ फ्रिज करण्यात आले. त्यामुळे ९३ हजाराची रक्कम बँकेत सुरक्षीत करण्यात आली. त्यामुळे ती रक्कम हस्तगत करण्यात आली. अटकेतील आरोपी अनिलकुमार यादव यास न्यायलयात हजर केले असता त्यास २८ जानेवारी पर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

## पाणी वाटपाचा वाद विकोपाला...

आनंदा पाटील हे करीत होते. साखराळे येथेच साखर राजाराम बापू कारखाना असल्याने या भागातील बहुतेक शेतकऱ्याचा ऊस या कारखान्यालाच जातो. ऊसाला वर्षातून किमान आठ ते दहा वेळा पाणी दयावे लागत असल्याने पाटकऱ्याच्या माध्यामातून या स्कीमद्वारे पाणी पुरवठा केला जातो महावितरणची वीज ही अनियमीत असल्याने वीजेचा प्रश्न निर्माण झाल्याने प्रत्येक शेतकऱ्याला आळी पाळीने पाणी दिले जाते. हे पाणी रात्री अपरात्री ही मिळत असल्याने पाटकरी आनंदा पाटील याना त्यावेळी ही हजर राहवे लागत होते. त्यातून शेजार शेजार शेतकऱ्यात वाद हा होतो. त्यातच एखाद्या शेतकऱ्याच्या शेतजमीनीला पाणी देत असताना चकून ते पाणी दुसऱ्या शेतकऱ्याच्या पायवाटेवर आले तर मुद्दामच त्याने ते पाणी पायवाटेवर सोडून आपली अडचण केली आहे असे त्याला वाटते. इस्लामपूर उरण परिसरातील नवरा-नवरीच्या शेतातील जुनाखेड रस्त्यालगत जयश्री वसंतराव पाटील यांची शेतजमीन आहे. ही शेतजमीन त्याच्या नात्यातील भगवान पाटील हे करत असतात. बाबुराव भगवान पाटील यांची शेती ही त्याच्या शेजारीच आहे. या भागातील शेतकऱ्यासांठी सन २०१७ मध्ये नव्याने कृष्णा नदीपासून पाण्याची स्कीम आणलेली आहे. सोसायटीमार्फत आणलेल्या पाण्याच्या स्कीमद्वारे शेतकऱ्यांच्या शेतजमीनीला पाणी देण्याचे काम पाटकरी आनंदा पाटील हे करीत होते. बहे बोरगाव पासून ही स्कीम आल्याने अनेकजणाच्या शेतजमीनी या ओलीता खाली आलेल्या आहेत. पाटकरी आनंदा पाटील हे प्रत्येक शेतकऱ्याला पाणी देण्यावरून कधी ही दुजाभाव करीत नव्हते. ते नंबराप्रमाणे पाणी सोडत होते. तरीही त्याच्याबरोबर अनेक शेतकरी माझ्या शेताला पाणी का? दिले नाही म्हणून मुद्दामच भांडण काढत होते. आनंदा पाटील हे सोसायटीला बांधील असल्याने ते आपली डयुटी प्रामाणिकपणे करीत असत. मागे एकदा बाबुराव पाटील आणि पाटकरी आनंदा पाटील याच्यात पाणी देण्यावरून वाद झालेला होता. हा वाद त्यावेळी मिटलेला होता.परंतु बाबुराव पाटील याच्या मनात आनंदा पाटील याच्या विषयी राग होता. तो पाणी देण्याबाबत मुद्दामच खेळी करीत आहे. तो पैसे घेऊन आणि तोंडे बघून पाणी सोडतो असा त्यांनी गैरसमज करून घेतलेला होता. त्यामुळे जाता येता ते आनंदा पाटील याला कसला रे तू पाटकरी, म्हणून टोचून बोलत होते. ते ही त्याना हसूनच दाद देत होते. परंतू बाबुराव पाटील याच्या बोलण्याचा अर्थ वेगळा होता. ते पाटकऱ्याला समजून येत नव्हता. दि.३१ जानेवारी रोजी अशोक पाटील हे नेहमीप्रमाणे सकाळी ८.३०च्या दरम्यान आपल्या बहिणीच्या शेतात पाणी पाजण्याचे काम करीत होते.त्यावेळी अशोक पाटील यांनी शेतातील सरीमधून भरपूर पाणी सोडले होते. जवळपास ते तीन चार पाणी पाजत होते.दुपारी १२च्या दरम्यान त्या पायवाटेवरून बाबुराव पाटील हे आपल्या शेताकडे चालले होते.

त्यावेळी पायवाटेवर सोडलेले पाणी मोठया प्रमाणात आले होते. हे बघून बाबुराव पाटील यांनी अशोक याला बोलावून म्हटले तू सोडलेल्या पाण्याकडे लक्ष देत जात. मुद्दामहून पाणी पाय रस्त्यावर सोडू नकोस. त्यामुळे आतील शेतीकडे जाणाऱ्या शेतकऱ्यांना विनाकारण त्रास होतो.एवढया बोलण्यावर बाबुराव पाटील आणि अशोक पाटील याच्यात वादावादी होत होती. भगवान पाटील आणि त्याचा वाद होत असताना इतर तीन चार शेतकरी तेथे आले ते ही बाबुराव पाटील याच्या बाजूनेच बोलू लागले होते. त्यामुळे त्याच्यातील वाद वाढला होता.तोंडाला तोंड लागून दोघेही अशोक पाटील याच्या अंगावर धावून जात होते. त्यावेळी त्याच ररस्तयावरून जाणाऱ्या इतर शेतकऱ्यांनी त्याची भांडणे सोडविली होती. बाबुराव पाटील हे अशोक पाटील याला बघून घेण्याची भाषा करीत त्याला शिव्या देत तावातावाने आपल्या घरी निघून गेले होते. तर अशोक पाटील याला ही बाबुराव पाटील यांचा राग आलेला होता. तो ही त्यांना त्याच भाषेत उत्तर देत जा.जा .मला बघून घेतो, मी काय तुझा नोकर आहे.मी पाटकरी पाणी पुरवठा सोसायटीला बांधील आहे असे सांगितले.

त्यावेळी घरी येवून बाबुराव पाटील यांनी शेतातील पायवाटेवर घडलेली घटना सांगून अशोक पाटील आणि त्याची झालेली भांडणे सांगितली. त्यावेळी झालेल्या त्याचा मुलगा प्रशांत पाटील हा घरी नव्हता. रात्री तो घरी आल्यावर त्याला आपल्या वडिलांचे आणि पाटकरी अजित पाटील याचे झालेले भांडण समजले. त्यावेळी तो गप्प बसला होता.पण आपल्या वडिलांना पाटकरी अशोक पाटील याने केलेली धक्काबुक्की आवडलेली होती.याचा जाब अशोक पाटील यांना दुसऱ्या दिवशी विचारण्याचे त्याने ठरविले. त्याचप्रमाणे दुसऱ्या दिवशी म्हणजे १ फेब्रुवारी २०२१ रोजी अशोक पाटील हे दुपारी ११ वाजणेच्या सुमारास प्रशांत पाटील हा तो पाणी पाजत असलेल्या ठिकाणी आला. त्याने काल आपले वडिल बाबुराव पाटील याच्याबरोबर झालेल्या भांडणाचा जाब अशोक याना विचारीत त्याच्याबरोबर भांडण काढले होते. त्यावेळी अशोक पाटील यांनी त्याला तू रे मला कोण विचारणार? काल तुझा बाप विचारीत होता.आज तू विचारीत आहेस असे म्हणून त्याला खरे खोठे बोल सुनावले होते. परंतू त्यावेळी प्रशांत हा पाटकरी आनंदा पाटील याच्यावर चिडूनच होता. काल याने आपले वडिल बाबुराव पाटील यांना दादागिरी केली. आणि आज मला दादागिरी करीत उलट मलाच जाब विचारीत आहे याचा त्याला राग आला.त्या रागाच्या भरात तो आनंदा पाटील याना मारायला त्यांच्या अंगावर गेला. दोघात झोबाझोंबी होत होती. दोघेही एकेमकांना शिव्या देत होते.त्याचवेळी सर्व तयारी निशी आलेल्या प्रशांत याने आनंदा पाटील याच्या डोक्यावर तोंडावर, मानेवर आणि पायावर आपल्या कडील, लोंखडी रॉडने मारहाण करायला सुरूवात केली. त्याने त्याला जबरदस्त मारहाण केली होती. आनंदा पाटील याच्या अंगावर मारहाणीचे जबर वळ उठून त्याच्या तोंडातून आणि डोक्यातून मोठया प्रमाणात रक्त स्त्राव सुरू झाला होता. त्यामुळे काही क्षणातच ते जागेवरच गतप्राण झाले. त्याच्या शरीरावर लोखंडी रॉडचे वळ उठलेले दिसून येत होते. त्याने केलेल्या मारहाणीत आनंदा पाटील याचे शरीर काळे निळे पडले होते.त्याचा जागीच मृत्यू झाल्याने प्रशांत याने या घटनेची माहिती आपल्या घरी येवून आई वडिलांना सांगितली. तोपर्यत ही घटना गावातील लोकांना समजली होती.यावेळी या घटनेची माहिती बाबुराव पाटील यांनी पोलीस पाटील अजित पाटील यांच्या कानावर घातली.ते ही घटनास्थळी दाखल झाले होते.त्यांनी या घटनेची माहिती त्वरीत इस्लामपूर पोलीस ठाण्याला दिली.

इस्लामपूर उरण रस्त्यावर साखराळे हद्दीत जुनाखेड येथील नवरा नवरीच्या शेतात खूनाची घटना घडली असल्याने पोलीस ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले.घटनास्थळी रक्ताच्या थारोळ्यात पाटकरी आनंदा पाटील हे पडले होते.घटनास्थळी रक्ताने माखलेला लोंखडी रॉड पडलेला होता.घटनास्थळावरील बघ्यांची गर्दी हटवून पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी इस्लामपूर येथील शासकीय रुग्णालयात पाठवून दिला.ही घटना कोणत्या कारणातून घडली.या घटनेतील संशयीत आरोपी कोण याची माहिती पोलीसांना मिळाली असल्याने पोलीसांनी या घटनेची फिर्याद अजित पाटील याच्याकडून घेतली.आणि पुढील तपासाला सुरूवात केली. घटनास्थळावरून पळून गेलेला आरोपी प्रशांत पाटील हा घटनेनंतर आपल्या घरात लपून बसला असल्याची माहिती पोलीसांना मिळाली होती. पोलीसांनी त्याला त्याच्या राहत्या घरातून ताब्यात घेऊन इस्लामपूर पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी पोलीसांनी केली असता त्याने कोणतेही आढेवेढे न घेता घडलेली घटना पोलीसांना सांगून ही घटना कोणत्या कारणातून घडली आहे हे सांगून आपला जबाब पोलीसांना देवून आपला गुन्हा कबुल केला.त्याने गुन्हा कबुल केल्याने पोलीसांनी अजित पाटील यांच्या फिर्यादीवरून अशोक आनंदा पाटील (वय५५ रा. साखराळे) याच्या खून प्रकरणी प्रशांत बाबुराव पाटील याच्या विरोधात इस्लामपूर पोलीस ठाण्यात भा.दं.वी. कलम ३०२ प्रमाणे गुन्हा नोंदवून त्याला इस्लामपूर येथील कोर्टासमोर उभे केले असता.मा.कोर्टाने त्याला ८ फेब्रुवारी पर्यतची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय शेडगे करीत आहेत.बऱ्याच वेळेला शेतील पाणी पाजत असताना जादा झालेले पाणी हे पिकाच्या सरीतून रस्त्यावर येत असते.त्यामुळे दलदल निर्माण होऊन येणाऱ्या जाणाऱ्यांना त्याचा त्रास होत असतो.

त्यातच काही वेळाने मागील शेतकऱ्याला अडचण करण्यासाठी, त्याचा ऊस जर कारखान्याला जात असेल तर मुद्दामच पायवाटेवर पाणी खोडसाळपणेसोडले जात असते.यातून वाद निर्माण होतो.येथे मात्र पाटकरी आनंदा पाटील याने मुद्दाम रस्त्यावर पाणी सोडलेले नव्हते.परंतू त्याचा राग बाबुराव पाटील यांना आलेला होता.त्यातून बाचाबाची होऊन बाबुराव पाटील याच्या मुलाच्या हातून आनंदा पाटील या पाटकऱ्याचा खून झाला. खूनसारख्या घटनेला कोणतेही क्षुल्लक कारण पुरेसे ठरत आहे.जाब विचारणे देखिल किती महागात पडू शकते हेच या घटनेवरून दिसून येते.

## इगो दुखावल्याने अझरुद्दीन ...

ओळख होती. त्याचा चेहरा, सोनेरी जुल्फे, मानेला झटका देवून जुल्फे सावरण्याची लकब आणि टोपणनाव तसेच शर्टाची वरील दोन उघडी बटने बघता तो गुन्हेगारी वृत्तीचा असल्याचे सहज लक्षात येत होते. वाळलेले झाड ताठ उभे असते आणि पानाफुलांनी भरलेले झाड नेहमी झुकलेले असते. या निसर्ग नियमानुसार खिशात दमडी नसली तरी दारु पिऊन वाळलेल्या ताठ झाडाप्रमाणे रुबाब करणारा एक तरुणवर्ग तळागाळातील समाजात वावरत असतो. त्याला भुत फलीत आणि सत्त्या हे दोन्ही तरुण अपवाद नव्हते. दोघांच्या अंगात रग होती. आपल्या मनाविरुद्ध कुणी वागले, कुणी प्रतीप्रश्न केला अथवा प्रतीउत्तर दिले म्हणजे दोघांची मस्ती उफाळून येत होती.

२४ जानेवारी रोजी सायंकाळी सत्त्या घरातून बाहेर पडला. तो रहात असलेल्या घरापासून जवळच रेल्वे लाईनजवळ एक जागा होती. त्या जागेला जळकी मिल असे म्हटले जाते. त्या जळकी मिलजवळ पडलेल्या खुर्चीवर बसून सत्या दारु पित बसला. त्याचवेळी भुतफलीत तेथे आला. साहेबी थाटात खुर्चीवर बसून दारु पिणाऱ्या सत्त्याला बघून भुताचे टाळके सटकले. त्याने देखील सत्त्याला सिनेमातील व्हिलनप्रमाणे तु येथे काय करतो आहे रे... असे दरडावून विचारले. त्यावर सत्त्याने तुला काय करायचे रे... असे फिल्मी हिरोप्रमाणे निडरप्रमाणे उत्तर दिले.

आपल्याला प्रतीउत्तर दिल्याचे ऐकून भुताचा इगो दुखावला. त्याला सत्त्याचा राग आला. त्याने सत्त्याला दोन खडे बोल सुनावले. त्यामुळे आधीच नशेत असलेल्या सत्त्याला देखील राग आला. त्याने देखील भुताला शाब्दिक मार दिला. दोघांचा शब्दामागे शब्द वाढत होता. मुद्द्याची गोष्ट आता गुद्द्यावर येण्यास वेळ लागला नाही. जवळच एक लोखंडी पाईप पडलेला होता. भुताने तो लोखंडी पाईप उचलून सत्त्याच्या छातीत व पोटावर मारण्यास सुरुवात केली. याशिवाय जवळच पडलेला एक दगड उचलून त्याने सत्त्याच्या दिशेने भिरकावला. या मारहाणीत सत्त्याच्या कानाजवळून रक्त वाहू लागले व तो जमीनीवर कोसळला. काही क्षणातच तो गत:प्राण झाला. रागावरील नियंत्रण सुटल्यामुळे संतापच्या भरात भुताकडून सत्याचे मरण झाले.

हा वादावादीचा आणि मारहाणीचा प्रकार जवळच असलेल्या जळकी मिलमधे असलेल्या झाडूच्या गोडावूनचा वाचमन बघत होता. त्याने पळत जावून हा प्रकार मरण पावलेल्या सत्त्याच्या घरी जावून सांगितला. माहीती मिळताच सत्त्याचे काका अकील व शकील हे दोघे भाऊ नातेवाईकांसह घटनास्थळी आले. दरम्यानच्या कालावधीत भुत तेथून गायब झालेला होता. सत्त्या मात्र निपचीप पडलेला होता. जवळच असलेल्या टेंट हाऊसमधील दोघा कर्मचाऱ्यांनी अकिल व शकील या दोघा भावांना हकिकत कथन केली. सोनेरी केस अर्थात जुल्फे असलेल्या तरुणासोबत सत्त्याचा वाद झाला होता व त्या वादातून त्याने सत्त्याला मारहाण केल्याचे अकील व शकील यांना समजले. दोघा भावांनी पुतण्या सत्त्या यास रिक्षाने एका खासगी दवाखान्यात नेले. तेथील डॉक्टरांनी त्याला बघून तो मयत झाला असल्याचे सांगितले. त्यामुळे त्याला सरकारी दवाखान्यात नेण्यात आले. दरम्यान सत्त्या खरोखरच मरण पावला का याबाबत पसार झालेल्या भुताने दवाखान्यातून माहिती घेतली. आपल्या मारहाणीमुळे सत्त्या मरण पावल्याचे समजल्यानंतर तो शहरातील उस्मानीया पार्क भागात पळून गेला. या प्रकरणी मयत सत्त्याचे काका शेख अकील यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार जळगाव शहर पोलिस स्टेशनला अझरुद्दीन उर्फ भुतफलीत याच्या विरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल केला. सदर गुन्हा भाग ५ गु.र.न. १८/२१ भा.द.वि. ३०२ नुसार दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिस अधिक्षक डॉ.प्रविण मुंढे, अप्पर पोलीस अधिक्षक चंद्रकांत गवळी, उपविभागीय पोलीस अधिकारी कुमार चिंथा तसेच पो.नि. धनंजय येरुळे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी भेट देत घटनेची सत्यता पडताळून पाहिली. दरम्यान वरिष्ठांच्या आदेशाने गुन्हे शोध पथकातील सहायक फौजदार वासुदेव सोनवणे, विजय निकुभ. उमेश भाडारकर, प्रफुल्ल धांडे, अक्रम शेख, गणेश पाटील, भास्कर ठाकरे, दीपक सोनवणे, रतन गीते. तेजस मराठे, राजकुमार चव्हाण, प्रणेश ठाकुर, योगेश इंधाटे, ओमप्रकाश पंचलिंग आदींचे पथक फरार अझरुद्दीन उर्फ भुत फलीत याच्या शोधार्थ रवाना झाले होते.

फरार अझरुद्दीन उर्फ भुत फलीत शेख हा शहरातील उस्मानीया पार्क भागात लपून बसला असल्याची माहीती पथकाला समजताच त्याला शोधून पो.नि. धनंजय येरुळे यांच्या समक्ष हजर करण्यात आले. त्याने आपला गुन्हा कबुल केला. रागाच्या भरात आपण हे कृत्य केल्याचे त्याने कबुल केले. सत्त्या यास जिवे मारण्याचा आपला हेतू नव्हता असे देखील भुताने कबुल केले. अटकेतील अझरुद्दीन उर्फ भुत फलीत शेख यास न्यायालयात हजर केले असता सुरुवातीला न्यायालयाने त्याला पोलिस कोठडी सुनावली.

पान ८ वरून....

## शेतकऱ्यांनी शेती सोबतच शेतमालाची ...

शेतकऱ्यांना देण्यासाठी कृषि विभागाने तालुकास्तरावर मेळावे आयोजित करण्याचे निर्देश त्यांनी दिले. विभागीय कृषि सहसंचालक जगताप म्हणाले की, जिल्हयातील शेतकऱ्यांनी या एक दिवसीय कार्यशाळेस मोठा प्रतिसाद दिला आहे. कृषि विभाग प्रत्येक तालुक्यात या सर्व शेती विषयक योजनेची माहिती शेतकऱ्यांना देणार आहे. जिल्हयात प्रत्येक तालुक्यात या योजनेसाठी नोडल ऑफिसर नेमलेला आहे. स्मार्ट योजने मध्ये लातूर जिल्हयाची नोंदणी राज्यात प्रथम क्रमांकावर आहे, असे ही त्यांनी यावेळी नमूद केले. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी या कार्यशाळेचे प्रास्ताविक करुन या कार्यशाळेचे स्वरुप, गरज व काय करणार आहोत ते विशद करुन जिल्हयातील शेतकऱ्यांना एकाच वेळेस शेती मधील विविध शासकीय योजनांची माहिती व्हावी म्हणून या कार्यशाळेचे आयोजन केले असल्याचे नमुद केले. प्रारंभी या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी पृथ्वीराज व मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन करण्यात आले. या कार्यशाळेत शेती विषयक शासनाच्या विविध योजनेची माहिती जिल्हा उद्योग केंद्राचे हनबर, जिल्हा ग्रणी बँकचे व्यवस्थापक कुलकर्णी,आत्माचे प्रकल्प संचालक आर.एस. पाटील यांचे मार्गदर्शन झाले. या कार्यशाळेमध्ये जिल्हयातील शेतकरी उत्पादक, कंपनीचे पदाधिकारी, शेतकरी गट प्रमुख कृषि संस्था पदाधिकारी, कृषि उद्योजक अधिकारी कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

## औसा येथे पेट्रोल-डिझेल दरवाढ ...

दरवाढ मागे घेण्याची मागणी यावेळी करण्यात आली. आमच्या मागण्याची केंद्र सरकारनी दखल घ्यावी. अन्यथा शिवसेना स्टाईलने आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी यांनी माध्यमाशी बोलताना दिला.

## पोलीस हवालदार इकबाल शेख ...

विशेष पोलीस महानिरीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग महाराष्ट्र राज्य पुणे व इतर वरीष्ठ पोलीस अधिकारी यांचे उपस्थितीमध्ये सदरचा कार्यक्रम पार पडला असून महाराष्ट्र पोलीस दलातील व सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील सर्व वरिष्ठ पोलीस अधिकारी, अंमलदार व मित्र परीवाराकडून पोलीस हवालदार इक्बाल शेख यांचेवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## वाड्यात भाजपचे महावितरणाविरोधात...

अध्यक्षा अंकिता दुबेले, जिल्हा उपाध्यक्ष अर्चना भोईर, राजेश रिकामे, संतोष साठे, मनिष देहेरकर आदींनी आंदोलनाला संबोधित केले. गोरगरीब जनतेला आव्वाच्या-सव्वा वीज बिल देऊन त्यांची वीज जोडणी तोडणाऱ्या आघाडी सरकार विरोधात या आंदोलनात जोरदार घोषणाबाजी करण्यात आल्याने परिसर दणाणून गेला होता. शिवसेनेने या विधानसभा निवडणुकीत आपल्या निवडणूक (वचननामा) जाहीरनाम्यात महाराष्ट्रातील जनतेला १०० युनिट पर्यंत वीज मोफत देण्याचे अश्वासन दिले होते. त्याच शिवसेनेने सत्तेवर येताच महाराष्ट्रातील गरीब ग्राहकांना वीज जोडणी तोडण्याची नोटीस पाठवून पाठीवर वार केल्याचा आरोप यावेळी आंदोलनकर्त्यांनी आंदोलनादरम्यान बोळतांना केला. महावितरणाने ७५ लाख वीज ग्राहकांना वीज जोडणी तोडण्याची नोटीस पाठवून महाराष्ट्रातील ४ कोटी जनतेला अंधारात टाकण्याचे पाप करणा-या महावितरणाच्या निषेधार्थ भाजपाने आज राज्यभर तालुका स्तरावरील महावितरण केंद्रांवर 'टाळा ठोको व हल्लाबोल' आंदोलन आयोजन केले होते.त्या अनुषंगाने वाड्यातही आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलन कर्त्यांनी कोरोनाच्या काळातील सर्व नियमांचे पालन केल्याचे दिसून आले. या आंदोलनात जेष्ठ नेत्या शुभांगी उत्तेकर, दिनेश पाटील, मेघना पाटील, धनश्री चौधरी, अश्विनी शेळके, निलिमा भोये, रिमा गंधे, अंजनी पाटील, पंढरीनाथ घोडविंदे, विजय पाटील, नितीन घरत, सुरेश पाटील, दिपक मोरे, बापु लेले. महेश जाधव,निकिता पाटील, उज्वला देशमुख, रक्षा पाटील, योगीता जाळेकर, रुचिता पाटील, संध्या थाळेकर, प्रिती हाडकमोल, रजनी बोंड, स्वप्नील रोठे आदींसह वीज ग्राहक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

08 TO 14 FEB 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 06/02/2021 10:23 PM Page 1



# भिवंडीत ४० लाखांचा गुटखा जप्त



**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडी परिमंफल क्षेत्रात पानपट्टी वर मोठ्या प्रमाणावर गुटखा विक्री केला जात असताना अन्न व औषध प्रशासन यास आळा घालण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असून नुकताच गुजरात येथून कंटेनर च्या माध्यमातून विक्री साठी आणलेला तब्बल ४० लाख रुपये किमतीचा गुटखा अन्न व औषध प्रशासनाने जप्त केला आहे.

अन्न व औषध प्रशासनाचे भिवंडी परिक्षेत्राचे सहाय्यक आयुक्त भूषण मोरे यांना आपल्या बतमीदारा मार्फत गुजरात हुन वाडा मार्गे एक कंटेनर भिवंडी परिसरात गुटखा घेऊन येत असल्याची माहिती मिळाल्या वर अन्न अधिकारी माणिक जाधव, शंकर राठोड, मनीष सानप, अरविंद खडके या पथकाने भिवंडी वाडा रस्त्यावर पाळत ठेवून कंटेनर हा शेलार येथे आला असता त्या ठिकाणी वरील पथकाने त्यास अडवून कंटेनर मधील मालाची तपासणी केली असता त्यामध्ये १०० गोणीं मध्ये विमल गुटखा हा तंबाखूजन्य पदार्थ असल्याचे आढळून आले. या कंटेनर चा चालक अर्जुन भीमराव गोयेकर यास ताब्यात घेऊन भिवंडी तालुका पोलीस ठाण्यात अन्न अधिकारी माणिक जाधव यांनी दिलेल्या तक्रारी वरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अन्न व औषध विभागाच्या भिवंडी परिक्षेत्राचे सहाय्यक आयुक्त भूषण मोरे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ऑक्टोबर २०१९ पासून आजपर्यंत विविध ठिकाणी कारवाई करीत तब्बल ११ कोटी ८० लाख रुपयांचा गुटखा पकडून या विभागातील या व्यवसायात असलेल्या माफियांचे रॅकेट उध्वस्त करीत महाराष्ट्रात अव्वल क्रमांकाची कामगिरी केली.

## कोरोना काळात बंद असलेली गोऱ्हा-वसई बस सुरु




**वाडा/प्रतिनिधी**

कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे ११ महिन्यापासून बंद असलेली वसई - गोऱ्हा - वसई एस. टी. सेवा मंगळवार पासून सुरू करण्यात आली. त्याकरिता महाराष्ट्र राज्य एस. टी. कामगार सेनेचे ठाणे, पालघर जिल्हा कार्याध्यक्ष मोहन रामचंद्र पाटील यांनी विशेष प्रयत्न केले. त्यावेळी उपस्थित असलेले शिवसेना जिल्हापरिषद गट मांडा येथील जेष्ठ शिवसैनिक रमेश ठाकरे, विभाग संघटक वैभव पाटील, गो-हे व्यापारी संघटना अध्यक्ष मुकेश बोंद्रे व त्यांच्या विस्तार अधिकारी काशिनाथ भोईर ई. यांच्याकडून एस. टी.वाहन चालक पवार व वाहक वैशाली राठोड (महाराष्ट्र राज्य एस.टी. कामगार सेना-महिला संघटक-वसई आगार) यांना शाळ व श्रीफळ देवून त्यांचा आदर सत्कार करण्यात आला. तसेच वैशाली राठोड (महाराष्ट्र राज्य एस टी कामगार सेना-महिला संघटक-वसई आगार) यांनी शिवसेना जिल्हा परिषद गट मांडा येथील सर्व पदाधिकार्यांचे आभार मानले.

## लोदग्यात होणार बांबूपासून फर्निचर निर्मिती -संजीव करपे

**लातूर/प्रतिनिधी**

औसा तालुक्यातील लोदगा येथे बांबूपासून फर्निचर तयार करण्याचा कारखाना लवकरच सुरू होत आहे. त्यासाठी प्रशिक्षण घेतलेले कुशल कामगार कुडाळ येथून येत आहेत.या माध्यमातून उद्योगाचे नवे दालन सुरु होत असल्याची माहिती एनबारच्या सुकाणू समितीचे सदस्य संजीव करपे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली. लोदगा येथे फिनिक्स फाउंडेशनच्या वतीने बांबु डिप्लोमा इंजीनियरिंग कॉलेज सुरू करण्यात येत असून त्यास राज्य शासनाने मान्यता दिलेली असल्याचेही ते म्हणाले. संजीव करपे यांनी सांगितले की, तत्कालीन खासदार सुरेश प्रभू यांच्या सांगण्यावरून सिंधुदुर्ग जिल्ह्यात कुडाळ येथे अवघ्या १२० शेतकऱ्यांनी बांबूची लागवड केली होती. ते एक क्रांतिकारक पाऊल ठरले. आज सिंधुदुर्ग जिल्ह्यात १० हजारपेक्षा अधिक शेतकरी बांबूची लागवड करत आहेत. योग्य पद्धतीने प्रक्रिया केली तर बांबू १०० वर्ष टिकतो. असा प्रकल्प कुडाळमध्ये आम्ही उभारला आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून अनेक प्रयोग केले, ते सर्व यशस्वी ठरले आहेत. बांबूपासून भेटवस्तू, फर्निचर तसेच इतरही अनेक वस्तू तयार करता येतात. बेंगलोर येथील विमानतळाची अंतर्गत सजावट आता बांबूपासून केली जात असून त्यासाठी ३ हजार कोटी रुपयांचा खर्च येत आहे, अशी माहितीही त्यांनी दिली. राज्य कृषिमूल्य आयोगाचे माजी अध्यक्ष पाशा पटेल यांच्या नेतृत्वात कॉनबॅक ही संस्था काम करते आहे.

## दिव्यंगाची सेवा करणे हिच खरी ईश्वर सेवा -आ.बाबासाहेब पाटील

**अहमदपूर/फिरोज शेख**

मानसाच्या जिवनातील आलेल्या अपंगत्वावर मात करून त्यांच्यातील कमीपणाची भावना दूर करण्यासाठी सरकार विविध योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करत आहे. अपंग व्यक्तीची सेवा करणे हीच खरी ईश्वर सेवा आहे. असे प्रतिपादन आमदार बाबासाहेब पाटील यांनी येथील पंचायत समिती सभागृहात आयोजित दिव्यांग व्यक्तीला सायकल व इतर साहित्य वाटप कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सभापती श्रीमती गंगासागर दाभाडे या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून जि.प.सदस्य अशोक केंद्रे, मुद्रिकाताई भिकाने सुमन ताई सूनेवाड, उपसभापती बालाजी गुट्टे गटविकास अधिकारी आदेलवाड, प.स.सदस्य, माणिक नरवटे, सभापती, शिवानंद हेगणे, शिवाजीराव देशमुख, निवृत्ती कांबळे, प्रशांत भोसले, अशोक सोनकांबळे, अनिस कुरेशी आदी उपस्थित होते. पुढे बोलत असताना आमदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, जगातील




अनेक विक्रमांची नोंद अपंग व्यक्तीच्या नावे आहे म्हणून अपंग व्यक्ती ने कमीपणाची भावना न ठेवता जिद्दीने वाटचाल केली पाहिजे समाजाने सुद्धा चांगल्या भावनेतून अपंगाला मदत केली पाहिजे त्यामुळे त्यांना जगण्याची एक उमेद मिळेल. आचारसंहितेमुळे साहित्य वाटपाच्या कार्यक्रमाला उशीर झाला या पुढील काळात अपंगांना विविध योजनांचा लाभ मिळविण्यात अडचणी येऊ देणार नाही अशी ग्वाही आमकार बाबासाहेब पाटील यांनी दिली. कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना गट विकास अधिकारी आदेलवाड, यांनी सांगितले की तालुक्यातील ११४३ सदस्यांनी घेतलेल्या शिबिरात सहभाग नोंदवला होता त्यापैकी प्रथम टप्प्यात ७५७ लाभार्थ्यांना साहित्य प्राप्त झाले आहे. ज्याचे प्रातिनिधिक स्वरूपात येथे वाटप करून जि.प. सर्कल निहाय खालील प्रमाणे त्याच्या तारखेला वाटप करण्यात येणार आहे. त्यात अंध ७७, अस्थिव्यंग ३९२ ,कर्णबधिर १८२ , १०६ एकूण ७५७ ला घरपोच देण्यात येणार आहे.

## छत्रपती शिवाजी महाराज चषकाचे तळे हिप्परगा येथे उद्घाटन



**सोलापूर/प्रतिनिधी**

श्री इलेव्हन क्रिकेट क्लब तळे हिप्परगा व ए आर ग्रुप वतीने शिवजयंतीनिमित्त भव्य टेनिस बॉल क्रिकेट सामन्याचे आयोजन तळे हिप्परगा येथे करण्यात आले आहे त्याचे उद्घाटन भाऊसाहेब रोडगे राजू हौशेट्टी यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी तळे हिप्परगा येथील ग्रामस्थांना व क्रिकेट प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या क्रिकेट स्पर्धेत ६५ संघानी सहभाग नोंदवळा असून १९ फेब्रुवारी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अंतिम सामना असून या क्रिकेट सामन्याचे प्रथम बक्षीस ३००००/- रू तर द्वितीय १५०००/- रू मॅन ऑफ द मॅच १०००/- रू मॅन ऑफ द सिरीज १०००/- रू बेस्ट बॅट्समन २०००/- रू बेस्ट बॉलर १०००/- रू इतके आहे तसेच यामध्ये प्रत्येक सामन्यात मॅन ऑफ द मॅचची ट्रॉफी देण्यात येणार आहे व अंतिम सामन्याच्या निकालानंतर बक्षीस वितरणाचा कार्यक्रम होणार आहे असे मा. भाऊसाहेब रोडगे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शेरा पटेल यांनी केले तर आभार बाळासाहेब पाटील यांनी मानले.

## ड्रग्स डीलर चिंकू पठाणचे कनेक्शन भिवंडीतही; सराफासह एकाला अटक

**भिवंडी/प्रतिनिधी**



सद्या मुंबईतील चिंकू पठाणचे ड्रग्स रॅकेटच कनेक्शन उघड करण्यात एनसीबीचे प्रमुख समीर वानखेडे यांना यश येत असताना आता या ड्रग्स रॅकेटच कनेक्शन भिवंडीत पोहचले आहे. भिवंडी शहरातील पद्मानगर भागात राहणाऱ्या रोहित वर्मा याला अमली पदार्थ विक्री प्रकरणी एनसीबीच्या पथकाने स्थानिक पोलिसांच्या मदतीने अटक केले असतानाच, त्याला पैसे पुरवणारा सोन्याचा व्यावसायिक विक्रांत उर्फ विकी जैन हा वर्मा आणि चिंकू पठाण यांना ड्रग्ससाठी पैसे पुरवत असल्याचे समोर आले आहे. विक्रांत उर्फ विकी जैन राहत असलेल्या भिवंडीतील ब्राहण आळी परिसरातून त्याला स्थानिक पोलिसांच्या मदतीने एनसीबीने ताब्यात घेतले आहे. हिंदी चित्रपटातील हिरो आणि हिरोइन यांना ड्रग्स पुरवणाऱ्या चिंकू पठाण याच्या पुण्यातील जोडीदारावर घरावर एनसीबीच्या पथकाने छापेमारी केली. राजू सोनावणे नावाच्या सप्लायरवर ही धाड टाकण्यात आली. विशेष म्हणजे तीन दिवसापूर्वीच चिकू पठाण एनसीबीच्या जाळ्यात अडकला आहे. तर गेल्या काही महिन्यांपासून अमली पदार्थ तस्करी करणाऱ्यांच्या तस्करांच्या मुसक्या आवळल्या जात आहेत. याच कारवाईदरम्यान, एनसीबीने गँगस्टर चिंकू पठाणला अटक केली. त्यानेच भिवंडीतील विकी जैनचे नाव सांगितले. शिवाय त्याच्याकडे सापडलेल्या डायरीमधून धक्कादायक माहिती समोर आली आल्याचे सांगण्यात आले. दाऊदचे हस्तक मुंबईत गेल्या काही दिवसांपासून ड्रग्स विकून ते पैसे दाऊदला पाठवत होते. हवाला मार्गे कोट्यवधीची रक्कम मुंबईबाहेर पाठवत होता. गेल्या ५ वर्षांमध्ये या तस्कारांनी १५०० कोटींचे ड्रग्स विकले होते, हा पैसा दाऊदकडे पोहोचल्यानंतर तो दहशतवाद्यांना कारवाया करण्यासाठी पुरवत होता, अशी खळबळजनक माहिती उघड झाल्याचे एका अधिकाऱ्याने सांगितले.

## मराठवाडा विभागाच्या माहिती व जनसंपर्क कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या होणार गौरव

औरंगाबाद : सन २०२० या वर्षात आपल्या वैशिष्टयपूर्ण कामाच्या माध्यमातून वेगळा ठसा उमटविणाऱ्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक (माहिती) कार्यालय, मराठवाडा विभाग, औरंगाबाद अंतर्गत कार्यालयांतील बारा कर्मचाऱ्यांची उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी म्हणून निवड करण्यात आली आहे. संचालक (माहिती) गणेश रामदासी यांनी नुकतीच याबाबतची घोषणा केली आहे. तसेच स्वच्छ व सुंदर कार्यालय म्हणून संपूर्ण मराठवाड्यातून जालना येथील जिल्हा माहिती कार्यालयाची निवड करण्यात आली आहे.

उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी म्हणून निवड झालेल्या कर्मचाऱ्यांना लवकरच कार्यसंस्कृती प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे. मराठवाडा विभाग अंतर्गत माहिती व जनसंपर्क विभागाचे एकूण दहा कार्यालयं आहेत. या कार्यालयांच्या माध्यमातून शासनाच्या विविध लोकोपयोगी उपक्रमांच्या प्रसिध्दीचे काम अव्याहतपणे सुरु असते. गेल्या वर्षभरात आपल्या पदाची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्याबरोबरच इतर कामातही हिरीरीने सहभाग घेऊन उत्तम काम करणाऱ्या तसेच कोरोनासारख्या आपत्कालिन परिस्थितीत तसेच निवडणुकीच्या कालावधीत उत्तम कार्य करणाऱ्या आणि अचानक आलेल्या कामाची जबाबदारी स्वीकारुन कार्यालयाची प्रतिमा उंचावणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांचा उत्कृष्ट कर्मचाऱ्यांच्या यादीत समावेश करण्यात आला आहे.

## सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर बाजारातून लंपास झालेले २१ मोबाईल सापडले कर्नाटकात!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर शहरातील बाजारातचोरीस गेलेल्या २१ मोबाईल हँडसेट कर्नाटक राज्यातील शिमोगा जिल्ह्यात सापडले आहेत. दोन्ही जिल्ह्यातून २ लाख १७ हजार रुपये किंमतीचे एकूण २१ मोबाईल पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. येथे दसऱ्याच्या सणासाठी ८ ऑक्टोबर २०१९ रोजी फुल खरेदी करण्यासाठी गेले असता गर्दीचा फायदा घेऊन मोबाईल चोरी झाल्याचे तक्रार पंढरपूर शहर पोलिसांत येथील ओंकार सतीश कळसकर (रा.अनिलनगर, पंढरपूर, जि. सोलापूर) यांनी दिली होती. गुरनं.१६०६/२०१९ भादंवि ३७९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आली होती. याबाबत पंढरपूर पोलिसांकडून तपास सुरू होता. या गुन्ह्यांतील चोरीस गेलेला मोबाईलचे कर्नाटक राज्यातील शिमोगा जिल्ह्यात नेटवर्क दाखवत असल्याचे सायबर पोलीस ठाण्याकडून माहिती मिळाली. त्यानंतर शहर पोलीस ठाण्याकडील गुन्हे प्रकटीकरण शाखेतील




अधिकारी व पथकाने कर्नाटक राज्यातील शिमोगा जिल्ह्यात जाऊन तपास केला असता तो मोबाईल विधीसंघर्षग्रस्त बालकाकडे मिळून आला. त्याच्याकडून २१ मोबाईल हस्तगत करण्यात आले आहेत. ही सदर कामगिरी पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्या मार्गदर्शनाखाली, पंढरपूर उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरुण पवार यांनी गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक आर जे गाडेकर, पोहेकाँ शरद कदम, बिपीन ढेरे, सुरज हेंबाडे, राजेश गोसावी, पो.ना.गणेश पवार, इरफान शेख, शोएब पठाण, पोकाँ सिद्धनाथ मोरे, सुजित जाधव, संजय गुठाळ, समाधान माने, सुनील बनसोडे, अन्वर अत्तार यांनी केले आहे.

# थोडक्यात वृत्तांत

### वाडा शहरातील सार्वजनिक ठिकाणी नागरिकांसाठी शौचालय व मुतारीची मागणी

वाडा : वाडा शहरातील सार्वजनिक ठिकाणी नागरिकांसाठी सुलभ शौचालय व मुतारीची सुविधा उपलब्ध करुन मिळण्याची मागणी आदिवासी मुक्ती मोर्चा सामाजिक संघटनेने मुख्याधिकारी वाडा नगरपंचायत तसेच तहसिलदार तहसिल कार्यालय वाडा यांच्याकडे बुधवारी निवेदन देवुन केली आहे. वाडा शहर हे तालुक्याचे ठिकाण असल्याने मुख्य बाजारपेठ, शासकिय कार्यालये, बँका, पेतपेढ्या, शाळा महाविद्यालये, दवाखाने आदी वाडा शहरात आहेत यामुळे रोजच हजारो लोकांची गर्दी शहरात होत असते. परंतु शहरात कुठेही सार्वजनिक ठिकाणी शौचालय तसेच मुतारीची सुविधा उपलब्ध नसल्याने आडवाटेला, उघड्यावर हे विधी उरकावे लागत आहे त्यामुळे महिलावर्गाची खुप कुचंबना होत आहे . सदर विषयाची मागणी आम्ही मागील दहा वर्षा पासुन प्रशासनास पत्रव्यवहाराद्वारे करत आहेत परंतु प्रशासन आजतागायत सदर मागणीकडे दुर्लक्ष करत आहे. तरी प्रशासनास विनंती की, वाडा नगरपंचायत हद्दीमध्ये किमान चार ते पाच सार्वजनिक सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी त्यामध्ये मुख्यत: खंडेश्वरी नाका, टि.डि.सी.सी.बँकेच्या समोर, पंचायत समिती, नगरपंचायत कार्यालय, परळीनाका येथे सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली. याप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष अनंता वनगा, नगरसेवक अरुण खुलात, तालुका सचिव राजेंद्र गवळी, तालुका कमिटी सदस्य प्रकाश बरफ हे उपस्थित होते.

### लातूर जिल्हाभरात महावितरण विरोधात भाजपाच्या आंदोलनास मोठा प्रतिसाद

लातूर : कोरोना संकटामुळे अडचणीत सापडलेल्या राज्यातील सर्व प्रकारच्या वीज ग्राहकांकडून विजबिलाची सक्तीने वसूली सुरू केली असून अनेकांना वीज पुरवठा तोडण्याची नोटीस दिल्याने भारतीय जनता पार्टीच्या वतीने लातूर जिल्हाभरातील सर्वच तालुक्याच्या ठिकाणी ५ फेब्रूवारी शुक्रवार रोजी राज्यशासन आणि महावितरणच्या निषेधार्थ महावितरण कार्यालयास टाळाठोको आंदोलन करण्यात आले. या आंदोलनास सर्वत्र मोठा प्रतिसाद मिळाला. कोरोनाच्या कार्यकाळात छाटे मोठे सर्वच व्यवसाय बंद होते. बंद व्यवसायामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या व्यावसायीकांना चूकीच्या पध्दतीने नियमीत बिलापेक्षा कितीतरी पटीने अधिकची बिले देण्यात आली त्यावर सावकारी पध्दतीने व्याजाची आकारणी केली. सर्वप्रकारच्या वीज बिलाची सक्तीने वसूली सुरू केली असून अनेकांना वीज पुरवठा तोडण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत. राज्य शासनाने वीज ग्राहकांना दिलासा देण्याऐवजी शॉक देण्याचा प्रयत्न केला असल्याने राज्यशासन आणि महावितरणच्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टीच्या वतीने भाजपाचे नेते माजी पालकमंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर आणि जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली लातूर जिल्हयातील सर्वच तालुक्यात महावितरण कार्यालयास टाळाठोको आंदोलन करण्यात आले. प्रत्येक ठिकाणच्या आंदोलनात निष्क्रिय राज्यशासनाविरूध्द भाजपाच्या कार्यकर्त्यांनी घोषणा देवून राज्य शासन आणि महावितरणचा निषेध केला. प्रत्येक ठिकाणच्या आंदोलनात भाजपाचे लोकप्रतिनिधी, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्याह वीज ग्राहक मोठया संख्येनी सहभागी झाले होते. अहमदपूर, रेणापूर, चाकूर, उदगीर, औसा, निलंगा, देवणी, शिरुर अनंतपाळ, जळकोट, लातूर या सर्वच तालुक्याच्या ठिकाणी महावितरण कार्यालयासमोर भाजपाच्या वतीने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनास मोठा प्रतिसाद मिळाला. ठिकठीकाणी झालेल्या आंदोलनात आ. अभिमन्यु पवार, गोविंदअण्णा केंद्रे, गणेशदादा हाके, नागनाथअण्णा निडवदे, गोविंद चिलकुरे, रोहीदास वाघमारे, बस्वराज बागबंदे, ज्ञानेश्वर चेवले, उदय ठाकूर, बस्वराज रोडगे, डॉ. बाबासाहेब घुले, दशरथ सरवदे, रमेश सोनवणे, सतिष आंबेकर, अभिषेक आकनगीरे, आरती राठोड, मंगेश पाटील, काशीनाथ गरीबे, सोमेश्वर सोप्पा, बन्सी भिसे, समाधान कदम, प्रशांत पाटील, रामलिंग शेरे, शाहूराज थिटे, सुभाष जाधव, ज्ञानेश्वर वाकडे, संतोष वाघमारे, हणमंत देवकते, शिवाजी बैनगिरे, बालाजी गुटे, अरविंद नागरगोजे, पांडूरंग शिंदे, अच्युत भोसले यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते.

### जीएसटी मधील अटींच्या विरोधात आंदोलन

लातूर : जीएसटी कायद्यामधील जाचक अटी आणि कायद्यामध्ये वारंवार होणाऱ्या बदलाच्या निषेधार्थ पुकारण्यात आलेल्या देशव्यापी आंदोलनात लातुरातील सीए असोसिएशन, कर सल्लागार व व्यापारी संघटनांनी सहभाग नोंदवला. जीएसटी कायद्यामध्ये वारंवार बदल करून तो अस्थिर केला जात आहे.याशिवाय या कायद्यात अजूनही त्रुटी आहेत. जीएसटी तसेच जीएसटी पेनॉल्टी,जीएसटी वरील व्याज व जीएसटी रिटर्न सुधारित करण्याची गरज आहे. जीएसटी भरण्याची अंतिम तारीख वाढवणे आवशयक आहे. जीएसटी ई-वे बिल नंबर कारण नसताना बंद करण्यात आला आहे. यासंदर्भात वारंवार तक्रारी करूनही केंद्र व राज्य शासनाच्या पातळीवर अडचणी विचारात घेतल्या जात नाहीत. जीएसटी कायद्यात व्यापाऱ्यांकडून आलेले इनपुट क्रेडिट ब्लॉक करण्याचा अधिकार कसलेही कारण न देता अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे. यामुळे व्यापाऱ्यांची अवहेलना होणार आहे. कोरोना काळात सर्व व्यवहार बंद होते. त्या काळातील जीएसटी रिटर्न भरण्यासाठी तारीख वाढवून देण्याची आवश्यकता आहे. परंतु यासंदर्भात कसल्याही हालचाली होत नाहीत. यामुळे व्यापाऱ्यांना जीएसटी विलंब शुल्कापोटी लाखो रुपयांची रक्कम भरावी लागत आहे. जीएसटीचे वार्षिक रिटर्न व ऑडिट रिपोर्ट भरण्याची मागील वर्षाची तारीखही वाढवून देण्याची गरज आहे. ती वाढवून देण्याची मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. यासंदर्भात सीए असोसिएशन कर सल्लागार व व्यापारी संघटनांनी अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. सीए असोसिएशनचे चेअरमन सीएराजेश अग्रवाल, व्हाईस चेअरमन सीए विशाल चव्हाण,कर सल्लागार संघटनेचे अध्यक्ष एम एम शेख,सचिव नयन जखोटिया,व्यापारी संघाचे अध्यक्ष दिनेश गिल्डा यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. या आंदोलनात सीए उदय स्वामी, सीए विजय भंडारी, सीए पुरुषोत्तम कर्वा, सीए दीपक नवटक्के,सीए महेश मालपाणी, सीए किशोर भराडिया, कर सल्लागार राम भुतडा, अतुल औसेकर संतोष कुलकर्णी महेश अग्रवाल, विवेक कुलकर्णी,शंकर जाधव,संतोष क्षिरसागर, सीए जी.टी.बरुरे, सीए महेश सुगावे, सीए विश्वास जाधव यांच्यासह व्यापारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# शेतकऱ्यांनी शेती सोबतच शेतमालाची मार्केटिंग करावी -जिल्हाधिकारी पृथ्वीराज

**लातूर/प्रतिनिधी**

जिल्हयातील शेतकऱ्यांनी शेती सोबतच आपल्या शेतात उत्पादीत केलेल्या शेती मालाची मार्केटिंग करण्याची कला अवगत करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी.पी. यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी गट, कृषि निगडीत संस्था, कृषि उद्योजक व शेतकरी यांच्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनेच्या मार्गदर्शनासाठी एक दिवसीय कार्यशाळेच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. या एक दिवसीय कार्यशाळेस विभागयीय कृषि सह संचालक अशोक जगताप, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी तथा प्रकल्प संचालक दत्तात्रय गावसाने,




आत्माचे सहाय्यक प्रकल्प संचालक आर. एस. पाटील, अग्रणी बँकेचे व्यवस्थापक दिलीप कुलकर्णी, जिल्हा उद्योग केंद्राचे पी.डी. हनभर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी म्हणाले की, आत्मा व पोकरा प्रकल्पा अंतर्गत आयोजित केलेल्या कार्यशाळेत कृषि विभागाच्या विविध योजनेची आपणास माहिती मिळणार आहे. जिल्हयातील शेतकऱ्यांनी शेती व्यवसायाबरोबरच आपल्या शेत मालास अधिक भाव येण्यासाठी शेतमालाची मार्केटिंग करण्याची कला अवगत करावी. जिल्हयात शेत रस्ता अभियान राबविले जाणार असून प्रारंभी अतिक्रमण नसलेल्या शेतरस्त्याची कामे केली जाणार आहेत. यासाठी प्रत्येक ग्रामपंचायती शेत रस्त्यासाठी ठराव घेऊन प्रस्ताव दाखल करतील असे त्यांनी सूचित केले. जिल्हयातील शेतकऱ्यांनी आपल्या शेती उद्योगाबरोबरच दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन अशा इतर व्यवसायाकडे अधिककल वाढविला पाहीजे. त्या बरोबरच शेतकऱ्यांनी सेंद्रीय शेती करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज यांनी केले.यापूढे जिल्हयात प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी शेती व्यवसायाबाबत विविध योजणांची माहिती ...पान ६ वर

# वाड्यात भाजपचे महावितरणविरोधात 'टाळे ठोका व हल्लाबोल' आंदोलन!



**वाडा/प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी वाडा शाखेच्या वतीने प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या सूचनेनुसार जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील व जेष्ठ नेते बाबाजी काठोळे यांच्या मार्गदर्शनाखाली शुक्रवारी (दि.५ ) वाडा येथील वीजवितरण कंपनीच्या कार्यालयासमोर तालुकाध्यक्ष मंगेश पाटील यांच्या नेतृत्वाखाली टाळा ठोको व हल्लाबोल आंदोलन करण्यात आले.

आपल्या संगीत खुर्चीचा खेळ खेळत आजवर आघाडी सरकारच्या नेत्यांनी सर्वसामान्य जनतेच्या तोंडाला पाणे पुसली आहेत. या आघाडी सरकारच्या काळात जनहीताचा कुठलाच निर्णय घेण्यात आलेला नाही. हे सरकार सर्वच पातळीवर अपयशी ठरले आहे. अशा कडक शब्दात आघाडी सरकारचा खरपूस समाचार घेण्यात आला. यावेळी भाजपचे ज्येष्ठ नेते बाबाजी काठोळे, जिल्हाध्यक्ष नंदकुमार पाटील, तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, डॉ.हेमंत सवरा, महीला तालुका ...पान ६ वर

# मनगोळीत झालेल्या चोरीतील साडेपाच लाखांचा मुद्देमाल फिर्यादीला न्यायालयाच्या आदेशाने परत




**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मनगोळी येथून चोरीस गेलेल्या साडेपाच लाखांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला असून तो न्यायालयाच्या आदेशाने फिर्यादीला परत करण्याचा कार्यक्रम पोलीस अधीक्षक कार्यालयात पार पडला. सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रभाकर शिंदे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील, मंद्रुप पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन थेटे तसेच मनगोळीतील प्रतिष्ठित नागरिकांच्या उपस्थितीत मुद्देमाल प्रदान कार्यक्रम पार पडला आहे. फिर्यादी सुरज रावजी कापसे (वय २९ रा मनगोळी ता.दक्षिण सोलापूर) यांच्या बंद घराचे कुलूप उचकटून ऑक्टोबरमध्ये अज्ञात चोरट्यांनी साडेपाच लाखांचे सोने चांदीचे दागिने चोरून नेले होते. हा चोरीचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उघडकीस आणून तीन आरोपींना पकडले होते.

त्यांच्याकडून गुन्ह्यांतील संपूर्ण चोरीस गेलेले सोने चांदीचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत. तो हस्तगत केलेला मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशाने पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते यांच्या हस्ते फिर्यादी सुरज कापसे व त्यांच्या मातोश्री शर्मिला कापसे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. यावेळी फिर्यादी व मनगोळी नागरिकांनी स्थानिक गुन्हे शाखेचे व मंद्रुप पोलिसांचा मनोभावे सत्कार करून पोलिसांच्या चांगल्या कामाची प्रशंसा केली.

# औसा येथे पेट्रोल-डिझेल दरवाढ विरोधात शिवसेनेचे आंदोलन




**औसा/प्रतिनिधी**

देशात पेट्रोल डिझेल आणि गॅसचे भाव अतिशय जलदगतीने वाढत आहेत. याला केंद्र सरकार जबाबदार आहे. दर दिवशी होणारी दरवाढ ही सर्व सामान्य जनतेला परवडणारे नाहीत. नागरिक कंटाळून गेले आहेत. केंद्र सरकारच्या विरोधात जनतेमध्ये रोष पसरला आहे. दिल्लीत शेतकरी बांधव आपल्या हक्कासाठी लढत आहेत त्यांना सुद्धा न्याय मिळत नाही. या सर्व बाबींना केंद्र सरकारच जबाबदार आहे. याचा निषेध म्हणून औसा येथे केंद्र सरकारच्या विरोधात शिवसेनेच्या वतीने शिवसेना जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी औसा शिव सेना जिल्हा प्रमुख संतोष सोमवंशी, तालुका प्रमुख सतीश शिंदे, शहर प्रमुख सुरेश भुरे, महिला आघाडी जयश्री ताई उटगे, माजी नगर सेवक बंडू कोद्रे, खरेदी विक्री संघाचे उपसभापती शेखर चव्हाण, तालुका संघटक रोहित गोमदे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती किशोर जाधव, उपतालुका प्रमुख केरबा एकंबे, किशोर भोसले, गणेश गायकवाड, विलास शिंदे, ईश्वर वाघे, प्रवीण कोव्हळे, प्रवीण बालगीर, सचिन सगर, राहुल मोरे, वैभव मोरे, विजय पवार, राहुल मातोळकर, अमोल सूर्यवंशी, मनोज सोमवंशी, संजय साठे, गोविंद खंडागळे, शंकर लंगर, श्रीहरी काळे, राजाभाऊ भणगे, श्रीधर साळुंके, बजरंग माने, अरुण देवकते, अजीत भोसले बाळासाहेब नरवडे, आकाश माने, शुभम भालके, आकाश फुलारी, केशव डांगे आदी उपस्थिती होते. यावेळी भाजप सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या विरोधात घोषणाबाजी करून निषेध व्यक्त केला. पेट्रोल डिजल ...पान ६ वर

# आश्रमशाळा संस्थाचालक संघाच्या जिल्हा कार्यकारणीची निवड



**लातूर/प्रतिनिध**

महाराष्ट्र राज्य आश्रमशाळा संस्थाचालक संघच्या प्रादेशिक व जिल्ह्यातील सर्व पदाधिकार्यांची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत संघाचे राज्य अध्यक्ष शेषेराव चव्हाण यांच्या सुचनेनुसार जिल्हा कार्यकारणी निवड करण्यात आली. या कार्यकारणीच्या जिल्हा अध्यक्ष पदी बक्षूमियाँ सौदागर तर कोषाध्यक्षपदी विश्र्वास नाईक यांची निवड एकमुखी करण्यात आली. महाराष्ट्र राज्य आश्रमशाळा संस्थाचालक संघ च्या प्रादेशिक व जिल्ह्यातील सर्व पदाधिकार्यांची बैठक मातोश्री मिनाताई ठाकरे आश्रमशाळा, लोणी, उदगीर येथे संघाच्या प्रादेशिक व जिल्हा पदाधिकार्यांची जिल्हा कार्यकारणी निवडण्यासाठी बोलविण्यात आली होती. या बैठकीला राज्य अध्यक्ष शेषेराव चव्हाण, राज्य सल्लागार मानवेंद्र केंद्रे हे उपस्थित होते. या बैठकीत एकमुखाने जिल्हा अध्यक्ष पदी बक्षूमियाँ सौदागर, कोषाध्यक्षपदी विश्वास नाईक, उपाध्यक्षपदी भारतसिंग राठोड, सरचिटणिस श्रीधर राठोड, प्रशांत गुळवे, तर कार्यकारणी सदस्य म्हणून पांडुरंग राठोड, दीनदयाळ धनूरे अदीची निवड करण्यात आली. यावेळी माजी जि.प.अध्यक्ष मिठाराम राठोड, सुभाष पवार, त्र्यबंक केंद्रे, भिमराव राठोड, सुरेश हाके उपस्थित होते. संघाच्या वतीने आश्रम शाळा चालविताना येणाऱ्या समस्या शासन दरबारी माडून त्यावर मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत राज्य अध्यक्ष शेषेराव चव्हाण यांनी व्यक्त केले.

# आदिवासी शेतकऱ्यांना मधुमक्षिका पालन प्रशिक्षण

**जळगाव/प्रतिनिधी**

येथील गांधी रिसर्च फाऊण्डेशन आणि कृषी विज्ञान केंद्र जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने एकदिवसीय मधुमक्षिका पालन व मध संकलन प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन मंगळवार दि. ०२ रोजी करण्यात आले होते. बोरअजंटी लगत असलेल्या परिसरातील सुमारे ६० शेतकऱ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेत लाभ घेतला. आदिवासी शेतकरी बांधवांचे आर्थिक जीवनमान उंचवावे हा सुद्धा त्यामागील एक हेतू होता.

सातपुडा पर्वतासारख्या दुर्गम भागात वास्तव्यास असणाऱ्या आदिवासी शेतकऱ्यांचे उत्पन्नाचे साधन म्हणून मधाची भूमिका महत्त्वाची असते. थोड्याफार प्रमाणात त्याची विक्री करुन ते आपला उदरनिर्वाह करत असतात. हे लक्षात घेता जर त्यांना शास्त्रशुद्ध पद्धतीने मधुमक्षिका पालन करण्याचे शिक्षण दिले तर कुठलीही हिंसा न करता आदिवासी शेतकऱ्यांना शुद्ध मध संकलन करता येईल. त्याच सोबत मेण ही उपलब्ध होईल व त्यातून जास्त प्रमाणात त्याची विक्री करुन त्यांचे आर्थिक जीवनमान उंचावण्यास मदत होईल. प्रशिक्षणात प्रामुख्याने मधमाशांचे प्रकार, त्यांची उत्पत्ती त्यांचे खाद्य, परागीकरण प्रक्रिया, मध संकलन करताना घ्यावयाची




काळजी हे सर्व शेतात प्रात्यक्षिक करुन दाखविण्यात आले. जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी हे प्रशिक्षण घेऊन मधुमक्षिका पालन करावे, शेतकऱ्यांना त्या अनुषंगाने वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येईल असे आव्हान कृषी विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. हेमंत बाहेती यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. यावेळी मुख्य प्रशिक्षक विद्यानंद अहिरे, आत्माचे उप संचालक कुरबान तडवी, डॉ. वैभव सूर्यवंशी किरण जाधव, डॉ. विशाल बैराग, महेंद्र साळुंखे, उपसरपंच ज्ञानेश्वर सुलताने आदि प्रमुख पाहुणे होते. प्रशिक्षण यशस्वीतेसाठी बोरअजंटीचे ग्रामसेवक देवरे आप्पा, पोलिस पाटील सुनिल बारेला तसेच गांधी रिसर्च फाऊंडेशनचे स्वयंसेवक सुधीर पाटील, चंद्रकांत चौधरी, मयूर गिरासे, विक्रम अस्वार, ज्ञानेश्वर शिरसाठ यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत सूर्यवंशी यांनी तर आभार सागर चौधरी यांनी मानले.

# पोलीस हवालदार इकबाल शेख यांना पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते मुंबई येथे राष्ट्रीय पारितोषिक प्रदान

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

पोलीस हवालदार इकबाल अब्दुल रशीद शेख सोलापूर ग्रामीण यांनी गुन्हे अभिलेख केंद्र नवी दिल्ली यांच्याकडून आयोजित करण्यात आलेल्या सी.सी.टी.एन. एस. व आय.सी.जे.एस. या विषयावरील राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत सहभाग घेवून वैयक्तिक उत्कृष्ट कामगिरी करून राष्ट्रीय पारितोषिक मिळविले आहे त्याबद्दल दिनांक ०४ फेब्रुवारी २०२१ रोजी पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य मुंबई येथे मा. हेमंत नागराळे, नूतन पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे हस्ते राष्ट्रीय गुन्हे अभिलेख केंद्र, नवी दिल्ली यांचे कडून प्राप्त झालेले राष्ट्रीय पारितोषिक व प्रमाणपत्र सन्मान पूर्वक प्रदान करण्यात आले आहे. पोलीस हवालदार इकबाल अब्दुल रशीद शेख यांनी महाराष्ट्र पोलीस व सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे नाव देशपातळीवर उंचावीले आहे.



आजतागायत इकबाल शेख यांनी १० सुवर्ण, ७ रौप्य, ११ कांस्य व १ राष्ट्रीय पारितोषिक व पदकाची कमाई करून यशाचे शिखर गाठले आहेत. त्यांचे या उल्लेखनीय कामगिरीमुळे सोलापूर ग्रामीण पोलीस दलाचे नाव देशपातळीवर उंचावीले आहे. पोलीस महासंचालक कार्यालय महाराष्ट्र राज्य मुंबई येथे सदर कार्यक्रमामध्ये एस. जगन्नाथन अप्पर पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई, अतुलचंद्र कुलकर्णी, अप्पर पोलीस महासंचालक, रंजनकुमार शर्मा, संभाजी कदम पोलीस अधीक्षक, ...पान ६ वर

# चोरीच्या खैराने भरलेली स्कॉर्पिओ गाडी वाडा वनविभागाच्या जाळ्यात




**वाडा/प्रतिनिधी**

वाडा वनविभागाच्या हद्दीत खैराची चोरटी तोड करून त्याची वाहतूक करण्याचा तस्करांनी सपाटा लावला असून वनविभाग देखील त्याला तोडीस तोड उत्तर देताना दिसत आहे. तालुक्यातील गायगोटा येथे शुक्रवारी रात्री सादरण ३:३०च्या दरम्यान परिमंडळ बाणगाव राऊंड येथील रात्री गस्ती वर असलेल्या अधिकाऱ्यांना संशय आल्याने खैराच्या झाडाची तोड करून नेत असलेली स्कॉर्पिओ गाडी जप्त करण्यात आली आहे. शुक्रवारी रात्री परिमंडळ बाणगाव राऊंड येथील अधिकारी व कर्मचारी हे रात्री साधारण ३:३० च्या दरम्यान गस्ती घालत असताना तालुक्यातील गायगोटा या गावाच्या हद्दीत स्कॉर्पिओ गाडी क्र MH 02 P - 8680 ही गाडी संशित जात असल्याचे दिसून आल्याने कर्मचाऱ्यांनी त्याला घेरले. मात्र अंधाराचा फायदा घेऊन गाडी मधी इसम मात्र फरार झाले. या गाडीत खैर प्रजातीचे २० नग अशा १.०२२ घनमीटर चा माल मिळून आला आहे. त्याची आनंदाचे किंमत २५ हजार असून गाडीची किंमत २ लाख ५० हजार आहे. असा एकूण २ लाख ७५ हजारचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर ची कारवाई वनक्षेत्रपाल पश्चिम वाडा एच व्ही सापळे यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल जाधव, वनरक्षक केंद्रे, मोहिते, करगुडे, निकन, नदाब, सकपाळ, सोनवणे, कदम, वाहचालक आकारे, तसेच एस बी ठाकरे यांच्या पथकाने केली आहे.